ग्रं. ग्रं. स.
विषय निबंध
सं. क्र. १३३९




# शिवनेरीच्या नौबती

REFBK-0011496

## यशवंतरावजी चव्हाण

अनुक्रम ...३११७७.... वि: ...
क्रमांक ...... नों: दि: ...



नामदार यशवन्तरावजी चव्हाण यांचीं मननीय भाषणें

# शिवनेरीच्या नौबती

महाराष्ट्र ...
क्र. ११७४६
शाखा

गोविन्द तळव

REFBK-0011496

व्हीनस बुकस्टॉल . पुणे २

प्रकाशक
सौ. सुलोचना लिमये, एम्. ए.
व्हीनस बुकस्टॉल
पुणें २

आवृत्ति पहिली
जुलै १९६१
मूल्य रु. ४–५०

चित्रकार
सुधाकर खासगीवाले

मुद्रक
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.
३८३, नारायण पेठ
पुणें २

आपल्या महाराष्ट्र राज्याच्या कारभाराचीं सूत्रें श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हातीं असल्यामुळें त्यांच्याबद्दल व त्यांच्या विचारांबद्दल सर्व महाराष्ट्रीयांमध्यें मोठें कुतूहल दिसून येत आहे. 'राजा कालस्य कारणम्' ही

# परिचय

उक्ति जरी पूर्णपणें बरोबर नसली तरी तिच्यामध्यें थोडेंबहुत तरी तथ्य आहे. राज्यांतील लोकांची उन्नति होण्यास ज्याप्रमाणें लोकांचें साहाय्य लागतें त्याप्रमाणेंच राज्याच्या सूत्रधारांच्या कर्तबगारीवर व ध्येयनिष्ठेवर ती अवलंबून असते. यामुळें या लहानशा पुस्तकांत संकलित केलेल्या यशवंतरावांच्या भाषणांचें वाचक स्वागत करतील यांत शंका नाहीं.

यशवंतरावांनीं निरनिराळ्या प्रसंगीं केलेल्या लहानमोठ्या भाषणांतील उतारे वाचकांस येथें पहावयास मिळतील व त्यांवरून त्यांचा विचारप्रवाह कसा काय आहे याची सहज अटकळ करतां येईल. मुख्य मंत्र्याला हजारों प्रकारच्या निरनिराळ्या प्रसंगीं हजर राहून हजारों निरनिराळ्या विषयांवर दोन शब्द बोलावे लागतात; त्या सर्व विषयांची त्यांना सांगोपांग माहिती असणें अर्थातच शक्य नसलें तरी त्या त्या विषयाचा सामान्य राज्ययंत्रणेशीं काय संबंध आहे व असावा याची कल्पना त्यांना असली म्हणजे काम भागतें. त्या त्या विषयांच्या तपशीलांबद्दल सरकारजवळ तज्ज्ञ असतातच. त्यांचा सल्ला घेऊन मगच सरकारी धोरण ठरवावें लागतें. या छोट्याशा ग्रंथामध्यें दिलेल्या त्यांच्या भाषणांच्या उताऱ्यांवरून यशवंतरावांना आपल्या भूमिकेची नीट कल्पना आली आहे हें स्पष्ट दिसून येतें.

मीं गणित विषय शिकवीत असतांना विद्यार्थ्यांच्या मनावर असें ठसवून देण्याचा प्रयत्न करीत असें कीं, त्या विषयांतील मूलभूत तत्त्वें प्रत्येकानें आत्मसात केलीं पाहिजेत. कारण मग तपशीलाचीं निरनिराळीं सूत्रें (Formulae) जरी ध्यानांत राहिलीं नाहींत तरी त्यांत फारसें नुकसान नाहीं.

कारण मूळ तत्त्वें अवगत असलीं, म्हणजे तपशीलाचीं सूत्रें पुन्हां शोधून काढणें वाटेल त्याला शक्य आहे. माझ्या मतानें ही गोष्ट इतर सर्व बाबींतही लागू पडते. विशेषत: राज्यकारभारांत लोकशाही, स्वातंत्र्यप्रेम, देशभक्ति, सर्व प्रजाजनांस समान संधीची उपलब्धता, निधर्मी राज्ययंत्रणा हीं मूलतत्त्वें राज्यकर्त्यांच्या मनामध्यें जर पूर्णपणें बिंबलेलीं असलीं व राज्यकारभारामध्यें नैतिक मूल्यांनाहि फार महत्त्व आहे ही जाणीव त्यांना असली तर त्यांच्या हातून बहुधा फारशा चुका होणार नाहींत. यशवंतरावांच्या मनावर या तत्त्वांचा पूर्ण पगडा आहे असें या भाषणांवरून दिसून येतें आणि त्यामुळेंच त्यांचा कारभार यशस्वी झाला आहे.

आपल्या देशामध्यें जातीय, धार्मिक वगैरे निरनिराळे भेद आहेत आणि त्यामुळें राज्यकारभारामध्यें पुष्कळ वेळां अडचणी येतात. यशवंतरावांना निरनिराळ्या धार्मिक व जातीय सभांमध्यें भाषणें करण्याची नेहमीं पाळी येत असते. आणि त्यावेळीं त्यांनीं, देशाच्या प्रगतीला असले भेद अपायकारक असून ते घालविण्याचे प्रयत्न प्रत्येकानें केले पाहिजेत, हेंच श्रोत्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केलेला आहे. "आम्ही प्रथम भारतीय आहोंत, नंतर महाराष्ट्रीय", "नवबौद्ध समाजांतील बुद्धिवान तरुणांनीं केवळ आपल्या समाजाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित न करतां संपूर्ण महाराष्ट्राच्या समस्यांचा विचार करावा." वगैरे उद्‌गार त्यांच्या या विचारांचे द्योतक आहेत. मुसलमान, ख्रिस्ती वगैरे समाजांच्या लोकांसमोर त्यांनीं केलेल्या भाषणांतील असे आणखीहि उतारे देतां येतील. या सर्वांवरून त्यांची देशभक्ति किती जाज्ज्वल्य आहे हें सहज दिसून येईल.

राज्यांतील लोकांमध्यें सहकारवृत्तीचा प्रसार व्हावा, राष्ट्रहिताकरितां निरनिराळ्या पक्षांनीं शक्यतों एकत्र यावें यावर त्यांनीं बहुतेक भाषणांमध्यें जोर दिलेला दिसतो. या त्यांच्या प्रवृत्तीमुळें त्यांच्याबद्दल सर्वपक्षीय लोकांना आदर वाटणें साहजिकच आहे.


या ग्रंथांत, त्यांच्या कांहीं भाषणांतील लहानसे उतारेहि दिलेले आहेत. तसेंच दोनचार भाषणें विस्तृत रूपानें दिलेलीं आहेत. त्यांपैकीं सीमाप्रश्नावरील त्यांचें भाषण मला विशेष आवडलें. या भाषणांत आपली भूमिका त्यांनीं स्पष्ट केलेली असून या प्रश्नाबद्दल त्यांनीं काय केलें आहे, याची सविस्तर

माहिती दिली आहे. त्यांच्या हातून हा प्रश्न समाधानकारकरीत्या सुटावा व त्यांच्या हातांस सर्व पक्षांकडून बळकटी यावी अशी मी मनापासून आशा करतों.

त्यांच्या भाषणांमध्यें मला न पटणारे असे मुद्देहि आहेत. उदाहरणार्थ, उच्च शिक्षणाचा प्रसार करतांना विद्यार्थी तें घेण्याला किती लायक आहेत या गोष्टीला किती महत्त्व द्यायचें याबद्दल कदाचित् त्यांचीं व माझीं मतें पूर्णपणें जुळण्यासारखीं नाहींत. उच्च शिक्षणाचे दरवाजे लायक विद्यार्थ्यांना त्यांच्या सांपत्तिक व जातीय परिस्थितीचा विचार न करतां सदैव उघडे असावेत ही गोष्ट मला पूर्णपणें कबूल आहे. व हल्लीं मागासलेल्या जातींतील विद्यार्थ्यांना ही लायकी आणून देण्याचे ते जे जे प्रयत्न करीत आहेत त्यांना अर्थातच माझा पूर्ण पाठिंबा आहे. परंतु उच्च शिक्षणाचा चांगला उपयोग करण्याची लायकी नसतांनाहि त्यांना असल्या अभ्यासक्रमाचे दरवाजे खुले ठेवणें म्हणजे राज्याच्या संपत्तीचा दुरुपयोग करणें व शिक्षणाचा दर्जा उतरविणें होय असें माझें स्पष्ट मत आहे.

असे किरकोळ मतभेद त्यांच्या-माझ्यामध्यें असले तरी त्यांचीं हीं भाषणें वाचून यशवंतरावांबद्दलचा माझा आदर व त्यांच्या भवितव्याबद्दलची आशा हीं वृद्धिंगतच झालेलीं आहेत असें म्हणावयास मला फार आनंद वाटतो.

मी प्रांजळपणें कबूल करतों कीं यशवंतरावांची जेव्हां पहिल्यानें मंत्रि व नंतर मुख्य मंत्रि म्हणून नेमणूक करण्यांत आली तेव्हां मला व माझ्यासारख्याच पुष्कळ लोकांना त्यांच्यासारख्या अननुभवी मनुष्याच्या हातून कारभार कितपत यशस्वी होईल याबद्दल थोडी साशंकता वाटत होती. त्यांचा पूर्वीचा अनुभव म्हणजे महात्माजींच्याबरोबर स्वातंत्र्यमोहिमेंत केलेलें काम. परंतु प्रभावी चळवळ आणि यशस्वी कारभार यांमध्यें पुष्कळच भेद आहे. तरीहि यशवंतरावांनीं ही साशंकता पूर्णपणें नष्ट केलेली आहे हें पाहून मला फार समाधान वाटतें. त्यांना अजून पुष्कळ वर्षें काम करावयाचें आहे व तें त्यांच्या हातून हल्लींच्याप्रमाणेंच उत्तम प्रकारें होवो अशी आशा मी प्रगट करतों.





महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजीं झाली आणि राजकीय दृष्ट्या एकसंध झालेल्या महाराष्ट्रांत भावनात्मक ऐक्य साधण्याचें काम उभें राहिलें. परंतु केवळ भावनात्मक ऐक्याचाच प्रश्न नवमहाराष्ट्रापुढें

# आभार

नव्हता व नाहीं. औद्योगिक विकास व्हावा, शिक्षणाचा प्रसार होऊन नवी दृष्टि यावी आणि अनेक सामाजिक जटिल समस्या सुटाव्या अशीच आंच महाराष्ट्राचें हित डोळ्यापुढें असलेल्या विचारवंतांना, कार्यकर्त्यांना व नेत्यांना लागली आहे. मुख्य मंत्री व पक्षाचे प्रमुख या नात्यानें ना. यशवंतरावजी चव्हाण यांनीं या सर्व समस्या सोडविण्यासाठीं अनेक पावलें टाकलेलीं आहेत. नव्या महाराष्ट्राला आपल्या कर्तव्याची, जबाबदारीची व अस्मितेची जाणीव करून देण्यासाठीं श्री. यशवंतरावजी मुंबईपासून मराठवाड्यापर्यंत व नागपूरपासून सावंतवाडीपर्यंत फिरले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषणांनी श्री. यशवंतरावांनीं महाराष्ट्रांत एक नवी शक्ति निर्माण केली आहे, एक नवी जाणीव

उत्पन्न केली आहे. तेव्हां त्यांच्या भाषणांचा संग्रह पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावा अशी कल्पना आम्हांला सुचली व त्याप्रमाणें **'शिवनेरीच्या नौबती'** या नांवानें हा संग्रह वाचकांच्या हातीं सोपवितांना आम्हांस आनंद होत आहे.

या संग्रहांतील भाषणाचे पांच विभाग केले आहेत. तथापि ही वर्गवारी अगदीं कांटेकोर आहे असें समजूं नये व ती तशी केलेलीहि नाहीं. मुख्यत: २७ एप्रिल १९६०, म्हणजे शिवजयंतीच्या मुहूर्तावर महाराष्ट्र राज्यस्थापनेचा सोहळा सुरूं झाला तेव्हांपासूनचीं यशवंतरावांचीं भाषणें येथें संग्रहित केलीं आहेत; व ३० एप्रिल १९६१ रोजीं महाराष्ट्र राज्य वर्धापन-दिनाच्या निमित्तानें त्यांनीं आकाशवाणीवरून केलेल्या भाषणानें समारोप केला आहे. शैक्षणिक व सामाजिक विभागांत डिसेंबर १९५९ मध्यें अलीगड विद्यापीठापुढें केलेलें भाषणहि समाविष्ट केलें आहे. कारण या भाषणांत विद्यार्थ्यांची वाढती संख्या, शिक्षणप्रसार, शिक्षणाचा दर्जा यासंबंधीं यशवंतरावांनीं मौलिक विचार प्रदर्शित केले आहेत. तेव्हां हें भाषण या संग्रहांत समाविष्ट करणें आम्हांस योग्य वाटलें. तसेंच शेवटच्या विभागांत १२ मार्च १९६० रोजीं सांगली येथें श्री. यशवंतरावांचा ४७ वा वाढदिवस साजरा झाला तेव्हां त्यांनीं केलेलें भाषणहि अंतर्भूत केलेलें आढळेल. हें भाषण झाल्यानंतर दोनच दिवसांनीं राज्यविभाजनाचा प्रस्ताव यशवंतरावांनीं विधान सभेंत मांडला हें एक कारण या भाषणाचा अंतर्भाव करण्यास पुरेसें आहे. शिवाय आपल्या व्यक्तिगत भावना यशवंतरावांनीं या भाषणांत जितक्या मोकळेपणानें व्यक्त केल्या तशा त्या इतर क्वचित्‌च प्रसंगीं व्यक्त केल्या असतील; म्हणून हें भाषण समाविष्ट केलें गेलें आहे.

महाराष्ट्र व म्हैसूर या राज्यांतील सीमांचा प्रश्न सुटलेला नाहीं. म्हैसूर राज्यांत गेलेले मराठी भाषिक विभाग खेडें हा घटक मानून त्या त्या राज्यांत समाविष्ट करावेत अशी महाराष्ट्र सरकारची भूमिका आहे. महाराष्ट्र राज्य स्थापन होण्यापूर्वीहि द्वैभाषिक मुंबई राज्यसरकारची तीच भूमिका होती. म्हणून मुख्य मंत्र्यांनीं विधानसभेंत या विषयासंबंधीं केलेलें भाषण या संग्रहांत ग्रथित करण्यांत आलें आहे.

प्रस्तुत संग्रह प्रसिद्ध करण्याच्या कामीं आम्हांस अनेकांचें साहाय्य झालें आहे. यासंबंधीं प्रथम आभार मानावयाचे ते ना. यशवंतरावजी चव्हाण यांचे.

त्यांनीं संग्रहरूपानें हीं भाषणें प्रसिद्ध करण्यास अनुमति दिली याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. तसेंच महाराष्ट्र सरकारचे प्रसिद्धिप्रमुख श्री. विनोद राव, उपप्रमुख श्री. डी. आर्. सामंत, मुख्य मंत्र्यांचे वैयक्तिक साहाय्यक श्री. श्रीपाद डोंगरे, एक्झॅमिनर ऑफ प्रेस श्री. थोरात व त्यांचे सहकारी श्री. अभ्यंकर व श्री. पळ्ळेकर, 'तरुण भारत' चे मुंबईतील प्रतिनिधि श्री. इंदूरकर यांच्या साहाय्याचा आभारपूर्वक उल्लेख करणें अगत्याचें आहे.

श्री. मा. ह. पटवर्धन व चित्रकार सुधाकर खाजगीवाले यांनीं अंतर्बाह्य सजावटींत कल्पना व रेखा यांचा संगम साधला हें कृतज्ञतेनें नमूद करतों.

रँग्लर परांजपे यांच्यासारख्या अपक्ष, वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व स्वतंत्र बाण्याच्या विचारवंताची प्रस्तावना या संग्रहाला मिळाली याबद्दल आम्हांस अभिमान वाटतो. श्री. आप्पासाहेबांचे आम्ही ऋणी आहोंत.

प्रस्तुत संग्रहांत यशवंतरावांचीं सर्वच भाषणें समाविष्ट झालेलीं नाहींत व तीं तशीं होणें शक्यहि नव्हतें. तसेंच हीं समग्र भाषणें नव्हेत. भाषणाचा मुख्य गाभा यावा व महत्त्वाचीं सर्व भाषणें समाविष्ट व्हावींत असा कटाक्ष ठेवला आहे. महाराष्ट्र राज्याच्या या जगन्नाथाच्या रथाचें सारथ्य करीत असतांना यशवंतरावांच्या धोरणामागें कांहीं वैचारिक अधिष्ठान आहे. तें प्रतीत व्हावें या हेतूनें त्यांच्या भाषणांचें संपादन येथें केलेलें आहे. कांहीं महत्त्वाचीं भाषणें अनवधानानें गळलीं असतीलहि. जागेच्या अभावामुळें कांहीं विचारमौक्तिकेंच द्यावीं लागलीं. या वर्षाच्या प्रारंभास अहमदाबादच्या लास्की इन्स्टिटयूटमध्यें श्री. यशवंतरावांनीं महत्त्वपूर्ण भाषण केलें होतें, पण त्याच्या प्रकाशनाचे हक्क त्या संस्थेकडे असल्यानें आम्ही हें भाषण या संग्रहांत घेऊं शकलों नाहीं. संग्रहांतील भाषणाच्या मजकुरांत कांहीं उणीवा वा दोष राहिले असतील तर त्याची जबाबदारी मुख्य मंत्र्यांची नसून आमची आहे. या पुस्तकाचा प्रसार जास्तींत जास्त व्हावा आणि जे विधायक विचार यशवंतरावजी प्रदर्शित करीत आहेत ते अधिकांत अधिक लोकांपर्यंत पोहोंचावेत या हेतूनें पुस्तकाचें स्वरूप आटोपशीर ठेवलें आहे.


**गोविंद तळवलकर—अ. ह. लिमये**




| | | |
|---|---|---|
| शिवनेरीवर | .. | १ |
| सोनियाचा दिवस | . | ४ |
| उद्योगाचें भव्य मंदिर | ... | ११ |
| संधि आणि आव्हान | ... | १५ |
| जनगणना | .. | १७ |
| योजनेची गति व पूर्ति | .. | १९ |
| आर्थिक लोकशाही | ... | २१ |
| लोकशाही विकेंद्रीकरण | .. | २३ |
| विरोधी द्वंद्व-समास नाहीं | ... | २५ |
| छोटे उद्योगधंदे | ... | २७ |
| बँकांकडून अपेक्षा | . | ३१ |

शिक्षण - संख्या व दर्जा ... ३५
समाजसेवेचें महत्त्व ... ५०
मराठा कीं मराठी ? ... ५५
मतभेद वाढवूं नका ... ५७
जनकर्तृत्वाचा साक्षात्कार ... ६०
भावनात्मक ऐक्य ... ६३
मोठी सफर ... ७२
सीमाप्रश्न ... ७७
जनता—जननी ... ८७
विविधतेंतील ऐक्य ... ९१
विचारवंत व शासन ... ९७
महिलांचें कार्य ... ९९
बंगाल व महाराष्ट्र ... १०२
साहित्य व संस्कृति ... १०४
पत्रकारांची जबाबदारी ... १११
शिवछत्रपतींचा आदर्श ... ११५
मराठी रंगभूमि ... ११८
नव्या जीवनाचा नाद ... १२०

* * *



शुभ कार्य शुभ मुहूर्तावर सुरू करतात. महाराष्ट्र राज्याची स्थापना करणें ही तीन कोटि मराठी लोकांची शुभ कामना होती आणि ती पुरी करण्याचें मान्य झालें, तेव्हां राज्यस्थापनेचा सोहळा, मराठी लोक ज्यास परमेश्वरासमान मानतात त्या शिवाजीमहाराजांच्या जयंतीचा मुहूर्त साधून, सुरू झाला. एवढा उचित मुहूर्त कोणता असणार ? किती काळ मराठी मन या दिवसाची वाट पाहत होतें ! त्या दिवशीं शिवनेरीवर महाराजांच्या जन्मस्थानीं महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा सोहळा ज्या उत्साहानें व उत्कटतेनें पार पडला त्याला तोड नाहीं. प्रत्येक जण शिवनेरीला जाण्यासाठीं उत्सुक होता आणि जे तेथें जाऊं शकत नव्हते त्यांचें मन शिवनेरीवरच घोटाळत होतें. आतां सारी कटुता, संघर्ष संपला होता.

जें जें नश्वर गेलें निघुनी काळाच्या पाठीं ।
अमृत तेवढें उरलें केवळ या दिवसासाठीं ।।
अंधाराची वाट कंठिली फिरलों संकष्टीं ।
चार युगांची रात्र भोगिली या दिवसासाठीं ।।१ ।।

ही रात्र चार युगांची होती व वाट अंधारी होती. साहजिकच 'रोज उगवला, रोज परतला, होउनि बहु कष्टी ' अशी रविराजाची स्थिति होती.


पण २७ एप्रिल १९६० रोजीं रविराजावर कष्टी होण्याची वेळ आली नाहीं. तेव्हां– ' आनंदें रवि आज उगवला या दिवसासाठीं ' अशी स्थिति झाली होती. —आणि मग ३० एप्रिलची मध्यरात्र उलटली. १ मे रोजीं सुरुवात झाली आणि पश्चिम सागराला साक्ष ठेवून पंतप्रधान नेहरू यांच्या आशीर्वादानें महाराष्ट्र राज्याची अधिकृत स्थापना झाली. या दिवसाचें माहात्म्य काय ? गोविंदाग्रजांच्या काव्युक्तीचा अधिक उपयोग करून सांगावयाचें तर—

दक्षिण सागर होउनि घटिकापात्र निरभिमान ।
मोजित होता या दिवसाचें मंगल घटिमान ।।
उंच उभारुनि मान, हिमालय तिष्ठत केव्हांचा ।
पहिलावहिला किरण पहाया या शुभ दिवसाचा ।।
स्वस्तिवाचता सिंहगडावर चढला गगनांत ।
थरथरुनी श्रीतानाजीचा तो तुटका हात ।।

अशा या वातावरणांत मराठी मन मोहरून गेलें. महाराष्ट्र जागा झाला तो ' घन:श्याम सुंदरा ' या अमरभूपाळीच्या सुरानें. या सोनियाचे दिवशीं नवमहाराष्ट्राचे पहिले मुख्य मंत्री म्हणून ना. यशवंतराव चव्हाण यांचा व त्यांच्या मंत्रिमंडळाचा शपथविधि झाला. या प्रसंगीं भाषण करतांना न्यायाचें व समतेचें राज्य स्थापन करण्याचें ध्येय यशवंतरावांनीं जाहीर केलें आणि त्या राज्याच्या स्थापनेच्या कार्यांत सहकार्य करण्याचें सर्वांना आवाहन केलें.



अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........



"महाराष्ट्राच्या परमेश्वराला प्रणाम करण्यासाठीं आणि आपणां सर्वांच्या तर्फे श्रीशिवछत्रपतींचे आशीर्वाद घेण्यासाठीं या सुवर्णदिनीं मी येथें आलों आहें. या प्रसंगीं माझें मन अनेक भावनांनीं भारावून गेलें आहे. छत्रपतींच्या

# शिवनेरीवर

जन्मठिकाणीं स्वतंत्र भारताचें निशाण फडकावून महाराष्ट्रराज्यनिर्मितीच्या मंगलदिनीं भारतानेंसुद्धां त्यांना मुजरा केला आहे.

या शिवनेरीवर महाराष्ट्राचा इतिहास घडविला गेला असें नव्हे तर छत्रपतींच्या जन्मानें या इतिहासास प्रारंभ झाला आहे. छत्रपतींनीं नवीन परंपरा निर्माण केली. विसाव्या शतकांत नव्या स्वतंत्र महाराष्ट्राची सुरुवात हा एक योगायोग आहे. या योगायोगाच्या पाठीशीं भावना आहेत, महत्त्वाकांक्षा आहेत आणि तळमळ आहे.

छत्रपतींच्या काळांत स्वराज्यसंस्थापनेसाठीं मराठ्यांनीं समशेर चालविली. परंतु नवमहाराष्ट्रांत नवीन प्रकारचें कर्तृत्व गाजवावें लागलें. शिवाजीला

परमेश्वर मानणारीं आम्ही महाराष्ट्रीय माणसें असें मानतों कीं, आमचें म्हणून जें आहे, आमच्यांत ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या भारताच्या सेवे-साठींच आहेत. आम्ही प्रथम भारतीय आहोंत व नंतर महाराष्ट्रीय.

महाराष्ट्रांतील जनतेनें स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीं अनेक प्रकारांनीं व मार्गांनीं आपल्या भावना वेळोवेळीं व्यक्त केल्या आहेत. माझ्या मतें मी त्या प्रयत्नांचे दोन कालखंड मानतों. प्रतापगडावरील समारंभापूर्वीचा कालखंड व दुसरा प्रतापगडापासून शिवनेरीपर्यंतचा. भारताचे पंतप्रधान छत्रपतींच्या पुतळ्याचें अनावरण करण्यासाठीं जेव्हां प्रतापगडावर आले होते तेव्हांपासून महाराष्ट्रनिर्मितीबाबतच्या अनेक गांठी सुटूं लागल्या होत्या.

या महाराष्ट्राच्या चार प्रवृत्ति आहेत असें मी मानतों. ज्ञानेश्वरांच्या रूपानें संतप्रवृत्ति, शिवाजीच्या रूपानें पराक्रम, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या रूपानें स्वार्थत्याग आणि लोकमान्य टिळकांच्या रूपानें विद्वत्ता व राजकारण महाराष्ट्रापुढें उभें आहे.

या थोर परंपरेचा वारसा घेऊन महाराष्ट्रास पुढें जावयाचें आहे. विशेषत: आजच्या पिढीवर त्याची विशेष जबाबदारी आहे. शिवजन्मोत्सव साजरा करण्यासाठीं कांहींजण आज शिवनेरीस आले आहेत, परंतु महाराष्ट्रांतील तीन कोटि जनतेचें लक्ष आज शिवनेरीकडे लागलें आहे. ज्या मनांत आज शिवनेरी नाहीं असें जागतें मन महाराष्ट्रांत असणार नाहीं.

जन्मवेळेनुसार मांडलेली कुंडली मनुष्याच्या जन्मभर उपयोगी पडतेच कीं नाहीं? त्याचप्रमाणें नवमहाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या वेळची कुंडली महाराष्ट्रापुढें सतत राहणार आहे. महाराष्ट्रांत आज असलेल्या सामाजिक व राजकीय प्रवाहाचा परिणाम महाराष्ट्राच्या भवितव्यावर होणार आहे. आज महाराष्ट्रांत अनेक पक्षोपपक्ष आहेत. ते पक्ष राहिले पाहिजेत. ते राहूं नयेत असें म्हणणारा मी नाहीं. लोकशाहीचें राज-कारण चालण्यासाठीं अनेक पक्ष असावे लागतात, पण बहुपक्ष नकोत. मी तर असें म्हणेन कीं पुढचीं अनेक वर्षे म्हणजे तिसरी पंचवार्षिक योजना पुरी होईपर्यंत तरी पक्षोपपक्षांच्या राजकारणाचा गोंधळ माजूं नये. प्रत्येक पक्षास स्वत:चें असें खास राजकारण आहे, पण महाराष्ट्रास स्वत:चें असें राजकारण निर्माण करावयास नको काय?


महाराष्ट्रापुढें असलेल्या मूलभूत सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीनें खटपट करणें हें तें महाराष्ट्राचें राजकारण होय. आपणांस नवमहाराष्ट्राची उभारणी करावयाची आहे. महाराष्ट्राला निसर्गाची व बुद्धिमत्तेची देणगी आहे, असें आपण म्हणतों. आजपर्यंत परसत्तेमुळें व भाषिक राज्य नसल्यामुळें या देणगीचा वापर करतां येत नव्हता अशी तक्रार होत होती. आतां कोणती तक्रार आपण करणार ?

महाराष्ट्राच्या विकासासाठीं आतां सर्वांनींच पुढें सरसावलें पाहिजे; कोणीहि मागें राहतां कामा नये. विकासकार्याच्या मोहिमेवर निघालेलों आपण, सिंहगड चढून आलों आहोंत. या गडावरून पळून जाण्याचा प्रयत्न कोणी करीत असतील तर त्यांना सांगावेंसें वाटतें कीं 'पळून कोठें जातां ? दोर केव्हांच तोडून टाकले आहेत !'

महाराष्ट्राचें राज्य म्हणजे सामान्य माणसाचे प्रश्न सोडविण्याचें राज्य होय, या दृष्टिकोणांतून या राज्याकडे पहा. या राज्याचा कर्णधार असें संबोधून तुम्ही माझ्याकडून भलत्या अपेक्षा करूं नका. आमचे प्रश्न सुटले नाहींत अशा तक्रारी पावलोपावलीं माझ्याकडे येतील– पण आमच्यापुढें सामान्य जनतेच्या अपेक्षांचें रामायण उभें आहे. त्यांच्या अपेक्षांची पूर्ति करणें हा आपल्या राज्याचा मानबिंदु असेल. म्हणून प्रत्येकानें आपल्या क्षेत्रांत जबाबदारीनें कार्य केलें पाहिजे."

( ता. २७ एप्रिल १९६० : शिवनेरी )

* * *



आपल्या पंतप्रधानांच्या शुभ हस्तें आज पहाटें नवराज्याचें उद्घाटन झालें व त्यानंतर आतां नुकताच हा समारंभ पार पडला. अशा रीतीनें 'एकभाषी महाराष्ट्र राज्य व त्याचें पहिलें सरकार' अस्तित्वांत आलें.

# सोनियाचा दिवस

सर्व मराठी बांधव एका राज्यांत यावेत अशी मराठी जनतेची फार दिवसांपासूनची इच्छा होती. कांहीं ऐतिहासिक घटनांमुळें मराठी लोक कित्येक शतकें निरनिराळ्या राज्यांत विभागले गेले होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनें मराठी लोकांचें एकभाषी राज्याचें स्वप्न आज साकार होत आहे. ज्ञानेश्वरांनीं एका वेगळ्या संदर्भांत म्हटल्याप्रमाणें हा खरोखरच "सोनियाचा दिवस" होय. अशा वेळीं मराठी लोकांच्या आनंदाला पारावार उरला नाहीं यांत कांहींच आश्चर्य नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत महाराष्ट्रांतील जनतेची जी विचलित अशी अवस्था झाली होती ती आतां संपून महाराष्ट्राला यापुढें स्थैर्याचे दिवस येतील अशी आशा करण्यास मुळींच हरकत नाहीं. त्यायोगें

लोकांना आतां आपल्या विकासाच्या प्रश्नांकडे कटाक्षानें लक्ष देतां येईल व विकासकार्याच्या बाबतींत येणाऱ्या निरनिराळ्या अडचणींना ते अधिक परिणामकारकपणें तोंड देऊं शकतील. त्याचबरोबर त्या द्विभाषिक राज्याची आतांच समाप्ति झाली, त्याच्या सुनियंत्रित राज्यकारभाराची परंपरा यापुढेंहि चालविण्याची दक्षता आपण घेतली पाहिजे व त्याची कीर्ति अबाधित राखली पाहिजे. तेव्हां या प्रसंगीं यापुढें आपल्याला कोणकोणतीं कामें करावयाचीं आहेत व त्यासाठीं आपण आपली मानसिक व इतर सर्व दृष्टया कशी तयारी करावयास हवी या गोष्टीची मनाशीं नीट उजळणी केली पाहिजे. आपण आज एका नव्या कालखंडांत प्रवेश करीत आहोंत व आपल्या आशा व आकांक्षांची पूर्तता करून घेण्याचा क्षण आतां आला, अशी जनतेची भावना आहे. नव्या महाराष्ट्र राज्याच्या जन्मानें आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस येतील ही सामान्य जनतेची अपेक्षा योग्य अशीच आहे. हा जनतेच्या अपेक्षापूर्तीचा क्षण जवळ आणणें हा महाराष्ट्र राज्याचा मी मानबिंदु मानतों. त्याचबरोबर नव्या राज्यांत शासनाच्या द्वारें लोकांची अधिक कार्यक्षम रीतीनें सेवा घडेल अशा प्रकारें शासन-यंत्रणेची पुनर्घटना व सुधारणा करण्यासहि आतांच चालना मिळाली पाहिजे.

आपल्यापुढें जे मूलभूत, आर्थिक व सामाजिक प्रश्न आहेत त्यांची योग्य ती उकल करावयाची असेल तर त्या प्रश्नांचा अखिल भारतीय संदर्भ आम्हांस विसरतां येणार नाहीं, आणि म्हणून महाराष्ट्राचे नागरिक हे प्रथम भारताचे नागरिक आहेत व नंतर ते महाराष्ट्रीय आहेत याची जाणीव आम्ही सतत ठेवूं.

आतां महाराष्ट्र राज्यापुरतें बोलावयाचें म्हणजे महाराष्ट्रांतील लोकांनीं त्यांचा धर्म, जात अगर पक्ष कोणता कां असेना, आपण सर्व एकच बांधव आहोंत असें मानलें पाहिजे. नवा महाराष्ट्रीय हा केवळ मराठी भाषा बोलणारा नव्हे, तर जो महाराष्ट्रांत राहतो व आपल्या शक्त्यनुसार त्याचें जीवन समृद्ध करतो असा प्रत्येक माणूस हा महाराष्ट्रीयच होय.

मीं मघां म्हटल्याप्रमाणें आपली शासनयंत्रणा ही बदलत्या कालमानास सुसंवादी अशी असली पाहिजे. समाजवादी पद्धतीचें नियोजन करण्यास आज आपण बद्धपरिकर झालों आहोंत. आपली शासनयंत्रणा ही अशा प्रकारच्या नियोजनास पूर्णपणें जुळती मिळती अशीच असली पाहिजे. हें लक्षांत घेऊनच

सचिवालयसंघटनेची सुसंबद्ध अशा प्रकारें पुनर्रचना करण्यांत आली आहे. नव्या महाराष्ट्र राज्याचीं बारा खातीं असतील. या खात्यांचे अशा रीतीनें गट करण्यांत आले आहेत कीं शक्यतों सर्व संबंधित बाबी एकाच खात्याकडे राहून निर्णय त्वरित घेतां येतील व खात्याखात्यांतील पत्रव्यवहार अवास्तव वाढणार नाहीं. ग्रामीण भागांतील सहकारी चळवळ आणि ग्रामपंचायतींचें कार्य हें परस्परांवर अवलंबून असल्याकारणानें त्यांचा एका वेगळचा खात्यांत समावेश करण्यांत आला असून या खात्यास 'सहकार व ग्रामीण विकास खातें' असें नांव दिलें आहे. त्याचप्रमाणें सध्यांच्या सार्वजनिक बांधकामखात्याच्या कामाचें वर्गीकरण करून, इमारती व दळणवळण, पाटबंधारे आणि वीज असे त्याचे जे दोन सुस्पष्ट वर्ग पडतात, त्यांनुसार हीं दोन वेगळीं खातीं करण्यांत आलीं आहेत.

विदर्भ, मराठवाडा, कोंकण व दुष्काळी भाग यांच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येईल व महाराष्ट्र राज्याचें सरकार त्यांचे हितसंबंध डोळचांत तेल घालून जपेल असें जें आश्वासन मी दिलें होतें त्याचा मी या ऐतिहासिक प्रसंगीं पुनरुच्चार करतों. त्याचप्रमाणें मुंबईच्या नागरिकांनाच केवळ नव्हे तर इतर सर्व संबंधितांना मीं असें पुन्हां आश्वासन देतों कीं, या शहराचें बहुरंगी स्वरूप कायम ठेवण्याचा व त्याच्या विकासाकडे निकटचें लक्ष पुरविण्याचा या नव्या राज्याचें सरकार सतत प्रत्यत्न करील. तसेंच नागपूर शहराचें महत्त्व टिकविण्याचाच नव्हे तर तें वाढविण्याचा सरकारचा कटाक्ष राहील.

आपल्या पंचवार्षिक योजनेचा सर्व भर ग्रामीण भागांची सुधारणा करण्यावर देण्यांत आलेला आहे. ग्रामीण भागांत पुन्हां नवचैतन्य निर्माण करण्याच्या ध्येयास सरकार बांधलेलें आहे. या दृष्टीनें शेतीउत्पादनपद्धतीचें आधुनिकीकरण करणें आणि ग्रामीण विभागामध्यें विद्युत्प्रसार करणें, छोटचा उद्योगधंद्यांच्या वाढीस जोराची चालना देणें या कार्यक्रमांना अग्रहक्क देण्यांत येईल. शेतीसंबंधित उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत सहकारी पद्धतीस प्राधान्य देण्याबाबत या शासनाचा आग्रह राहील.

शिक्षणाच्या बाबतींत माध्यमिक शिक्षणांत व्यावसायिक बाजूवर विशेष भर देण्यांत येईल. हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारें अडचणी येऊं नयेत म्हणून शिष्यवृत्त्या वगैरे मार्गांनीं सर्व प्रकारें साहाय्य

करण्यांत येईल. त्याचप्रमाणें विदर्भ व मराठवाडा या भागांत सध्यां ज्या शैक्षणिक सवलती चालू आहेत त्यांत कपात करावयाची नाहीं असें सरकारचें धोरण राहील.

राज्यकारभार इंग्रजीच्या ऐवजीं आतां मराठींत चालविणें कसें इष्ट व निकडीचें आहे याची सरकारला पूर्ण जाणीव आहे. हा बदल कारभारांतील कार्यक्षमतेस बाध न येऊं देतां करावयाचा आहे. या कार्यास चालना मिळावी म्हणून सरकार "डायरेक्टोरेट ऑफ् लँग्वेजेस्" अशा नांवाचें एक खातें ताबडतोब सुरू करीत आहे. त्याचप्रमाणें मराठी साहित्य व इतर क्षेत्रांतील महत्त्वाचें संशोधनकार्य यांना उत्तेजन देण्याचाहि सरकारचा इरादा आहे.

लोक कोणत्या भागांत राहात आहेत, त्यांची भाषा कोणती आहे किंवा त्यांचा धर्म कोणता आहे अशा विचारास यत्किंचितहि थारा न देतां सर्व वर्गांच्या व सर्व जातींच्या लोकांना समान न्याय व समान संधि प्राप्त करून देणें असेंच सरकारचें नेहमीं धोरण राहील. केवळ ऐतिहासिक परंपरेमुळें म्हणा अगर परिस्थितीमुळें म्हणा, सुसंस्कृत जीवन जगणें ज्यांना अशक्य झालेलें आहे अशा दलित-वर्गाची स्थिति सुधारण्याचा सरकार सातत्यानें प्रयत्न करील. नवबौद्धांच्या सवलतींच्या प्रश्नाचा मी येथें खास उल्लेख करूं इच्छितों. धर्मांतरामुळें त्यांच्या कांहीं अडचणी वाढलेल्या आहेत याची मला जाणीव आहे. सामाजिक वा आर्थिक दृष्ट्या जे दुर्बल आहेत त्यांना साहाय्य करण्याच्या आपल्या धोरणानुसार सरकार नवबौद्धांना सर्व बाबतींत हरिजनांच्या बरोबरीचें समजेल. अर्थात् जेथें असें करणें राज्यघटनेशीं विसंगत होईल त्या बाबी याला अपवाद असतील.

तसेंच गांधीवधानंतर झालेल्या दंगलींत ज्यांची हानि झाली त्यांना दिलेल्या कर्जापैकीं त्यांच्याकडे अद्याप येणें असलेली सर्व बाकी सूट देण्याचा निर्णय सरकारनें महाराष्ट्र राज्यउद्घाटनाच्या या प्रसंगीं घेतला आहे.

आपलें राज्य हें उद्योगधंद्यांच्या बाबतींत भारतांत सर्वांच्या आघाडीवर आहे. राज्यांतील उद्योगधंद्यांचा केवळ राज्याच्याच नव्हे तर देशाच्या अर्थव्यवस्थेवर भलाबुरा परिणाम होतो. उद्योगधंद्याचा पाया बळकट असल्याखेरीज आपल्या पंचवार्षिक योजना पूर्णपणें यशस्वी होऊं शकणार नाहींत. तेव्हां अशा परिस्थितींत औद्योगीकरणाची गति ज्यामुळें रोखली जाईल व

राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर ज्याचा अनिष्ट परिणाम होईल असें कांहीं न करणें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य ठरतें. उत्पादन सारखें होत राहण्यासाठीं व त्यांत वाढ होण्यासाठीं उद्योगधंद्यांचा कारभार सुरळीत चालला पाहिजे, मालक व कामगार यांचे संबंध सलोख्याचे राहिले पाहिजेत. थोडक्यांत म्हणजे औद्योगिक आघाडीवर शांतता नांदली पाहिजे. उद्योगधंद्यांत जर सतत कलहाचें वातावरण राहील तर उत्पादन चालू ठेवणेंच मुश्किल होईल, मग तें वाढविण्याची गोष्ट तर सोडाच. तेव्हां मालक व कामगार या दोघांसहि न्याय्य असेल व सबंध समाजाचेंहि ज्यानें हित होईल असा औद्योगिक समेट निदान पांच ते दहा वर्षें राहणें आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे. कारण अशा परिस्थितींतच उत्पादनाची वाढ निर्विघ्नपणें होत राहील. मालक व कामगार हे दोघेहि जेव्हां समाजाच्या बाबतींतील आपली जबाबदारी ओळखतील तेव्हांच हें साध्य करतां येईल. अशा प्रकारचा औद्योगिक समेट घडवून आणण्यासाठीं मालक व कामगार यांच्या प्रतिनिधींची एक परिषद भरविण्याचा सरकारचा मानस आहे.

देशाच्या स्वातंत्र्यासाठीं ज्या थोर नेत्यांनीं अखंड सायास केले व आपले प्राण खर्ची घातले आणि अशा रीतीनें ज्या स्वराज्याचीं मनसोक्त फळें आपण आज चाखीत आहोंत त्याचा ज्यांनीं पाया घातला, त्यांची स्मृति आज या महान् प्रसंगीं करून या नेत्यांना व विशेषतः राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आपण श्रद्धांजलि वाहूंया. कार्यनिष्ठा व जनतेची सेवा हीं जीं उदात्त ध्येयें त्यांनीं आपल्यापुढें ठेविलीं तीं गांठण्याचा सतत प्रयत्न करूनच आपण त्यांच्या स्मृतीचा खरा आदर करूं शकूं.

महाराष्ट्राची ही भूमि संत, पराक्रमी वीर, त्यागी समाजसुधारक व विद्वान् देशभक्त यांच्या वास्तव्यानें पुनीत झालेली आहे. संत ज्ञानेश्वर, छत्रपति शिवाजीमहाराज, महात्मा ज्योतिबा फुले व लोकमान्य टिळक हीं आमचीं प्रातिनिधिक प्रतीकें आहेत. त्यांनींच महाराष्ट्राच्या संस्कृतीची जोपासना केली व तिचा वारसा आपल्या हातीं दिला. हा अमोल ठेवा आपल्या हृदयांत जपून ठेवणें व त्याचा विकास करणें हें प्रत्येक मराठी माणसाचें आद्य कर्तव्य ठरतें. आज आपलें मराठी भाषी राज्य स्थापन होत असतांना, आपल्या देशाची भरभराट करण्यास व त्याची कीर्ति दिगंत पसरविण्यास


आपलें शक्तिसर्वस्व देऊं अशी आपल्यापैकीं प्रत्येकानें प्रतिज्ञा केली पाहिजे. महाराष्ट्राची व भारताची सेवा करण्याचें व्रत आज आपण घेऊंया व आपलें ध्येय गांठण्याकरितां शक्ति व बुद्धि दे अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करूंया.

जय हिंद !

( १ मे १९६०. मुंबई; शपथविधिसमारंभ)


* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32170 वि: [illegible]
क्रमांक 73321 नों. दि: [illegible]



उत्सव संपला. आतां सर्वांगीण पुनर्घटनेच्या कार्याची जबाबदारी पार पडण्याची वेळ आली. महाराष्ट्रराज्याची स्थापना हें साध्य नसून साधन आहे आणि आधुनिक ज्ञान-विज्ञानावर अधिष्ठित असा शेती व उद्योगप्रधान समाज स्थापन करणें हें ध्येय आहे, याचा उद्घोष यशवंतराव महाराष्ट्रभर करूं लागले. अधिकांचें अधिक हित साधावयाचें असेल, संधि-समानता निर्माण करून केवळ दारिद्र्यामुळें बुद्धि व कर्तृत्व वायां जाऊं नये अशी परिस्थिति उत्पन्न करावयाची असेल तर आधुनिक पद्धतीनें शेती व औद्योगीकरण यांची कांस महाराष्ट्रानें धरली पाहिजे हें सूत्र मुख्य मंत्री सर्वत्र पटवीत होते. शेतीची सर्वांगीण सुधारणा करावी, उत्पादक व ग्राहक यांच्या सहकारी संस्थांचें जाळें सर्वत्र पसरावें, सर्व प्रकारच्या उद्योगधंद्यांना वाव मिळावा व उद्योगधंद्यांची उभारणी शास्त्रीय पायावर करून संशोधनाला वाव मिळावा, महाराष्ट्राच्या हजारो खेड्यांत विद्युद्दीपांचा झगझगाट होऊन अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण या जनतेच्या प्राथमिक गरजा भागवाव्या हें आपलें स्वप्न असल्याचें यशवंतराव सांगूं लागले. महाराष्ट्राच्या सर्व भागांचा विकास संतुलित असावा आणि स्थानिक साधनसामग्री व कर्तृत्व यांचा उपयोग स्थानिक जनतेच्या उद्धारासाठीं व्हावा यावर त्यांनीं कटाक्ष ठेवला. महाराष्ट्रांत नवें वारें निर्माण झालें आहे. येथें संपत्तीची वाण आहे, पण नररत्नांची ती खाण आहे. आणि याच जोरावर महाराष्ट्र संपन्न व बलशाली होईल असा यशवंतरावांचा विश्वास आहे.

* * *



भारत हें एक घर आहे असें आपण मानलें तर ह्या घरांत अनेक दालनें आहेत व त्यापैकी प्रत्येक दालन अशा प्रकारें बांधण्यांत आलें पाहिजे कीं, त्यामुळें त्याचें आणि भारताचें जास्तींत जास्त हित व समृद्धि साधतां येईल.

# उद्योगाचें भव्य मंदिर

स्थानिक विभागांचा विकास ही कल्पना राष्ट्रीय विकासाला मारक नाहीं. वस्तुत: ही समस्या स्थानिक विकास कीं राष्ट्रीय विकास अशी नाहीं, तर देशाचा कोणताहि एक भाग इतर भागांच्या तुलनेनें फार मागें राहातां कामा नये या दृष्टीनें देशाचा एकसंध विकास घडवून आणणें हें या समस्येचें खरें स्वरूप आहे. ज्याप्रमाणें जहाजांच्या संपूर्ण तांड्याची गति सर्वांत कमी वेग असणाऱ्या जहाजानें नियंत्रित राहते अथवा सांखळीचा बळकटपणा हा त्यांतील सर्वांत कमजोर अशा दुव्यावरच अवलंबून असतो, त्याचप्रमाणें संपूर्ण देशाच्या दृष्टीनें विचार केल्यास देशाचें सामर्थ्य हेंहि त्यांतील सर्वांत दुबळ्या घटका-मुळेंच नियंत्रित होत असतें, म्हणून अविकसित विभागांचा व प्रदेशांचा आपण

प्रथम विचार केला पाहिजे. अधिक प्रगति झालेल्या विभागांच्या बरोबर या अविकसित विभागांना आणणें व संपूर्ण प्रदेशाचा समतोल विकास घडवून आणणें हें महाराष्ट्र राज्याच्या धोरणाचें सार आहे.

महाराष्ट्र राज्याबाबत एक चमत्कारिक विरोधाभास दृष्टीस पडतो आणि तो असा कीं, राज्याची राजधानी ही औद्योगिक दृष्टया अतिशय पुढारलेली असली तरी तिच्यालगतचें बरेंच मोठें क्षेत्र अविकसित अवस्थेंत आहे. मुंबई शहराचा विकास करण्यांत निरनिराळ्या जमातींचे व गटांचे प्रयत्न कारणीभूत झाले आहेत या मताशीं मी पूर्ण सहमत आहे. पण त्या बरोबरच उद्योगधंदे चालविण्यासाठीं लागणारी बुद्धि ही कोणा एका जमातीची मक्तेदारी असूं शकते अथवा एखाद्या जमातींत तिचा अभाव असतो असें समजण्याचें कारण नाहीं. महाराष्ट्र राज्यांत आतां समाविष्ट झालेल्या प्रदेशांतील लोकांनीं त्या त्या काळांतील आवाहनास नेहमींच साथ दिली आहे असें आपणांस दिसून येतें. उद्योगधंद्यांच्या गरजेनुसार विज्ञान व तांत्रिक क्षेत्रांतील कौशल्य महाराष्ट्रीय लोक हस्तगत केल्याशिवाय राहणार नाहींत याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. आतां महाराष्ट्रीय लोकांना व्यापाराचा मार्ग न चोखाळतां सरळ मोठ्या उद्योगधंद्यांत प्रवेश करावा लागेल. याकरितां नव्या तंत्रांची व नव्या पद्धतींची गरज आहे. थोडक्यांत, यासाठीं सर्वंकष प्रयत्नांची आवश्यकता आहे. लोककल्याणासाठीं हे प्रयत्न करण्यांत यावेत. हें साध्य करण्यासाठीं सरकार सर्व प्रकारची मदत देण्यास सिद्ध आहे.

तथापि औद्योगीकरणाचा मार्ग सुकर करण्यासाठीं सरकारला आपलें कर्तव्य करतां यावें म्हणून उद्योगपतींपुढील समस्या, त्यांच्या गरजा वगैरेसंबंधीं सरकारजवळ तपशीलवार आणि खात्रीलायक माहिती असली पाहिजे. यासाठीं सरकार आणि सध्यांचे अगर भावी कारखानदार यांच्यामध्यें परिणामकारक आणि सतत देवाणघेवाण चालू राहिली पाहिजे. महाराष्ट्राच्या भूमीवर उद्योगाचें भव्य मंदिर उभारण्यासाठीं ज्या प्रश्नांत सरकारकडून मार्गदर्शन, मदत आणि उत्तेजन हवें असेल अशा प्रश्नांच्या संबंधित बाजूंकडे या परिषदेंत लक्ष वेधण्यांत यावें.

उद्योगधंदे सुरू करण्याच्या उपक्रमांत, विशेषतः शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या धंद्यांत, सहकारी संघटनेला फार महत्त्व आहे. उद्योगधंद्यांची

सहकारी तत्त्वावर कशी परिणामकारक संघटना होऊं शकते हें या राज्यानें दाखवून दिलें आहे.

सहकारी चळवळ ही मूलत: जनतेच्या स्वत:च्या प्रयत्नावर आधारलेली असली तरी सरकारहि तिचें फार काळजीपूर्वक संगोपन करीत आहे. याला अनेक कारणें आहेत. पहिलें म्हणजे शेतकऱ्याला उद्योगधंद्यांत पैसे गुंतविण्यास लावण्याचा हाच एक मार्ग आहे. तसेंच यामुळें ग्रामीण व शहरी मूल्यांत असलेलें अंतर नष्ट होतें आणि शहर व खेड्यांतील लोक एका पातळीवर येतात. वाढलेलें उत्पन्न सहकारी संघटनेमुळें शक्य तितक्या जास्त क्षेत्रांत वांटलें जातें व खऱ्या अर्थानें समाजवादी पद्धतीच्या समाजरचनेचा उद्देश साध्य होतो.

निव्वळ औद्योगिक अर्थकारणाच्या दृष्टिकोणांतून पाहिलें तरीहि या संघटनेनें कच्च्या मालाचा नियमित पुरवठा करण्याच्या कामीं अतिशय उत्तम कार्य करून दाखविलें आहे. सहकाराचा अवलंब करणारा शेतकरी हा उत्पादक असतो आणि उत्पादन केलेल्या मालावर तोच संस्कार करतो. त्यामुळें औद्योगीकरणाच्या प्रक्रियेंत सहजच कार्यक्षमता व गति निर्माण होते.

शहरी कामगाराला काम पुरविणें हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. तिसऱ्या योजनेच्या काळांत कामगारांची संख्या आठ लाखांनीं वाढेल. या वाढत्या संख्येला सामावून घेणें हें फार बिकट आहे. तेव्हां कारखाने व त्यांपासून निर्माण होणारे दुय्यम उद्योगधंदे यांत नवीन कामगार वर्गाला सामावून घेण्याची जबाबदारी खाजगी उद्योगधंद्यांना उचलावी लागेल.

सबंध मानवी समाजाचें कल्याण हें आपलें अंतिम ध्येय असून आर्थिक विकास हें तें ध्येय साध्य करण्याचें एक साधन आहे. त्यामुळें सामाजिक समस्यांच्या संदर्भांत आर्थिक समस्यांची पाहणी करणें आवश्यक आहे.


ह्या विषयीं बोलतांना मी एका गोष्टीकडे लक्ष वेधूं इच्छितों. ती म्हणजे बंद पडणाऱ्या कापडगिरण्या. या गिरण्या बंद कां पडल्या याच्या कारण-मीमांसेंत मी शिरत नाहीं. परंतु एवढें मात्र खरें कीं, मोठमोठ्या गिरण्या व कारखाने जर बंद पडूं लागले आणि अनेक लोक त्यामुळें रस्त्यावर उघडे पडूं लागले तर त्याचे सामाजिक परिणाम फार तीव्र व दूरगामी ठरतात. म्हणून

अशी परिस्थिति निर्माण होणार नाहीं असा कांहीं तरी मार्ग शोधून काढणें आवश्यक आहे.

आतां या राज्याशीं खास संबंधित असलेल्या एका गोष्टीकडे मी आपलें लक्ष वेधूं इच्छितों. भारतांत होणाऱ्या कपाशीच्या उत्पादनापैकीं पंचवीस टक्के कापूस या राज्यांत होतो. म्हणून येथील कापसाचें पीक संपूर्ण देशाच्या, तसेंच विशेषत: या राज्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें ठरतें. तथापि, अलीकडे कपाशीचें उत्पादन घटलें आहे आणि म्हणून आपण त्यासंबंधीं विचार करणें आवश्यक आहे.

( ७ मे १९६०. मुंबई : ' इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम् ' व 'साधना' साप्ताहिकातर्फे परिसंवाद )

* * *



महाराष्ट्र राज्यस्थापनेचा उत्सव संपला आहे. माझ्यापुरतेंच बोलावयाचें तर नव्या महाराष्ट्र राज्याची स्थापना ही केवळ मराठी भाषिकांच्या दीर्घकालीन इच्छेची पूर्ति आहे एवढेंच मी मानीत नाहीं, तर महाराष्ट्रांतील

# संधि आणि आव्हान

लोकांना विधायक विचार व मुत्सद्देगिरी प्रदर्शित करण्याची ही एक मोठी संधि आली आहे आणि त्याचबरोबर तें एक मोठें आव्हान आहे असें माझें मत आहे.

शेतकरी, शेतमजूर, उद्योगपति, कारखान्यांतील मजूर, व्यापारी, व्यावसायिक व बौद्धिक काम करणारे, अशा सर्व प्रकारच्या थरांतील व वर्गांतील लोकांना हें खरोखरच आव्हान आहे. आणि ज्यास बुद्धिजीवि वर्ग म्हणतात, त्यावर तर खास स्वरूपाची जबाबदारी आहे. सार्वजनिक स्वरूपाच्या प्रश्नासंबंधीं नेतृत्व करणें हा त्यांचा हक्क आहे, त्याचप्रमाणें तें त्यांचें कर्तव्य आहे. जे महत्त्वाचे प्रश्न आपल्यापुढें आहेत त्यांची चर्चा करून, त्यासंबंधीं निश्चित दृष्टिकोण तयार करण्यासाठीं आणि जनमत बनविण्याच्या कामीं पुढाकार

घेण्यासाठीं या वर्गानें पुढें आलें पाहिजे.

आर्थिक दृष्टीनें विचार केला तर कांहीं भाग अविकसित व मागासलेले आहेत. कांहीं विभागांप्रमाणें कांहीं विशिष्ट वर्ग मागासलेले आहेत. त्यांच्या प्रगतीसाठीं विशेष प्रयत्न करावे लागतील. या मागासलेल्यांत मी सामाजिक-प्रमाणेंच आर्थिक दृष्ट्याहि मागासलेल्यांचा समावेश करतों. सामाजिक न्यायाच्या आपल्या कल्पनेचा संधिसमानता हा प्रमुख घटक आहे. आणि म्हणून केवळ दारिद्र्यामुळें, पैशाच्या अभावामुळें कोणाची बुद्धि, कर्तृत्वशक्ति वायां जाणार नाहीं अशा प्रकारची परिस्थिति महाराष्ट्रांत निर्माण करण्या-साठीं आपण झटलें पाहिजे.

औद्योगिक विकासाची गति अबाधित ठेवण्याचा नव्हे तर ती वाढविण्याचा आमचा कृतनिश्चय आहे. नवे उद्योगधंदे स्थापन व्हावे व सध्यां अस्तित्वांत असलेले वाढवावेत म्हणून कांहीं सोयी व सवलती उपलब्ध करून द्याव्या लागतील. उद्योगधंद्यांची वाढ करून रोजगारी वाढवीत असतांना सामाजिक न्यायाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. विकास व सामाजिक न्याय परस्पर-विरोधी नाहींत.


शेतीचेहि कांहीं प्रश्न आहेत. पाणीपुरवठा व जमिनींत ओलावा टिकविणें हे फार महत्त्वाचे प्रश्न आहेत. पाणीपुरवठ्याच्या योजना अंमलांत येत आहेत व अधिक मोठ्या योजना हातीं घेतल्या जातील. ताली बांधणें व भूसंरक्षण करणें हेंहि कार्य चालू आहे. सुधारलेल्या शेतीचा प्रसार करणें अगत्याचें आहे.

चांगल्या व विशुद्ध शासनाची उभारणी हें महाराष्ट्रसरकारचें प्रमुख ध्येय आहे. ग्रामपंचायती, सहकारी संस्था व इतर स्थानिक स्वराज्य-संस्था यांना चालना , स्थानिक उपक्रमशीलता व साहस यांना उत्तेजन, अधिकाराचें विकेंद्री-करण हीं उद्दिष्टें राज्याचा कारभार चालवितांना सतत लक्षांत ठेविलीं जातील.

आपल्यापुढें जें प्रचंड कार्य आहे तें लक्षांत घेतां पक्षपाती, गटवार विचारांना आपण महत्त्व देतां कामा नये. बरेचसे मतभेद मामुली स्वरूपाचे असतात. पण राष्ट्रीय पुनर्घटनेच्या कार्यात निदान जें कार्य अविवाद्य आहे त्या कार्यांत सर्व राजकीय पक्षांच्या व विचारप्रणालींच्या कार्यकर्त्यांनीं सहकार्य करावयास हवें.

( १७ जून १९६० मुंबई · महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषद् )

* * *



लोकसंख्या व जनतेच्या आर्थिक व सामाजिक स्थितीविषयींची माहिती गोळा करण्याचा उपक्रम हा कांहीं केवळ आधुनिक काळांतच सुरू झाला नाहीं. मौर्यांच्या काळांत सरकारच्या उपयोगासाठीं जन्म-मृत्यूंच्या नोंदी

# जनगणना

कांटेकोरपणें केल्या जात असत. इ. स. पूर्वी ३०० वर्षें जनगणना कशी होत असे, त्याचप्रमाणें आर्थिक व शेतीविषयक माहिती कशी गोळा केली जाई याचा तपशीलवार उल्लेख कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रां'त सांपडतो. तथापि पुढें ही पद्धति चालू राहिली नाहीं. युरोपांतहि प्राचीन काळांत जनगणना होत होती. तथापि आधुनिक पद्धतीनें पहिली जनगणना कॅनडाचा एक प्रांत नोव्हा-स्कोशिया यांत झाली व नंतर अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स येथें १७९०, १८०१ व १८११ या क्रमानें जनगणना होऊं लागली. भारतांतील पहिली जनगणना १८७२ त झाली. तथापि देशव्यापी शिरगणती १८८१ मध्यें करण्यांत आली. त्यानंतर दर दहा वर्षांनीं शिरगणती केली जाते.


आशिया व अतिपूर्व म्हणून समजल्या जाणाऱ्या देशांत नव्यानेंच लोकशाही राजवटी स्थापन झाल्या आहेत आणि या देशांच्या दृष्टीनें जनगणनेला विशेष महत्त्व आहे. ज्या देशांनीं नियोजनाचा अवलंब केला आहे त्यांना जनगणना विशेषच उपयुक्त आहे.

या परिसंवादाला जमलेल्या बहुतेक प्रतिनिधींच्या देशांसमोर लोकसंख्येची वाढती गति आणि ग्रामीण भागांकडून शहरांकडे वाढलेला लोकांचा ओघ हे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न आहेत.

या देशांत आम्हीं आर्थिक नियोजनाचें कार्य सुरू केलें आहे. तें करीत असतां अपुऱ्या माहितीमुळें अनेक अडचणी निर्माण होत असतात. गेलीं ८० वर्षें जनगणना होत आहे, पण लोकसंख्येच्या वाढीचें निश्चित प्रमाण काय आहे तें कळूं शकलेलें नाहीं, आणि आर्थिक नियोजन करावयाचें तर हें प्रमाण समजणें अत्यावश्यक आहे.

( २० जून १९६०. मुंबई; आशिया खंडांतील जनगणना–परिसंवाद )

* * *



महाराष्ट्र राज्यांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठीं करावयाच्या खर्चाचीं लक्ष्यें आम्हीं गांठलीं आहेत. योजनेच्या पहिल्या चार वर्षांत एकंदर २०४ कोटि रुपयांपैकीं १४७ कोटि रुपये खर्ची पडले असून उरलेल्या वर्षांत ५७

# योजनेची गति व पूर्ति

कोटि रुपये खर्च होतील. तथापि आर्थिक लक्ष्यें गांठलीं गेलीं तरी प्रत्यक्ष कामाचीं लक्ष्यें गांठण्याबाबत किंवा जनतेची मानसिक तयारी करण्याबाबत समाधान वाटण्याजोगी परिस्थिति नाहीं.

योजनेंत शेतीची सुधारणा व औद्योगिक विकास यांवर भर दिलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रांत खडकवासला, वीर, गिरणा इत्यादि पाणी-पुरवठ्याच्या योजना प्रगत अवस्थेंत आहेत. मराठवाड्यांत मध्यम व छोट्या अशा एकंदर तेरा योजनांचें काम चालू आहे. विदर्भांतहि अशाच योजना अंमलांत येत आहेत. कोयना ही राज्यांतील सर्वांत मोठी विद्युत्‌योजना आहे. तिचें काम समाधानकारक आहे. पूर्णा योजनाहि चांगली प्रगति करीत आहे

सहकारी शेतीबाबतचें लक्ष्य आम्ही गांठूं असा आम्हांस विश्वास वाटतो.


प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रांत आश्चर्यकारक प्रगति होत आहे. तांत्रिक शिक्षणांत मागें राहूं नये म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोंत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस प्रत्येक जिल्ह्यांत एक तरी पॉलिटेक्निक शिक्षणसंस्था झालेली दिसेल. आणि इंजिनियरिंग कॉलेजांची संख्याहि बरीच वाढेल.

सामूहिक विकास योजना पूर्णत: यशस्वी झाल्या असें म्हणतां येणार नाहीं. या योजनांमुळें रस्ते, पाणी, शाळा इत्यादि प्राथमिक गरजा भागविण्याची सोय झाली असेल, पण या सोयी उपलब्ध झाल्यानें सामूहिक विकासयोजना शंभर टक्के यशस्वी होते असें नाहीं. विशिष्ट प्रकारची प्रवृत्ति आणि स्वावलंबनाची दृष्टि निर्माण करणें हा योजनांचा उद्देश आहे. तो सफल झाला कीं नाहीं हा खरा प्रश्न आहे.

मुंबई शहर व उपनगरें यांच्या सुधारणेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. आम्हीं श्री. बर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली आहे. मुंबईंतील गर्दी कमी करणें व घरांच्या टंचाईची समस्या सोडविणें अगत्याचें आहे. नव्या कारखान्यांची स्थापना मुंबईबाहेर करण्यास आम्ही उत्तेजन देत आहोंत आणि निवासस्थानांचा प्रश्न म्हणाल तर तो बिकट व प्रचंड स्वरूपाचा आहे. त्यासाठीं सरकारशीं सर्वांनीच सहकार्य केलें पाहिजे.

( २७ जुलै १९६० : आकाशवाणी, मुंबई )

* * *



सहकार हा जीवनाप्रमाणेंच सर्वव्यापी आहे. आर्थिक लोकशाहीचा तो एक प्रकार आहे. सहकारी चळवळींची सुरुवात ग्राहकांच्या सहकार्यांतूनच झाली आहे. उत्पादकांच्या सहकारी संस्था कांहीं विशिष्ट वर्गापुरत्या मर्यादित

# आर्थिक लोकशाही

असतात तर ग्राहक सहकारी संस्थांचें आवाहन सर्वांनाच असतें. अनेक देशांच्या अनुभवावरून असें दिसून आलें आहे कीं, ग्राहक सहकारी संस्थांमुळें चांगला माल माफक दरांत मिळविण्यास त्या विशेष उपयुक्त ठरतात.

आपल्याकडे १९५१–५२ मध्यें धान्यावरील नियंत्रणें उठल्यानंतर ग्राहक सहकारी संस्था मागें पडत गेल्या. सध्यां त्यांची स्थिति थोडी सुधारली आहे पण याला सरकारचें धोरण कारणीभूत आहे. ही सुधारणा कायम स्वरूपाची नाहीं. परंतु एकंदरीत विचार केला तर या चळवळींत मूलत. कांहीं दोष नाहीं

बऱ्याच वेळां व्यापारव्यवहाराचें अज्ञान, व्यवस्थापकांत कार्यक्षमता व अनुभव यांचा अभाव, उधारीचा मोठा व्यवहार आणि सभासदांत निष्ठेचा अभाव या व अशा अनेक कारणांमुळें ग्राहक सहकारी संस्था डबघाईला येतात.

रोखीच्या व्यवहारालाहि कांहीं मर्यादा आहेत. आपले बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून असतात व पीक वर्षांतून एकदां येतें म्हणून रोखीचा व्यवहार त्यांना परवडत नाहीं. जर फेरीवालेहि उधार देतात तर सहकारी संस्थांनीं ती कां नाकारावी ? सभासदांची सहकारी संस्थेवर निष्ठा असावी हें बरोबर आहे, पण बरेच वेळां या संस्था आपल्या सभासदांना खाजगी व्यापाऱ्यांकडे जाण्यास भाग पडेल असें वागतात. सहकारी संस्थांचा फायदा सभासदांना अनुभवास आला पाहिजे.

ग्राहक सहकारी संस्थांना माफक दरांत माल मिळावयाचा असेल तर उत्पादक सहकारी संस्थांशीं त्यांचें निकटचें सहकार्य व्हावें. उत्पादक व ग्राहक यांच्यांतील सहकार्याला मर्यादा आहेत, तसेंच दोघांच्या हितसंबंधांत कांहींसा विरोध आहे. पण त्यामुळें सहकारी चळवळीच्या या दोन अंगांत अडथळा निर्माण होतां कामा नये.

कांहीं विशिष्ट परिस्थितीमुळें सरकारला व्यापारांत कांहीं बाबतींत पडावें लागलें आहे. पण मिरासदारी होणार नाहीं व वैयक्तिक निवडीच्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाहीं हेंहि पाहिलें पाहिजे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या सहकारी चळवळीचा आज उपयोगच होत आहे.

( १५ सप्टेंबर १९६०. मुंबई : ग्राहक सहकारी संस्था—परिसंवाद )

* * *



आपल्या राज्यांत थोडयाफार प्रमाणांत सत्तेचें विकेंद्रीकरण पूर्वीच झालेलें असलें तरी आतां जिल्हा व त्याखालच्या पातळीवरील लोकशाही संस्थांना त्यांच्या विभागांत विकासयोजनांबाबत अधिक सत्ता व जबाबदाऱ्या

# लोकशाही विकेंद्रीकरण

सोपवाव्या किंवा काय याचा विचार करण्याची वेळ आली आहे. ग्रामसुधारणा व ग्रामकल्याण याबाबतच्या कार्यक्रमांत ग्रामीण जनतेचा पुढाकार आणि सहकार्य या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत हें सत्य नाकारतां येत नाहीं. स्थानिक जनतेचा पुढाकार आणि सहकार्य यांना भरपूर वाव देण्याच्या दृष्टीनें विविध पातळीवर जनतेच्या संस्था कशा संघटित करतां येतील याचा आपण विचार केला पाहिजे.


गेल्या कांहीं वर्षांत सामूहिक विकासयोजना हातीं घेतल्यापासून ग्रामीण विभागांतील जनतेंत स्वावलंबनाची वृत्ति निर्माण झाली आहे यांत शंका नाहीं. ग्रामीण विभागांतील विकासकार्याबाबत ग्रामीण जनता ज्या तऱ्हेनें

आपला उत्साह प्रगट करीत आहे तो पाहतां आपणांस स्थानिक गरजांबाबत त्वरित निर्णय घेतां आला पाहिजे आणि आपल्या कार्यक्रमाच्या अंमल-बजावणीचा वेग वाढवितां आला पाहिजे. लोकशाही तत्त्वानुसार होणाऱ्या विकेंद्रीकरणाचें सारें यश या गोष्टी ज्या प्रमाणांत साध्य होतील त्यावर अवलंबून आहे. आपल्या राज्यांतील ग्रामीण विकासकार्याशीं असलेल्या विविध संस्थांची पुनर्घटना सद्यःस्थितीशीं सुसंगत रीतीनें कशी करावी कीं ज्यायोगें त्या संस्थांवर ग्रामीण विकासकार्याची अधिकाधिक जबाबदारी आपण सोपवूं शकूं आणि आपल्या कार्यपद्धतींत अधिक वेग आणि कार्यक्षमता आणूं हें ठरवावयास हवें.

आपण आर्थिक दृष्टया अप्रगत आहोंत आणि म्हणूनच आपल्या संस्थांनीं सेवावृत्तीनें काम करणें जरूर आहे. आपल्या समाजांत सेवाभावी मंडळींची उणीव आहे असें नाहीं. मात्र अशा व्यक्तींना काम करण्याची संधि मिळाली पाहिजे. निरनिराळ्या पातळीवरील लोकशाही संघटना या कल्याणकारी संघटनेच्या महत्त्वाच्या घटक आहेत. त्यांना तांत्रिक सल्ला व जरूर तें मार्ग-दर्शन मिळावें व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचें कार्य जनहिताला पोषक होईल या कसोटीवर नियंत्रित असलें पाहिजे.

( ३ ऑक्टोबर, १९६० ; मुंबई : परिसंवाद )

* * *



भारत हा शेतीप्रधान देश आहे असें आपण कांहींशा अभिमानानें आजपर्यंत म्हणत आलों. परंतु आतां जमाना बदलला आहे. या युगांत देशाच्या अर्थ-व्यवस्थेंत शेतीबरोबरच कारखानदारी उद्योगधंद्यांचें स्थानहि फार महत्वाचें

# विरोधी द्वंद्व-समास नाही

आहे. 'शेती कीं उद्योगधंदे ? ' असा विरोधी द्वंद्व-समास नसून या दोन्हींची सांगड घातली गेली पाहिजे. शेतींतून कच्च्या मालाचें भरपूर उत्पादन झालें पाहिजे व या कच्च्या मालाचें पक्क्या मालांत रूपांतर करणारे उद्योगधंदे देशांत निघाले पाहिजेत, असें या प्रश्नाचें थोडक्यांत स्वरूप आहे.

शेतीच्या विकासाचीं स्थूलमानानें दोन अंगें आहेत. एक म्हणजे शेतीच्या म्हणजे पर्यायानें पीक लागवडीच्या पद्धतींची सुधारणा व दुसरें म्हणजे जमीन-विषयक सुधारणा. पहिलें अंग तांत्रिक स्वरूपाचें तर दुसऱ्याचें स्वरूप जसें आर्थिक तसें सामाजिकहि आहे. आपल्याकडे शेतकीसंशोधन मुख्यत: शासनाच्या पातळीवरच होत आहे. पण संशोधनाचे निष्कर्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोंचविण्याची यंत्रणा सध्यांपेक्षां पुष्कळच अधिक व्यापक व कार्यक्षम झाली पाहिजे.

शेतीच्या लागवडींत मुख्यत: सुधारलेल्या बियाणांचा वापर, सुधारलेल्या अवजारांचा वापर आणि मशागतीच्या सुव्यस्थित व शास्त्रीय पद्धतींचा

अवलंब या तीन गोष्टींचा समावेश होतो. शेतीविकासाच्या दृष्टीनें आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या जमिनीतून पैदास करावयाची त्या जमिनीची सुधारणा ही होय. शेती म्हणजे पावसावरील जुगार होय असें म्हणून हताश होऊन बसण्यानें आतां भागणार नाहीं. निश्चयाचें बळ असेल तर डोंगरसुद्धां हलवितां येतील असें आपण म्हणतों, तर मग जमिनीला बांधताली कां घालतां येणार नाहींत? मात्र निश्चय करावयाला हवा. बांधबंदिस्तीनें एकरीं २० ते २५ टक्के उत्पादनांत कायमची वाढ होते हा मोठा फायदा लक्षांत घेतां शेतकऱ्यानें खर्चाचा आपला वांटा उचलतांना मागेपुढें पाहण्याचें कारण नाहीं.


पाणीपुरवठ्याची कमतरता ही महाराष्ट्रांतील शेतीची एक प्रमुख समस्या आहे. सध्यां राज्यांतील एकूण लागवडीयोग्य जमिनीपैकीं अवघ्या पांच-सहा टक्के जमिनीस पाणीपुरवठ्याची सोय आहे. पाणीपुरवठ्याच्या सर्व योजना अंमलांत आल्यावरहि जास्तींत जास्त वीस टक्के जमिनीस पाणीपुरवठा होईल. तेव्हां बांध-बंदिस्तीसारखे जमीनसंरक्षणाचे उपाय व कोरडवाहू पद्धतीची शेती यांचा अवलंब करूनच उरलेल्या ऐंशी टक्के जमिनीचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटूं शकेल.

शेतीचे पडलेले छोटे छोटे तुकडे ही आणखी एक कूट समस्या आहे. तेव्हां जमिनीचें एकत्रीकरण होऊनहि कसवटीसाठीं लागणारें भांडवल, बीं-बियाणें, खतें व अवजारें यांची खरेदी, शेतीमालाची विक्री इत्यादीबाबतच्या शेतकऱ्याच्या गरजा पण समाधानकारकपणें भागतील. या दृष्टीनें सहकारी शेती हाच या प्रश्नावर तोडगा आहे.

सहकारी शेतीच्या योजनेंत अभिप्रेत असल्याप्रमाणें भूमिहीन शेतमजूर वा छोटे जमीनमालक यांनीं आपले सहकारी संघ स्थापन केले म्हणजे जमिनीचे संचयित विभाग विस्तृत होऊन कसवटीसाठीं मोठें क्षेत्र मिळून उत्पादन वाढविण्याचें अंतिम ध्येय साध्य होण्यास साहाय्य होईल. सहकारी शेतीचा हा प्रयोग लोकांच्या संमतीनें व क्रमाक्रमानें अंमलांत आणावयाचा आहे.

शेती हा ग्रामीण विकासाचा गाभा आहे व या गाभ्याभोंवतीं छोट्या उद्योगधंद्यांची इमारत उभारली पाहिजे. शेतीला उद्योगधंद्यांची जोड दिल्यानंतर या कार्यक्रमाला गति आणण्यासाठीं ग्रामीण विद्युतीकरणाच्या योजनेला प्राधान्य देणें आवश्यक आहे.

* * *



महाराष्ट्राच्या पांच सहा शहरांत उद्योगधंदे मुख्यत: चालू आहेत. पण म्हणून हा संतुलित विकास नव्हे. विकासाचा हा बिघडलेला तोल सांवरणें जरूर आहे.

# छोटे उद्योगधंदे

कारखान्यांचा विचार करतांना मजुरांच्या निवासस्थानांचा प्रश्न उभा राहतो. हीं निवासस्थानांची सोय उपलब्ध करून देण्याची कारखानदारांवर सक्ति करणें ही अकरणात्मक दृष्टि असल्याची टीका होते. पण ती अकरणात्मक दृष्टि नसून करणात्मक –विधायक– अशीच आहे. बृहन्मुंबईंत पदपथावर राहणारांची अंदाजें संख्या सात लाख आहे. तेव्हां कामगारांना निवासस्थानें पुरविल्यानें त्यांची कार्यक्षमता व उत्पादन वाढणार आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे.

छोटया उद्योगधंद्यांचा विकास ही सरकारपुढील एक महत्त्वाची बाब आहे. उद्योगधंद्यांच्या हितसंबंधांकडे आमचें लक्ष असलें तरी छोटया धंद्यांच्या वाढीकडे आमचें विशेष लक्ष आहे. महाराष्ट्रांतील डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीज

व केंद्र सरकारचें स्मॉल स्केल इंडस्ट्रीज बोर्ड यांचें सहकार्य आहे. त्यामुळें राज्यांतील छोटया धंद्यांना केंद्र सरकारच्या निकट सहकार्याचा फायदा मिळूं शकतो. परकी चलनाची चणचण व तंत्रज्ञांचा अभाव यामुळें मोठे कारखाने स्थापन होण्यांत अडचणी येतात. त्यांतच समाजवादी समाजरचनेच्या उद्दिष्टां-साठीं ग्रामीण भागांत छोटया उद्योगधंद्यांचा प्रसार व्हावयास हवा. म्हणून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठीं विविध उपाय योजिले जात आहेत.

निसर्गानें महाराष्ट्रास अशुद्ध लोखंड, कोळसा, जंगलें इत्यादि साधन-संपत्ति दिलेली आहे. इलेक्ट्रिक ग्रिडच्या बाबतींतहि आपण अगोदर सुरुवात केल्यानें निरनिराळ्या विभागांत उद्योगधंदे स्थापन करण्यासाठीं लागणारा वीजपुरवठा आपण करूं शकतों. नागपूर विभागांत परकी चलन मिळवून देणाऱ्या मँगॅनीजच्या खाणी आहेत. सध्यां त्यांना कांहीं अडचणी सोसाव्या लागतात, पण त्या लवकरच दूर होतील. नव्या प्रकारचा लोखंड व पोलाद कारखाना या भागांत काढण्यास केंद्रसरकारनें अनुमति दिलेली आहे. सीमेंटचा कारखानाहि स्थापन होत आहेच. अशा प्रकारें नागपूर विभागाचा कायापालट होत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेबाबतच्या सल्लागार समितीनें तयार केलेल्या अहवालांत महत्त्वपूर्ण शिफारसी आहेत आणि त्या अंमलांत आणणें शक्य आहे. तसें झाल्यास या भागांत आणखी मोठे कारखाने स्थापन होतील. कोणाहि उद्योगपतीला राज्याच्या कोणत्याहि भागांत कारखाना काढावयाचा असेल तर सोयी नाहींत म्हणून त्याला तक्रार करावयास जागा राहूं नये असा महाराष्ट्र सरकारचा निश्चय आहे.

आपल्याला मोठे उद्योगधंदे हवे आहेत; पण ग्रामीण बेकारी नाहींशी करून लोकांच्या राहणीचा दर्जा सुधारावयाचा असेल तर आपणांस छोटया उद्योग-धंद्यांवर अवलंबून राहावें लागेल. बिहारचें उदाहरण घ्या. तेथें मोठे कारखाने आहेत पण लोक गरीब आहेत. याउलट पंजाबमध्यें मोठे कारखाने नाहीत पण तेथील दरडोई उत्पन्न मोठें आहे, कारण छोटया उद्योगधंद्यांचें जाळें पसरलेलें आहे. विदर्भांतील जमीन सुपीक आहे व म्हणून पंजाबप्रमाणेंच त्याचा विकास व्हावा असें मला वाटतें. सहकारी तत्त्वावर छोटे उद्योगधंदे सुरू करण्याबाबत बराच उत्साह विदर्भांत दिसतो. तथापि सरकारची मर्यादित साधनसामग्री लक्षांत घेतां सर्वत्र औद्योगिक वसाहती स्थापतां येणार नाहींत, तर निवडक

विभागांत त्या प्रथम स्थापन कराव्या लागतील.

ग्रामोद्योगाचा विचार करतां विदर्भांत हातमागाचा धंदा फार मोठा आहे. तेव्हां हातमागधंद्यांतील उणीवा, त्याच्या अडचणी यांचा विचार करून विणकर समाजाचे प्रश्न सोडवावे लागतील.

विणकर समाज हा नागपूर-विदर्भ भागांतील महत्त्वाचा घटक आहे आणि त्याचे प्रश्न सुटले पाहिजेत. विणकर समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रश्नांच्या विचाराला चालना मिळावी एवढाच माझा हेतु आहे, कोणाच्या हातून हे प्रश्न सुटतात यांला मी महत्त्व देत नाहीं. विणकर समाजांत नित्य चालणारें काम निर्माण व्हावें एवढेंच उद्दिष्ट मी मनाशीं बाळगून आहें.

विणकरांच्या समस्येचें स्वरूप तिहेरी आहे. एक आर्थिक स्वरूपाचा प्रश्न. या प्रश्नाशीं हँडलूमचा धंदा निगडित आहे. दुसरा, सामाजिक व शैक्षणिक विकासाला वाहून घेतलेली संस्था दिसत नाहीं, हा. तिसरा प्रश्न सर्वसामान्य स्वरूपाचा आहे; विदर्भांतील आणि नागपुरांतील एकंदर समाजात विणकर समाजाचें स्थान काय ? हा प्रश्न अंशत: राजकीय आहे, पूर्णतया राजकीय नाहीं.

आर्थिक प्रश्न हा सहकारी चळवळीशीं निगडित असून त्या चळवळीची आजची स्थिति काय आहे हें पाहिलें पाहिजे आज विणकराचा धंदा कच्च्या स्थितींत आहे. त्याच्या मालाला बाजारपेठ चांगली आहे. चांगला माल निर्माण करणाऱ्या विणकऱ्यांची परिस्थिति चांगली नसेल तर ती कां नाहीं ? त्यासाठीं कोणता बदल केला पाहिजे ? शैक्षणिक प्रश्नाचें स्वरूप काय आहे ? इत्यादि प्रश्न मनांत येतात.

पहिले दोन प्रश्न आपण एकीनें सोडवावयाचे म्हटलें तर तिसरा प्रश्न सहज सुटेल. पॉवरलूमनें हँडलूमशीं स्पर्धा केली आहे. पॉवरलूम आणणें इष्ट कीं अनिष्ट ? त्यामुळें हातमाग बंद पडतील काय ? अशांसारखे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

शिक्षण वाढतें तशी सुशिक्षित मुलांची संख्या वाढते. मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या मुलांचा प्रश्न विणकर समाजांत निर्माण झाला आहे. मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या मलाचा उपयोग त्याच्या घरच्या धंद्याला होत नाहीं आणि तो दुसरीकडे कोठें

सामावला जात नाहीं, असें समाजांत सर्वत्र आढळतें. असा एक वर्ग विणकर समाजांत असमाधानी आहे. हा वर्ग तरुण असल्यानें त्याची असंतुष्टता कोठून तरी रस्ता काढण्याचा प्रयत्न करीत असते. त्यामुळें त्याचा प्रश्न अधिकच बिकट होत जातो.

विणकरांच्या शिक्षणासंबंधींच्या श्री. धोंडीबा हेडाऊ यांच्या योजनेला माझा पाठिंबा आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षणसंस्थांना सामान्यतः जी मदत देतें, तीहून अधिक मदत या संस्थेला मिळाली पाहिजे व तशी मदत महाराष्ट्र सरकार करील असें मी जाहीर आश्वासन देतों.

उत्पादक आणि गिऱ्हाईक यांमधील अडत्यांचा दुवा उत्पादकाला अनिष्ट ठरणारा असतो, असें माझें मत आहे. भारतांतील लहान माणसाचें अर्थशास्त्र सहकाराशिवाय सुटणार नाहीं. साहजिकच सहकारी आंदोलनाचा विकास करणें हें आमचें कर्तव्य राहील. पण त्याचा अर्थ असा नव्हे, कीं, बिनसहकारी क्षेत्राला मदत करावयाची नाहीं.

विणकरांच्या प्रश्नाच्या या चर्चेत राजकारण नाहीं. लोकांचा माझ्यावर विश्वास बसला तर मला हवाच आहे. त्यासाठीं मी खटपट करणेंहि अयोग्य ठरणार नाहीं. आमच्या कारभाराची मूळ कसोटीच मुळीं ही आहे कीं, आमचें सरकार गरिबांसाठीं काय करतें ? जेथें दुःख असेल, अन्याय झाला असेल तेथें धांवून गेलें पाहिजे असें आमचें धोरण आहे. आणि माझ्या शक्त्य-नुसार व समजुतीनुसार मी तें अंमलांत आणण्याचा प्रयत्न करीत आहें.

(१२ ऑगस्ट १९६०, ८ डिसेंबर १९६०, २४ डिसेंबर १९६०: मुंबई व नागपूर)

* * *

" कोणत्याहि बाबतींत 'नाहीं' म्हणावयाचें माझ्या जिवावर येतें. 'हो' म्हणतां आलें तर फार बरें अशी माझी कळकळीची इच्छा असते, कारण 'नाहीं' चें 'हो' करवून घेण्यासाठींच हें राज्य निर्माण झालें आहे.

राज्य त्रिनपायरीचें असावें ही इच्छा आहे म्हणून श्रेणीची भाषा मला पसंत नाही. सरकारी नोकरानीं निरनिराळ्या घटकांत सहकार्य निर्माण करावें. जनतेशीं वागण्याची कर्मचाऱ्यांचीं पद्धत बदलली पाहिजे. आम्हांला शासन अधिकाधिक जनताभिमुख करावयाचें आहे. "



या प्रसंगीं मी असें म्हणेन कीं, आपल्या शाखा जर वाढवावयाच्या असतील तर, किंवा काम जर वाढवावयाचें असेल तर, तें या जमिनीमध्यें—या महाराष्ट्रांत —जर आपण आपल्या मुळ्या बळकट केल्यात तर त्यामुळें आपल्या वर

# बँकांकडून अपेक्षा

वाढणाऱ्या शाखांना जास्त शक्ति येणार आहे. महाराष्ट्राची आर्थिक स्थिति संपन्न करण्याचें काम करणें हें शेवटीं देशाचेंच काम करण्यासारखें आहे. ज्या प्रमाणामध्यें आमची ही शक्ति आणि आर्थिक साधनें आम्ही अधिक विस्तृत करूं, समर्थ करूं, त्या प्रमाणामध्यें राष्ट्राच्या खांद्यावरचें ओझें आम्ही कमी केलें आहे असें नाहीं का होणार ? आणि जर कदाचित् आम्हांला आमची शक्ति पार पाडण्याइतकीं साधनें आम्हांला निर्माण करतां आलीं तर त्यांतला कांहींसा हिस्सा आम्ही देशाच्याहि मदतीला जरूर देऊं; आमच्या देशाचा जो कांहीं एक संदर्भ आहे, कामाचा, उद्योगाचा, भावनेचा, श्रद्धेचा तो संदर्भ विसरून आम्ही विचार करूं इच्छितों. तो संदर्भ ज्या दिवशीं विसरूं त्या दिवशीं सगळ्याच

आमच्या कामाचें महत्त्व जाईल यासंबंधीं कधींही शंका यापूर्वी नव्हती, आजहि नाहीं; परंतु हें काम करणें, हा एक व्यवहार आहे. ही निव्वळ भावना नाहीं. बँक चालवणें हा व्यवहार आहे; आणि म्हणून मी असें म्हणेन की आजहि एवढी मोठी राज्याची बँक चालत असतांना अजूनहि छोटया छोटया भागांमध्यें या तऱ्हेच्या काम करणाऱ्या व्यापारी बँकांची आवश्यकता अजूनहि लागेल.

आपल्यामध्यें वाढलेलें हें महत्त्वाचें साधन आम्हीं कोणत्या दृष्टीनें व कोणत्या कामासाठीं वापरतों हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि म्हणून मी बँकेच्या बाबतीमध्यें असें सांगेन कीं, या बँकेच्यावर ही जबाबदारी आहे कीं, अशा तऱ्हेचीं खटपट करणारीं, उद्योग करूं इच्छिणारीं अशीं हुशार माणसें महाराष्ट्राच्या छोटया छोटया शहरांतून आतां वावरत आहेत. त्यांना कोणत्या तऱ्हेचें काम करण्याची शक्यता आहे, कोणत्या तऱ्हेनें मदत करणें शक्य आहे, किंवा शासनानें त्यांना शक्यता करावी, या तऱ्हेचें मार्गदर्शन व संशोधन जर करण्याची शक्यता असेल किंवा वाटत असेल तर ती आपण जरूर करावी.

महाराष्ट्राचा आर्थिक विकास करण्याच्या बाबतींत महाराष्ट्र शासन हें वचनबद्ध आहे. आणि या बाबतीमध्यें आपण जे प्रयत्न करणार आहांत त्या प्रयत्नांच्या पाठीमागें महाराष्ट्र शासन निर्धारानें उभें राहील असा मी त्या आश्वासनाचा जरूर पुनरुच्चार करूं इच्छितों. परंतु तुमच्यासारखीं आर्थिक क्षेत्रांतलीं पराक्रमी माणसें महाराष्ट्र राज्याच्या पाठीमागें जोंपर्यंत आहेत, तोंपर्यंत निर्धारानें कोठल्याहि तऱ्हेचें आश्वासन द्यायला मला कधीं चिंता वाटलेली नाहीं. आणि म्हणून हें आश्वासन मोठ्या निर्धारानें मी त्यांना देतों आहे. आपण सर्व जण या क्षेत्रांतले. निःपक्षवृत्तीनें व अपक्ष भावनेनें काम करणारे. आर्थिक विकासाचा प्रश्न हा अपक्ष प्रश्न आहे. कारण शेवटीं राजकारणामध्यें पक्ष घेतलेलीं माणसें थोडीं आहेत, असा माझा अनुभव आहे. अगदीं जर एकदां संशोधन करायचा प्रयत्न आपण केलात तर ज्यांनीं अगदीं कुठल्या तरी पक्षाला मनाचें फूल वाहिलें आहे, अशीं माणसें शेंकडा ७ किंवा १० टक्के तरी असतील कीं नाहीं याची मला शंका आहे. ९० टक्के माणसें अपक्ष असतात. या ९० टक्के माणसांना जो काबूंत ठेवतो तो पक्ष प्रमुख ठरतो असा राजकारणांतला अनुभव आहे. त्यामुळें हा आर्थिक विकासाचा प्रयत्न

आणि ही येवढी मोठी यात्रा ही अपक्षच यात्रा राहील. अर्थात त्या प्रयत्नाच्या पाठीमागें कुठली दृष्टि रहाते ही फार महत्त्वाची गोष्ट आहे, तिच्याकडे मी दुर्लक्ष नाहीं करूं इच्छित. त्यामध्यें चुकीनें पक्षदृष्टि आली तर ती पक्षदृष्टि म्हणतां कामा नये. कारण शेवटीं तिला कांहीं सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टें असावीं लागतात. त्याशिवाय राजकारण काम करूं शकत नाहीं, तसेंच, अर्थकारणहि काम करूं शकत नाहीं. तिच्यापुढें कांहींतरी निश्चित प्रकारचें उद्दिष्ट असलें पाहिजे. बँकेजवळ नुसताच कांहीं तरी व्यवहार करायचा एवढें उद्दिष्ट खाजगी सावकारांसारखें राहिलेलें नाहीं. बँकांच्यापुढें कांहींतरी नवीन आर्थिक उद्दिष्टें निर्माण झालीं आहेत, आणि जरी आपली बँक व्यापारी असली तरी आपल्या या व्यापारी बँकेपुढें कांहीं सामाजिक उद्दिष्टें आहेत, कांहीं आर्थिक उद्दिष्टें आहेत असें मी मानतों.

( १३ डिसेंबर १९६०. पुणें : महाराष्ट्र बँक रौप्यमहोत्सव )


* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 39970 वि: [illegible]
क्रमांक 9330 नों: दि: [illegible]



महाराष्ट्र राज्य हा जगन्नाथाचा रथ आहे. तो चालविण्यासाठीं सर्वांच्या सहकार्याचा हात लागला पाहिजे. हें राज्य मराठीभाषी असलें तरी तें केवळ मराठी भाषिकांचें नाहीं. आणि भाषिक राज्य हें साध्य नसून साधन आहे, हें सूत्र ना. यशवंतराव वारंवार सांगत आले आहेत. भाषिक राज्य स्थापन झाल्यावर औद्योगीकरणावर त्यांनीं भर दिला. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार हा सामाजिक विषमता नष्ट करण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर ज्याप्रमाणें निर्बंध असतां कामा नयेत त्याचप्रमाणें महाविद्यालयीन व विद्यापीठ-शिक्षण घेण्यासाठीं निर्बंध लादणें अनिष्ट आहे. या संख्यावाढीमुळें निर्माण झालेले प्रश्न तात्पुरते आहेत आणि अखेरीस शिक्षणाचीं दारें सर्वांना खुलीं झाल्यानें केवळ समाजाचाच नव्हे तर शिक्षणक्रमाचाहि फायदाच होईल असें यशवंतरावांचें मत आहे.

पण शिक्षण घेतल्यावर मराठी तरुणांनीं उद्योगधंद्यांत पडावें, दुसऱ्याचे उद्योग व कारखाने न चालवितां स्वतःचे कारखाने चालवावे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत महाराष्ट्रीय तरुणांनीं आघाडीवर असलें पाहिजे. अशा प्रकारें शिक्षणाचा उद्देश व शिक्षण घेतलेलेल्यांची दृष्टि बदलली कीं महाराष्ट्रांत सामाजिक व आर्थिक विषमता नाहींशी होईल. या मनोभूमीची योग्य मशागत करून कर्तृत्वाचें भरघोस पीक काढण्यासाठीं यशवंतराव उत्सुक आणि अधीरहि आहेत.



स्वातंत्र्योत्तर कालांतील शिक्षणक्षेत्रामधील महत्त्वाची घटना म्हणजे सर्व पातळीवर होत असलेला शिक्षणाचा प्रसार ही होय. गेल्या दहा वर्षांतील शिक्षणाच्या प्रसाराची गति पूर्वीच्या कोणत्याहि काळांतल्यापेक्षां अधिक

# शिक्षण – संख्या व दर्जा

आहे. त्याचबरोबर निरनिराळ्या पातळीवरील शिक्षणाच्या पद्धतींत सुधारणा होत आहे, पुनर्रचना होत आहे. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होत असून मूलोद्योग शिक्षणाला प्रारंभ झाला आहे. प्रत्यक्ष जीवनाशी–विशेषत: ग्रामीण जीवनाशीं–शिक्षण निगडित असावें या उद्देशानें मूलोद्योग शिक्षणाचा प्रयोग करण्यांत येतो असें मला वाटतें. त्याचप्रमाणें माध्यमिक शिक्षणाचाहि बराच प्रसार झालेला आहे. आणि शालान्त परीक्षेनंतर जे बहुसंख्य विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षणाचा लाभ घेऊं शकत नाहींत त्यांना उपयुक्त होईल अशा रीतीनें अभ्यासक्रमांत विविध विषयांचा समावेश करण्यांत आला आहे. तसेंच गेल्या कांहीं वर्षांत महाविद्यालयांत प्रवेश करणारांची संख्याहि जलद

गतीनें वाढली आहे. या वाढीशीं संबंधित असा आंकडेवारी पुरावा देण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. कारण ती आपल्या सर्वांच्या अनुभवाची बाब आहे. पण शिक्षणाच्या निरनिराळ्या पातळींवर झालेल्या वाढीची निरनिराळ्या गटांतील वेगवेगळी प्रतिक्रिया लक्षांत घेऊन त्यासंबंधींचा माझा अभिप्राय व्यक्त करणें मला युक्त वाटतें.

१४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांमुलींना मोफत व सक्तीचें शिक्षण देण्याविषयीं आपल्या घटनेंत उद्देशविषयक तत्त्व आहे. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हें योग्य दिशेनें टाकलेलें पाऊल आहे असें सार्वत्रिक मानलें जातें. प्रौढ मतदान हा लोकशाहीचा मूलाधार असून प्राथमिक शिक्षण त्यास पूरक आहे. त्यामुळें आपल्या नवजात लोकशाहीचीं मुळें पक्कीं व्हावीं, मजबूत व्हावीं म्हणून उपयोगी पडणारें हें प्राथमिक शिक्षण राजकीय दृष्टचाहि महत्त्वाचें आहे. या शिक्षणामुळें आपल्या प्रचंड समाजांत कार्यक्षमताहि येईल आणि मग आर्थिक क्षेत्रांत तिचे इष्ट ते परिणाम दिसूं लागतील. त्याचप्रमाणें या शिक्षण-प्रसारांत संस्कृतीचा प्रसार व्यापक प्रमाणावर होण्याची शक्ति आहे. तसें झाल्यानें मानवी मूल्यें व ध्येयें सर्वांच्या आवाक्यांत येतील. मूलोद्योग शिक्षणा-संबंधींचा वाद, मतभेद आपण बाजूला ठेवूं. परंतु घटनेचा आदेश शक्य तितक्या लवकर अंमलांत आणण्यासाठीं प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारार्थ सरकार करीत असलेल्या उपाययोजनांना सार्वत्रिक पाठिंबा आहे. आतां हें खरें आहे कीं, प्राथमिक शिक्षणावर इतका भर दिल्यामुळें आपली साधनसामग्री लक्षांत घेतां इतर क्षेत्रांकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार मधून मधून ऐकूं येते. परंतु हें मत प्रतिपादन करणारेहि सध्यांच्या सर्वसाधारण धोरणाच्या इष्टतेबद्दल आक्षेप घेत नाहींत.

माध्यमिक शिक्षणाचा प्रसार आणि विविध प्रकारचा अभ्यासक्रम यासंबंधीहि अशाच प्रकारच्या प्रतिक्रिया होतात; पण महाविद्यालयीन आणि विद्यापीठ शिक्षणापाशीं आपण येतों तेव्हां मग मतभेद निर्माण होतो. विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची संख्या गेल्या दहा एक वर्षांत जलद गतीनें वाढली असल्यानें अनेकांना तिच्या इष्टतेबद्दलच आशंका आहे. या संख्या-वाढीनें महाविद्यालयांतून गर्दी झाली आहे व त्यांतून अनेक अनिष्ट गोष्टी निर्माण होतात असें सर्वसाधारणपणें मानलें जातें. महाविद्यालयें व विद्या-

पीठें यांत प्रवेश करणारांपैकीं बरेचजण उच्च शिक्षणाचा फायदा घेऊं शकत नाहींत; व आपला अभ्यासक्रम अपुराच टाकून जातात. यांत बरीचशी सामाजिक नासाडी, उधळपट्टी आहे. संख्यावाढीचा परिणाम इमारती व ग्रंथालयें यांवरहि होतो व मग प्रत्येकाला योग्य त्या सवलती मिळू शकत नाहींत. संयुक्त, एकत्रित जीवनाची संधि, संख्येच्या दृष्टीनें पाहतां अधिकाधिक कमी प्रमाणांत मिळू लागली आहे. शिक्षक व विद्यार्थी यांचे संबंध दुरावत आहेत. अशा रीतीनें शैक्षणिक दर्जावर अनिष्ट परिणाम होत आहे. आणि विद्यार्थ्यांना पदवी मिळविण्याच्या अनेक सोयी उपलब्ध झाल्यानें आपल्या महाविद्यालयांत व विद्यापीठांत निव्वळ पदवीचें प्रेम वाढीला लागलें आहे. महाविद्यालयांतील पाळीपद्धति, संध्याकाळचीं व रात्रीचीं कॉलेजें, बहि:शाल पदवी आणि पत्रव्यवहारानें अभ्यासक्रम पुरा करण्याची सोय इत्यादि गोष्टी या प्रवृत्तीच्या निदर्शक आहेत. म्हणून आपलीं विद्यापीठें निवड करण्याचें आपलें कार्य गमावून बसलीं असून तीं केवळ पदवीदान करणारीं झालीं आहेत. निव्वळ संख्या, आकार, प्रमाण यांच्यासाठीं गुणांचा बळी दिला जात आहे.

यावर कोणते उपाय योजावेत यासंबंधीं बऱ्याच वेळां चर्चा होते. त्याचप्रमाणें कांहीं वेळां विद्यापीठांत प्रवेश मिळण्यावर निर्बंध घालण्याच्या हेतूनें वा पदवी मिळविण्यासाठीं प्रवेश घेऊं इच्छिणाऱ्यांचा निश्चयच ढासळावा, दुर्बल बनावा या उद्दिष्टानें कांहीं उपाय प्रत्यक्षांत केले जातातहि. या ना त्या प्रकारें प्रवेशावर निर्बंध घालणें ही एक तऱ्हा आहे, तर विद्यापीठाची पदवी व खालच्या श्रेणींतील नोकऱ्या यांच्यांतील दुवाच निखळून टाकणें ही दुसरी तऱ्हा आहे. हे उपाय व माध्यमिक शाळांतील अभ्यासक्रमांत अंतर्भूत केलेले अधिक व्यापक विषय या दोन्हींचा उपयोग विद्यापीठांत प्रवेश देऊं इच्छिणाऱ्यांच्या संख्येंत घट करण्यास कितपत होईल याचा अंदाज घेणें कठीण आहे. तथापि हे उपाय यशस्वी होण्याची शक्यता बरीच कमी आहे. याचें महत्त्वाचें कारण म्हणजे माध्यमिक शिक्षणाची होत असलेली वाढ हें होय. यामुळें पुढें बराच काळ विद्यापीठांत प्रवेश घेऊं इच्छिणारांची संख्या वाढतच जाणार आहे. विद्यापीठ-शिक्षणामुळें जे फायदा घेऊं शकतील त्यांना तें मिळवून देण्यासाठीं प्रयत्न करणें, आवश्यक त्या सुधारणा करणें इष्ट आहे. परिमित प्रमाणांत

कां होईना, शिष्यवृत्त्यांच्या द्वारां हें होत आहे. पण पात्रता, कुवत यांचा विचार न करतां ज्यांना विद्यापीठांत प्रवेश पाहिजे त्यांना तो मिळविण्यांत यश येत असल्यानें विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची जी संख्या जलद गतीनें वाढली आहे त्याचा आपणांस विचार करावयाचा आहे. विद्यापीठांतील वाढत्या गर्दी-संबंधीं स्वीकारण्यांत येणारा हा दृष्टिकोण कितपत रास्त आहे यासंबंधीं कांहीं शंका मी उपस्थित करूं इच्छितों.

जगांतल्या कोणत्याच देशांत महाविद्यालयीन उच्च शिक्षण सर्वांना उप-लब्ध करून दिलेलें नाहीं. जे देश श्रीमंत आहेत आणि आपल्या तरुण पिढीला शिक्षण देणें ज्यांना शक्य आहे त्या देशांतहि संबंधित वयोगटांतील लोकसंख्येचा विचार करतां विद्यापीठांत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींची संख्या अल्पच असते. याचा अर्थ विद्यापीठांत प्रवेश घेऊं इच्छिणाऱ्या प्रत्येकाला तो द्यावा हें सुचविण्याचा उद्देश नाहीं. पण त्याचबरोबर विद्यापीठांत प्रवेश घेणाऱ्या तरुण मुलामुलींचें प्रमाण आज इतकें कमी आहे कीं, विद्यापीठांतील गर्दी हें एक संकट आहे असें मानणें आणि उच्च शिक्षणाच्या क्षेत्रांत येणाऱ्यांचा ओघ थांबविण्याचा प्रयत्न करणें न्याय्य व योग्य नाहीं. आपल्या आर्थिक स्थितीमुळें आपण याबाबत काय करूं शकतों याला मर्यादा आहेत. पण असें असूनहि आज उच्च शिक्षणासाठीं धडपडणारांची मागणी पुरी करण्याइतकी साधनसामग्री आपण उपलब्ध केली पाहिजे. समाजाचे जे घटक अनेक शतकें दडपले गेले होते आणि शिक्षणाचे फायदे ज्यांना मिळूं दिले नाहींत त्या घटकांना आपली उन्नति करून घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली आहे आणि विद्या-पीठें व महाविद्यालयें यांत होणाऱ्या गर्दीला ही इच्छाहि अंशत: कारणीभूत आहे. सामाजिक दृष्टया वरच्या पायरीवर जाण्याचें साधन एवढीच कांहींची शिक्षणाबद्दल दृष्टि असेल. पण जातिनिविष्ट व श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पनां-वर आधारलेल्या समाजांत ही निकोप व नैसर्गिक दृष्टि आहे असें म्हणावें लागेल. ज्या तरुण मुलामुलींच्या आईवडिलांना व आजोबा-आजींना शिक्षणाचा लाभ घेतां आला नसेल त्यांना शिक्षणामुळें आपली परिस्थिति सुधारेल म्हणूनच यावेंसें वाटलें तर त्याविरुद्ध काय आक्षेप असणार आहे ? एवढेंच नव्हे, दूर दृष्टीनें बोलावयाचें तर शिक्षणाच्या या प्रसारांत त्याची गुणवत्ताहि सुधारण्याची शक्यता आहे. आपल्या विद्यापीठांत जितके अधिक विद्यार्थी

येतील तितके ते गुणवत्तेच्या दृष्टीनें निवड करण्यास उपयुक्त ठरतील. आणि शिक्षणाचा दर्जा सांभाळण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे ते आपलें सर्व लक्ष यावरच केंद्रित करतील. शिक्षणाच्या दर्जांतहि सुधारणा होणें अशक्य आहे असें मला वाटत नाहीं.

उच्च शिक्षणाचा प्रसार ही माझ्या मतें आपल्या देशांतील एक प्रभावी लोकशाही शक्ति आहे. जोंपर्यंत हें शिक्षण समाजांतील मूठभर लोकांना मिळत होतें तोंपर्यंत आपल्या समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत सर्वोत्कृष्ट उच्च विद्याविभूषित अशा लोकांची संख्या अल्प असे. आणि या स्थितींत या मूठभर लोकांची प्रगति खुंटली, त्यांचा अध:पात झाला कीं, समाजाचाहि अध:पात होण्याचा धोका असतो. अज्ञान व अशिक्षितता या परिस्थितींत वाढलेल्यांची बौद्धिक पातळी वाढली, बौद्धिक क्षितिजें रुंदावत गेलीं; त्यांच्यांतील सुप्त गुणांचा उपयोग करण्याची त्यांना शक्य तितकी अधिक संधि मिळाली तर फक्त गुणवत्तेच्याच जोरावर आपण आपलें नेतृत्व मिळवू शकूं. असें झालें कीं सामाजिक दर्जा, जात, कौटुंबिक परंपरा इत्यादि घटक बाजूला पडतील. आपल्या राजकीय जीवनाच्या दृष्टीनें पाहतां हें असें होणें इष्ट ठरणार आहे.

शिक्षणसंस्थांतील गर्दीमुळें निर्माण झालेल्या कांहीं प्रश्नांचें अस्तित्व मी नाकारूं इच्छित नाहीं. शिक्षणाचा दर्जा खालावण्यास ही गर्दी कांहीं प्रमाणांत कारणीभूत आहे हेंहि खरें. पण मी अगोदर सांगितल्याप्रमाणें विचार केला तर या प्रश्नाचें स्वरूपच वेगळें दिसेल आणि तें तत्कालीन स्वरूपाचें आहे हें कळून येईल. शिक्षणाची पद्धतीच खालावूं नये म्हणून योग्य ती उपाययोजना करावयास हवी यांत शंका नाहीं. पण विद्यापीठांत प्रवेश घेऊं इच्छिणारांवर आंतून वा बाहेरून निर्बंध घालणें हा मात्र तो उपाय नव्हे. उलट, आपल्या तरुण पिढीची शक्ति विधायक, सर्जनशील कार्यासाठीं अधिकाधिक प्रमाणांत लागावी या दृष्टीनें तिला वळण लावण्याकरितां आपल्या महाविद्यालयांच्या व विद्यापीठांच्या कारभारांत सुधारणा करणें आणि आपल्या शिक्षकांना अधिक चांगलें शिक्षण देणें व त्यांचा दृष्टिकोण सुधारणें हा एक उपाय होऊं शकेल. या समस्या सोडविण्यासाठीं लागणारी साधनसामग्री पुरविण्याची जबाबदारी कांहीं प्रमाणांत सरकारांना उचलावी लागते हें खरें आहे. पण या बाबतींतील परिस्थिति निराशाजनक नाहीं. आर्थिक विकासाची गति वाढल्यानें

जसजसा काळ जाईल तसतशी निराळ्या सोयी करण्याची आपली ताकदहि वाढत जाईल. तेव्हां आज शिक्षणसंस्थांतील गर्दीसंबंधीं होणारी टीका ही उपलब्ध साधनसामग्री आणि उच्च शिक्षणासाठींची गरज यांत सुसूत्रता न राखण्याबद्दलची टीका आहे. आणि म्हणून आज जी तात्पुरती सूत्रविहीनता दिसते, तिच्या आधारावर विद्यापीठांतील प्रवेशावर निर्बंध घालण्याचें दीर्घकालीन धोरण आंखून चालणार नाहीं असें मला वाटतें.

शिक्षणसंस्थांतील वाढत्या संख्येचा तपशील उद्‌बोधक आहे. ज्या वैद्यकीय, तांत्रिक व स्थापत्यविषयक शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्थांत कांहीं किमान प्रमाणांत साधनसामग्रीचा व जागेचा दर्जा राखावा लागतो, तेथें गर्दीचा प्रश्न एवढा गंभीर नाहीं. या शिक्षणसंस्थांतील शिक्षणाचें स्वरूपच असें आहे कीं त्यासाठीं वसतिगृहाची वगैरे जागा बरीच मोठी लागते आणि त्यामुळें शिक्षक व विद्यार्थी यांच्यांतील संबंध प्रस्थापित होत असतो. पण कथाविभाग, वाङमय, तत्त्वज्ञान इत्यादि शाखा, समाजशास्त्रें याकडे वळलें तर हें चित्र बदललेलें दिसतें; येथेंच सर्वांत अधिक गर्दी झालेली दिसते. विज्ञान व कायदा याहि शाखांत कांहींशी अशीच परिस्थिति आहे. शिक्षणसंस्थांतील गर्दीमुळें निर्माण होणाऱ्या प्रश्नांसंबंधीं आपण जें ऐकतों ते प्रश्न याच शाखांत उद्‌भवतात. याच शाखांतील विद्यार्थ्यांची अतिरिक्त संख्या ही गर्दीचें स्वरूप धारण करते. आणि या ना त्या प्रकारच्या बाह्य उद्दिष्टासाठीं कांहीं प्रवृत्ति या गर्दीचा उपयोग करून घेतात. याच विद्यार्थ्यांत हट्टीपणा व बेफिकिरी या धोकादायक प्रवृत्ति आढळतात. आणि याचाच उद्रेक बेशिस्तीच्या रूपानें झालेला दिसतो. विद्यार्थ्यांच्या या बेशिस्तींतून निर्माण होणारे प्रश्न माझ्या मतें, मुख्यत: विद्यापीठांनींच हाताळले पाहिजेत. मला फक्त एवढेंच सांगावयाचें आहे कीं, आपलें उच्च शिक्षण आणि देश यांच्या भवितव्याबद्दल चिंता करणाऱ्या सर्वांनाच आपल्या विद्यापीठांतील ही परिस्थिति चिन्त्य वाटते.

( २३ डिसेंबर १९५९. अलिगड : विद्यापीठ दीक्षान्त समारंभ )

* * *

## ‘अज्ञाना’चें उच्चाटन

बहुजनसमाज म्हटलें कीं, महाराष्ट्रांत खांदे उडवितात. मलाहि या नांवा-बद्दल फारसें प्रेम नाहीं. महाराष्ट्राची भौगोलिक भूमि उंचसखल आहे. पण महाराष्ट्राच्या समाजजीवनांत मात्र असा उंचसखलपणा फारसा नाहीं. ज्यांचीं सुखदु:खें समान आहेत तो बहुजनसमाज ! आणि समान सु:खदु:खाचे लोक महाराष्ट्रांत भरपूर असल्यानें महाराष्ट्र ही समाजवादाला योग्य भूमि आहे. मात्र यासाठीं महाराष्ट्राच्या समाजजीवनांतले सर्व थर शहाणे झाले पाहिजेत. ‘अज्ञान’ हा शब्द महाराष्ट्राच्या कोशांतून आपल्याला काढावयाचा असून त्याइतकें मोठें कार्य आज दुसरें कोणतेंहि नाहीं. महाराष्ट्राच्या विचारांतून कांहीं चांगलीं बीजें निर्माण होणार असून भारताच्या जीवनांतहि आपणाला कांहीं नवीं मूल्यें निर्माण करावयाचीं आहेत.

अज्ञान हा शब्द नाहींसा करणें हें काम सोपें नाहीं. त्यासाठीं ५–१० वर्षें सतत प्रयत्न केले पाहिजेत. महायुद्धांत पराभूत झाल्यावर पश्चिम जर्मनीनें १० वर्षांत पूर्वीपेक्षां उत्तम जर्मनी निर्माण केला. याचें कारण त्यांच्याकडे यांत्रिक तज्ज्ञ; कुशल असे लोक तयार होते व ते १६–१६ तास काम करीत होते.

आतां खेडयांतील माणसानें मार्गदर्शनाची वाट पाहूं नये. राज्याचा मुख्य मंत्री मुंबईंत राहून प्रत्येक खेडयाला कसा मार्गदर्शन करूं शकणार? म्हणून यापुढें खेडयाला मार्गदर्शनाची आवश्यकताच राहतां उपयोगी नाहीं. आपल्या देशापुढें कामच एवढें जबरदस्त पडलें आहे कीं अनेक कार्यकर्त्यांनीं तें केलें पाहिजे. खेडयांत यापुढें कार्यकर्त्यांनीं खातीं वांटून घेऊन कार्यास तडफेनें सुरुवात केली तर महाराष्ट्र राज्य भारतांतल्या कोणत्याहि राज्याच्या आघाडी-वर राहील असें मी व्यक्तिश: आश्वासन देतों.

( २४ सप्टेंबर १९६०: इस्लामपूर )

* * *

## विद्यापीठांकडून अपेक्षा

ज्ञानाच्या कल्पनेचा मौलिक विचार अनेक वर्षांपासून या मराठवाडयांत

झाला आहे. त्यांतील कांही तत्त्वें आजहि मार्गदशक ठरूं शकतील. कारण मानवी प्रवत्ति व दृष्टिकोन हीं निरनिराळ्या काळांत वदलत असलीं तरी मानवी मूल्यें हीं चिरंतर टिकणारीं आहेत. मानवी जीवनास आधारभूत असलेलीं हीं मूल्यें सर्व काळांत आणि सर्व देशांत उपयुक्त ठरली आहेत आणि म्हणून त्यांची अवहेलना केल्यानें अथवा त्यांच्याकडे पाठ फिरविल्यानें आपली अपरिमित हानि होणार आहे. अखंडपणें चालत आलेलीं हीं सत्यें प्राचीन काळांतील ज्या संतांनी, महात्म्यांनीं व द्रष्टयांनीं शोधून काढलीं व प्रसारित केलीं त्यांच्याविषयीं आपण सदैव कृतज्ञच राहिलें पाहिजे. या मूल्यांचा व सत्यांचा आपल्या जीवनांत अंगीकार करून त्यांचें लोण भावी पिढयांपर्यंत पोहोंचवणें हें आपलें कर्तव्य आहे. मराठवाडयाच्या ह्या पवित्र भूमींत प्राचीन काळीं विद्यादानाचीं हीं जीं तीर्थक्षेत्रें होतीं त्यांचें महत्त्व हें असें आहे. आधुनिक काळांतील शाळा, विद्यालयें व महाविद्यालयें यांच्याहून यापूर्वीच्या विद्यापीठाचें स्वरूप पुष्कळसें भिन्न होतें हें जरी खरें असलें तरी ज्ञानदानाचें अमोघ असें कार्य त्यांनीं केलेलें आहे यांत संदेह नाहीं. एका आंग्ल कवीनें म्हटलें आहे कीं कारागृह हें कांहीं त्याच्या दगडी भिंतींनीं वनलेलें नसतें. हीच गोष्ट एका अर्थानें विद्यालयें अथवा विद्यापीठें यांच्या बाबतींतहि खरी आहे. तेव्हां प्राचीन काळांतील विद्यादानाचीं हीं स्थानें एक प्रकारचीं विद्यापीठेंच होतीं. अर्थात् त्यांचीं उद्दिष्टें व कार्यपद्धति हीं त्या काळांतील परिस्थितीस अनुसरून अशींच होतीं.

त्या काळांत संतमहात्म्यांनीं ज्ञानाचा प्रसार समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत पोहोंचेल अशा रीतीनें केला. ज्ञानदानांत कोणत्याहि प्रकारचा आपपर अथवा उच्चनीच असा भाव असतां कामा नये अशी त्यांची धारणा होती. ज्ञानाचा प्रसार सर्वत्र होऊन मानवी जीवन नवचैतन्यानें उजळून निघावें या निष्ठेनें व ध्येयानें ते प्रेरित झाले होते. त्या काळीं अध्यात्म, ईश्वरोपासना, विश्वाचें अनादि व अनंत स्वरूप, निसर्गाचें असीम सौदर्य व भव्यता, नीतिशास्त्र हे ज्ञानाचे विषय होते व तें सहाजिकच होतें. तथापि आतां काळ वदलला असून जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणांत परिवर्तन घडलें आहे व घडत आहे. अर्थात् याबद्दल खेद व खंत बाळगण्याचें कारण नाहीं. काळ स्थिर नसतो. आपण काळाच्याबरोबर राहिलें पाहिजे. अनेक शतकांपूर्वी पायीं रखडणारा

माणूस बैलगाडींतून प्रवास करूं लागला आणि आज तो विजेवर धावणाऱ्या रेल्वेगाड्यांतून व हवेंत उडणाऱ्या विमानांतून प्रवास करतो. अशीं ही प्रगतीचीं पावलें पुढें पुढें पडत आहेत. विज्ञानाची ही प्रगति आज एवढ्या झपाट्यानें होत आहे कीं, कोणी सांगावें, मानवाला नजिकच्या भविष्यांत केवळ या पृथ्वी-तलाचाच नव्हे, तर अब्जावधि योजनें दूर असलेल्या ग्रहताऱ्यांचा कारभार हांकावा लागेल ! विज्ञानाच्या क्षेत्रांत या प्रकारें क्रांतिकारक परिवर्तन घडत असतांना विश्वविद्यालयांतून होणाऱ्या विद्यादानाचें स्वरूप आहे तसेंच राहावें अशी अर्थातच कोणी अपेक्षा करणार नाहीं. निसर्गाचीं रहस्यें शोधून काढून त्यांचा आपल्या जीवनांत उपयोग करून घेणें, सुधारणेचा एक टप्पा गांठल्यानंतर दुसरा टप्पा गांठण्याचा प्रयत्न करीत राहणें आणि अशा रीतीनें सतत प्रगति करणें ही माणसाची उपजत प्रवृत्ति आहे. या प्रवृत्तीमुळेंच आज प्रत्येक क्षेत्रांत त्यानें आघाडी मारली आहे. विद्यापीठें हीं या प्रवृत्तींना अधिक चालना देणारीं ज्ञानसत्रें असल्याकारणानें बदलत्या काळाबरोबर त्यांच्या स्वरूपांत बदल होणें अपरिहार्य नव्हे, तर आवश्यक आहे. या दृष्टीनें विद्यापीठ ज्या भागांत वसलें असेल त्या भागांतील परिस्थिती-पासून तें तुटक वा अलग राहूं शकणार नाहीं. तसें तें राहिलें तर त्याची उपयुक्तता अथवा परिणामकारकता संपुष्टांत येईल. तेव्हां विद्यापीठें हीं त्यांच्या भोवतींच्या प्रदेशांशीं व परिस्थितीशीं पूर्णपणें तादात्म्य पावलीं पाहिजेत.

ज्या प्रदेशांत व ज्या काळांत आपण राहत आहोंत त्यांच्या संदर्भांत वस्तुस्थितीचा व घटनांचा अभ्यास करणें हें आवश्यक असें कर्तव्य आहे. प्रत्येक देशाला, किंबहुना देशांतील प्रत्येक भागाला, त्याचे असे कांहीं प्रश्न व गरजा असतात. नवीन रक्ताच्या तरुणांनीं या प्रश्नांचा सखोल अभ्यास करून ते सोडविण्याचा सातत्यानें प्रयत्न केला पाहिजे व अशा प्रकारें आपल्या प्रदेशांतील लोककल्याणाच्या कार्याचा एक अविभाज्य व जिवंत घटक बनलें पाहिजे. पूर्वीच्या काळीं लोक विद्वान व व्यासंगी पुरुषांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करीत. आज विद्यापीठांतून शिक्षण घेतलेल्या तरुण स्त्री-पुरुषांकडून अशा मार्गदर्शनाची अपेक्षा आहे. कारण एका अर्थानें आजचीं विद्यापीठें हीं प्राचीन काळांतील संत, सत्पुरुष व द्रष्टे यांचें ज्ञानप्रसाराचें कार्य पुढें

चालवीत आहेत. अर्थात ज्ञानदानाची आजची व पूर्वीची पद्धति यांत पुष्कळच फरक झालेला आहे. त्याचप्रमाणें आज समृद्धीच्या कल्पनाहि बऱ्याच बदलल्या आहेत. थोडक्यांत म्हणजे जीवनाकडे पाहण्याचा आजचा दृष्टिकोण हा पूर्वीपेक्षां आज आमूलाग्र बदलला आहे. तथापि, अखिल मनुष्यमात्राचें जास्तींत जास्त कल्याण साधण्याचें मानवाचें अंतिम ध्येय बदललेलें नाहीं व बदलणारहि नाहीं.

विद्यापीठांतील विद्यार्थ्यांनीं स्थानिक भागाच्या अडचणी व प्रश्न यांची दखल घेऊन ते सोडविण्याच्या कामीं साहाय्य केलें पाहिजे. याचा अर्थ संकुचित प्रादेशिक भावनांना उत्तेजन मिळावें असा अर्थातच नाहीं. कोणत्याहि प्रदेशाचे हितसंबंध हे सबंध देशाच्या हितसंबंधाचा एक अविभाज्य भाग असतात आणि म्हणून नेहमीं सर्व देशाच्या हिताच्या दृष्टींतूनच विचार केला पाहिजे. भारताच्या एकततेंच आपलें सामर्थ्य सामावलें आहे. ही एकता भंग पावली तर आपली अधोगति झाल्याशिवाय राहणार नाहीं.

महाराष्ट्र राज्यस्थापनेनंतर आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांत आज नवें चैतन्य निर्माण झालें असून या नव्या राज्याच्या साधन-सामग्रीचा विकास करण्याचा आज गंभीरपणें विचार होत आहे व त्या दृष्टीनें लोक कार्यप्रवृत्त झाले आहेत. मराठी भाषेचा विकास हा महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा एक स्वाभाविक परिपाक आहे. शिक्षणाचें माध्यम व राज्यभाषेचा दर्जा तिला आतां प्राप्त होत आहे. कै. माधव ज्यूलियननीं आपल्या एका कवनांत आशा व्यक्त केल्याप्रमाणें आपल्या या मायबोलीला आज दिव्य सुखाचे दिवस लाभत आहेत. मराठीचें माहेरघर असलेल्या मराठवाड्यांत मराठी भाषेच्या विकासास विशेष चालना मिळेल अशी मी आशा करतों.

अर्थात मराठीच्या अभ्यासाबरोबर राष्ट्रभाषा म्हणून सर्व भाषांची मायभाषा व आपल्या प्राचीन संस्कृतीची भाषा म्हणून संस्कृत व आंतर-राष्ट्रीय व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजी या भाषांचा अभ्यास करणें आपल्याला आवश्यक आहे. इतिहासानें इंग्रजी भाषेशीं आपला जो घनिष्ट संबंध आला त्यामुळें इंग्रजी भाषा आपल्याला परकी राहिलेली नसून तिनें आपलें फार मोठें हितच साधलें आहे. कारण ज्ञानाचीं अपार भांडारें इंग्रजीनें आपल्याला खुलीं केलीं आहेत व त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय व्यवहार सुलभ केला आहे.

भाषेचा विकास हा केवळ त्या भाषेंतील ललितसाहित्याच्या संदर्भांत होतो ही समजूत चुकीची आहे. निरनिराळ्या वैज्ञानिक शास्त्रांचा आविष्कार जेव्हां भाषा करूं लागेल तेव्हांच तिचा खरा विकास झाला असें म्हणतां येईल. तेव्हां साहित्यिकांबरोबरच शास्त्रज्ञ, इतिहासकार, तत्त्ववेत्ते हे सर्व-जण मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासास चालना देतील असा मला विश्वास वाटतो.

(१५ : ऑक्टोबर १९६० ; औरंगाबाद: मराठवाडा विद्यापीठ दीक्षान्त समारंभ)

* * *

"महान व्यक्तींना आपण विशिष्ट जातीचे बनवून करंटेपणा दाखवीत आहोंत. महात्मा ज्योतिबा फुले माळी होते म्हणून माळी लोकांनीं त्यांचा उत्सव करणें, छत्रपति शिवाजीमहाराज मराठे होते म्हणून त्यांची पूजा मराठ्यांनीं करणें; लोकमान्य टिळक ब्राह्मण होते म्हणून त्यांचा उत्सव ब्राह्म-णांनीं करणें हें करंटेपणाचें लक्षण आहे. हे मोठे लोक विशिष्ट जातींत जन्मले असतील, पण त्यांचें जीवन सर्व समाजासाठीं होतें. त्यांच्याविषयीं सर्व समाजानें आदर दाखवून त्यांच्या शिकवणुकीचें अनुकरण करावें."

## अलगपणा नको

भारतामध्यें राजकीय व सामाजिक पार्श्वभूमीवर अलगपणाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. मिरज येथील मुस्लिम शिक्षण परिषद भरण्याचें प्रगट होतांच विशिष्ट दृष्टिकोनांतून लेख प्रसिद्ध झाले. हिंदुस्थानांत पूर्वी अलग राष्ट्र निर्माण करण्याचा प्रयत्न झाला व तो यशस्वीहि झाला. अशा परिषदांमुळें, मुस्लिम समाजाला जो मार्ग हवा आहे तो अलगपणाकडे तर नेणार नाहीं ना, अशा आशंका आमच्याहि मनांत आहेत. अशा घटनांतून अलग राष्ट्राचें विष दिसून आलें तर तें बाजूला काढलें जाईल.

या परिषदेंत मुस्लिम शिक्षणतज्ज्ञ शैक्षणिक प्रश्नांची चर्चा करणार आहेत. त्या दृष्टीनें मी हें स्पष्ट करूं इच्छितों कीं, मुसलमान समाज हा महाराष्ट्राचा

मोठा घटक आहे, त्यांच्या आशा-आकांक्षांची कदर करणें हें शासनाचें कर्तव्यच आहे.

तथापि तुमचे निर्णय तुम्ही विचारपूर्वक घ्या. महाराष्ट्रांतील अल्पसंख्य जमातींत आनंदाचें व सहकार्याचें वातावरण असलें पाहिजे. त्यांचें जीवन महाराष्ट्राच्या जीवनप्रवाहाशीं समरस व्हावें हीच माझी इच्छा आहे. शिक्षणाचें माध्यम उर्दू कीं मराठी हा वादाचा प्रश्न परिषदेपुढें आहे. शिक्षण जर माणसाला माणसापासून दूर करणार असेल तर अयोग्य आहे. व्यक्तीमध्यें मूलभूत जाणीवा निर्माण करून व्यक्तित्वाचा विकास करणें हा शिक्षणाचा उद्देश आहे. या दृष्टिकोणांतून शिक्षणाच्या माध्यमाचा विचार हवा. मुलिस्म समाजाला उर्दू माध्यम हवें असेल तर शासनाला त्याचा विचार करावा लागेल. पण मुस्लिम समाजानें शासनाशीं व महाराष्ट्राच्या जीवनाशीं समरस व त्यांत भागीदार व्हावें असें वाटत असेल तर त्यानें मराठी भाषेचेंच शिक्षण घेतलें पाहिजे. उर्दू माध्यम व मराठी माध्यम हीं परस्परविरोधी टोकें आहेत.

* * *

( २३ ऑक्टोबर १९६० मिरज . महाराष्ट्र मुस्लिम शिक्षण परिषद )

## जगन्नाथाचा रथ

महाराष्ट्र राज्य हा जगन्नाथाचा रथ आहे. जगन्नाथाचा रथ हा भक्तांचा हात लागल्याखेरीज हालत नाहीं, तसा महाराष्ट्राचा गाडा सर्व जनतेच्या सहकार्याचा हात लागल्याविना चालणार नाहीं. हें राज्य मराठी भाषिक असलें तरी तें केवळ मराठी भाषिकांसाठीं नाहीं. महाराष्ट्र राज्य हें ज्यांची कर्मभूमि आहे अशा सर्व लोकांचें हें राज्य आहे; मग ते कोणत्याहि धर्माचें वा पंथाचे असोत, कोणतीहि भाषा बोलणारे असोत. या राज्यांत मराठी न बोलणाऱ्या लोकांच्या हिताचीहि काळजी घेतली जाईल. कारण ते आमचे शत्रू नसून बंधुच आहेत.

मराठी माऊलीच्या लेकरांत धर्माच्या भिंती आड येत नाहींत हें आज

प्रत्ययास आलें. मुसलमान, ख्रिश्चन, पारशी हे जरी आपापल्या धर्माप्रमाणें परमेश्वराची भक्ति करीत असले तरी त्यांना बंधुभावानें एकत्र आणण्याचें सामर्थ्य मराठी भाषेंत आहे.

आम्हांला भाषिक राज्य हवें होतें याचें कारण मनांतील भावना व विचार प्रभावीपणें व्यक्त करण्याचें भाषा हें एकमेव साधन आहे म्हणून. मराठी भाषा आमचे विचार फुलवूं शकते म्हणून आम्हांस भाषिक राज्य हवें होतें.

आज आपणांपुढील खरा प्रश्न सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्याचा आहे. ही विषमता दूर करण्याचें महाराष्ट्र राज्य हें एक साधन आहे. या राज्यांत सामाजिक व आर्थिक विषमता यांना स्थान राहणार नाहीं यासाठींच आम्ही प्रयत्न करूं.

या देशांत इंग्रजांनीं आपलें राज्य स्थापन केलें होतें. त्यांच्याजवळ प्रभावी शस्त्रें होतीं व आमच्याजवळ तीं नव्हतीं म्हणून आमचा पराभव झाला असें अनेकांचें म्हणणें आहे. परंतु त्यांच्या शस्त्रास्त्रांच्या मागें जबरदस्त असें 'शास्त्र' होतें व तें आमच्याजवळ नव्हतें 'हेंच' आमच्या पराभवाचें खरें कारण होय. औद्योगिक प्रगति हें त्यांचें शास्त्र होतें. आज जगांत श्रेष्ठ दर्जाच्या ज्या दोन राष्ट्रांचें नांव घेण्यांत येतें त्या अमेरिका व रशियाजवळहि प्रभावी असें शास्त्र आहे. जबरदस्त शास्त्र निर्माण करणारेच जगाचें भवितव्य घडवीत असतात. तुम्ही कोणत्याहि भाषेचे वा धर्माचे असां, कुठेंहि जाऊन तुम्ही प्रार्थना करा, पण ती प्रार्थना मानवी कल्याणाचीच असली पाहिजे ही गोष्ट मात्र विसरतां कामा नये.

* * *

( २० डिसेंबर १९६० मुंबई · मराठी भाषिक प्रॉटेस्टंट ख्रिस्ती मेळावा )

## गुणांचीहि वाढ हवी

श्रीशाहूमंदिर महाविद्यालय पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरीं सुरू झालें याबद्दल पुण्याबाहेर महाराष्ट्रांत फार कौतुक होत आहे. शाहूमहाराजांचें असें स्मारक पुण्यांत होणें आवश्यक होतें.

शिक्षणाच्या आड गरिबी येऊं नये असें महाराष्ट्र सरकारचें धोरण आहे.

त्या दृष्टीनें सरकार कांहीं उपाययोजना करीत आहे. पण शिक्षणवाढीबरोबर गुणांची वाढ झाली पाहिजे. शिक्षणासाठीं येणारा पैसा गरीब समाजाकडून येतो याची जाणीव विद्यार्थ्यांना हवी. त्यासाठीं विद्यार्थी महत्त्वाकांक्षी व समाजाशीं समरस होण्याच्या प्रवृत्तीचे झाले पाहिजेत. 'फुकट शिक्षण' हें फुकट शिक्षण ठरतां कामा नये.

शासनाकडून मिळालेल्या सवलतींनीं विद्यार्थ्यांना आनंद होतो. हें योग्यच आहे. पण विद्यार्थ्यांकडूनहि कांहीं अपेक्षा असतात. आज असा अनुभव येतो कीं, उच्च शिक्षण घेतलेला खेड्यांतील मुलगा आपल्या घरापासून व खेड्या-पासून मनानें दूर जातो. हा कोणाचा दोष आहे हें सांगतां येत नाहीं. कदाचित् बदलत्या परिस्थितीचाहि हा परिणाम असेल.

'जें व्हावेसें वाटतें तें होतां येत नाहीं व जें नको तें व्हावें लागतें' अशा शब्दांत कै. शि. म. परांजपे यांनीं त्यांच्या काळाच्या अगतिकतेचें वर्णन केलेलें आहे. ही पूर्वीची अगतिकता आज राहिलेली नाहीं. सध्यां उच्च शिक्षणाच्या प्रवेशद्वारांत असलेल्या विद्यार्थ्यांत कर्तृत्व व परिश्रम करण्याची तयारी असेल तर त्यांना जें व्हावेसें वाटेल तें होतां येईल; त्यांना फक्त आभाळाचीच मर्यादा आहे.

( ६ ऑगस्ट १९६०; पुणें : श्रीशाहूमंदिर महाविद्यालय )

* * *

"शिक्षण व शास्त्रीय दृष्टिकोणाचा अभाव यामुळें आपल्याला जीवनाच्या सर्व क्षेत्रांत माघार घ्यावी लागते. या उलट शास्त्रीय वैज्ञानिक ज्ञानानें युक्त अशीं राष्ट्रें स्वतःचें सार्वभौमत्व अखंड ठेवूं शकतात, इतकेंच नव्हे तर दुसऱ्यां-च्याहि मदतीला धांवून जाऊं शकतात."

## शक्तीचा अपव्यय टाळा

दलित समाजाच्या मनांत जागृत झालेला स्वाभिमान पाहून मला आनंद वाटतो. डॉ. आंबेडकरांबद्दल मलाहि आदर वाटतो. सामाजिक क्रांतीचें निशाण हातीं घेऊन उभ्या ठाकलेल्या बंडखोर नेत्यांच्या परंपरेंतील ते एक थोर पुरुष होते. त्यामुळें त्यांच्याविषयीं सर्वांनाच आदर वाटतो. त्यांतहि मी अशा पिढींत वाढलों आहे कीं जी सामाजिक न्यायाचें निशाण घेऊन पुढें जाणाऱ्या प्रत्येकाची पूजा करीत आली आहे. डॉ. आंबेडकर तर लोकशाहीचे पुजारी होते आणि जें राज्य कोणत्याहि एका जातीजमातीचें नाहीं त्या अनंत काल-पर्यंत टिकणाऱ्या भारतीय जनतेच्या राज्याचें चिरंतन संविधान बाबासाहेबांनीं घडविलें आहे. त्यामुळें त्यांची स्मृति सर्वत्र भारतीयांच्या मनांत अमर राहील.

दलित समाजाच्या आणि कष्टकरी वर्गाच्या समस्या उरूं देणार नाहीं असें म्हणणाऱ्या बुद्धिवादी कार्यकर्त्यांची आघाडी आज महाराष्ट्रांत उभी राहिली आहे. असे कार्यकर्ते फक्त माझ्याच पक्षांत आहेत असा माझा दावा नाहीं. महत्त्वाचा मुद्दा हा कीं या समस्यांकडे पाहण्याबाबत मानसिक एकता आढळते. या समस्या सुटल्या पाहिजेत असें म्हणणारीं माणसें सत्ताधारी पक्षांत आणि इतर पक्षांत आहेत. या समस्या सोडविण्यासाठीं आतां लढतच राहिलें पाहिजे अशी स्थिति राहिलेली नाहीं. किंबहुना हा शक्तीचा अपव्यय टाळणें आतां शक्य आहे. आपलें मत इतरांना समजूं शकतें आणि आपल्या समस्या परस्पर विचारानें सुटूं शकतात असा विश्वास बाळगा. म्हणजे लोकशाही मूल्यावरील आपला विश्वास वाढत जाईल.

आजमितीस महाराष्ट्राची परिस्थिति पूर्वीपेक्षां निराळी आहे आणि येथें एकात्म, एकजिनसी समाज आपल्याला निर्माण करावयाचा आहे. नव-बौद्ध समाजांतील बुद्धिवान विचारवंत तरुणांनी केवळ आपल्या समाजाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित न करतां संपूर्ण महाराष्ट्राच्या समस्यांचा विचार करावा. डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचें स्मारक अशा प्रयत्नांनींच होईल. भंगलेलें सामाजिक मन सांधण्याच्या कामांत नवबौद्धांचें सहकार्य हवें आहे.

( २८ डिसेंबर १९६०; नागपूर · नवबौद्धांकडून सत्कार )
शि.नौ. ४

* * *



आपल्या देशांत समाजकार्याला वाटेल तितका वाव आहे. अर्थात् ही गोष्ट कांहीं मोठी अभिमानाची आहे अशांतला भाग नाहीं. कारण समाजकार्याला, समाजसेवेला एवढा वाव आहे याचा अर्थ असा होतो कीं, आपल्या समाजापैकीं

# समाजसेवेचें महत्व

फार मोठ्या वर्गाला आवश्यक त्या सुखसोयी पुरेशा उपलब्ध नाहींत किंवा मुळींच उपलब्ध नाहींत. ज्या समाजांत सर्व लोक आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत एका पातळीवर आहेत आणि सर्व सुखसोयी सर्वांना समानपणें उपलब्ध आहेत व म्हणून कोणाला 'समाजसेवा' करावी लागत नाहीं तो समाज हा आदर्श होय. पण असा आदर्श समाज क्वचितच कोठें दिसत असणार; विशेषत: आपल्यासारखा जो देश दीर्घकाल मागासलेला व अविकसित राहिला होता आणि जेथें योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा मागमूस नव्हता, उलट जुनाट धर्मसमजुती, चालीरीती मात्र होत्या त्या देशांत आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत फार मोठी विषमता ही असणारच. ही विषमता नाहींशी करणें हें कांहीं सामान्य कार्य

नाहीं. तें पार पाडण्यासाठीं सरकार, सामाजिक संस्था आणि वैयक्तिक सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून सुसूत्र आणि उत्कट प्रयत्न व्हावयास हवेत.

शासनाजवळ सर्व प्रकारची साधनसामग्री असतांना व शक्ति असतांना समाजसंस्था व समाजसेवक यांचेंच कार्य शासनानें कां करूं नये असा प्रश्न विचारला जाईल. ज्या प्रकारची समाजव्यवस्था आपण उभारूं पाहात आहोंत तिच्या मूलाधार अशा तत्त्वाचाच या प्रश्नाशीं संबंध येतो. समाजवादी धर्तीची समाजरचना उभी करण्याचें ध्येय आपण जाणीवपूर्वक स्वीकारलें आहे. आपलें हें ध्येय कांहीं टीकाकार म्हणतात त्याप्रमाणें निर्भेळ समाजवाद पातळ करावा, क्षीण करावा म्हणून आम्हीं हें ध्येय स्वीकारलेलें नाहीं. जर सेवेचीं आणि सुधारणेचीं सर्वच कामें शासन करूं लागलें तर हें शासन केवळ सर्वाधिकारी सर्वंकष स्वरूपाचें बनेल. अशा समाजांत कल्पित दोष सुधारण्याचा अधिकार शासन स्वतःकडे घेत असतें आणि समाजाला आपल्या इच्छेप्रमाणें बदलविण्याचा उद्योग करते. या प्रकारच्या समाजांत समाजकल्याणाचें कार्य करणारी स्वतंत्र संस्था असूं शकत नाहीं, पण आपण वेगळा मार्ग—लोकशाहीचा मार्ग-पत्करिला आहे. त्या समाजांत सामाजिक उणीवा व अन्याय दूर करण्यास—सुधारण्यास व्यक्ती व संस्था यांना भरपूर वाव नेहमींच राहील. आणि त्याचबरोबर न्याय व समानता यांवर आधारित अशी समाजरचना उभारण्यास मदत करतां येईल. अर्थात् या कार्याबद्दल शासन उदासीन राहूं शकणार नाहीं. समाजकार्यांत सहभागी झालेल्या सर्वच संस्थांना व व्यक्तींना सरकार साहाय्य करील. नव्हे, आज या देशांत आम्ही याच प्रकारच्या समाजकार्याला वाव देत आहोंत. याच प्रकारचें समाजकार्य परिणत व्हावें असे आमचे प्रयत्न आहेत.

सुदैवानें या देशांत समाजसेवेची प्रदीर्घ परंपरा आहे. १९ व्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांत आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत समाजजीवनांच्या अनेक क्षेत्रांत सुधारणेची प्रचंड चळवळ चालू होती. महाराष्ट्रांत ज्योतिबा फुले, न्यायमूर्ति रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर, गोखले आणि इतर अनेकजण हितसंबंधीयांकडून प्रखर विरोध होत असतां तो सहन करूनहि आपल्या ध्येयाचा प्रचार करीत होते. त्यांच्या कार्याबद्दल एवढेंच सांगितलेलें पुरे कीं, आपल्या समाजाच्या भौतिक व नैतिक- प्रगतीवर त्यांच-

प्रमाणें विचारावर त्यांचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे. तथापि समाज-सुधारणा व समाजसेवा यांत फरक केला पाहिजे. हा फरक सूक्ष्म स्वरूपाचा आहे, कदाचित कल्पनेंतलाहि असेल. समाजसुधारणेला जीवनाच्या स्वरूपांतच एक नवा ध्येयवादात्मक आशय देऊन बदल करावयाचा असतो तर कांहीं व्यक्तींच्या वा गटाच्या दु:खहरणाचें, अडचणींच्या परिहाराचें परिमित ध्येय समाजसेवेंत अंतर्भूत असतें. समाजसुधारणेचें कार्य हें जनमत बनविण्याऱ्या नेत्यांचें आहे, तर समाजसेवेसाठीं विशिष्ट प्रकारचें शिक्षण घेतलेल्या कार्य-कर्त्यांचें पथक लागत असतें. हे कार्यकर्ते समाजसेवेचा व्यवसाय करणारेहि असूं शकतात. समाजसुधारक व समाजसेवक यांच्यांतील भेदाची सीमा पुसट असली आणि फुले यांच्यासारखे समाजसुधारक हे मोठे समाजसेवकहि असले तरीहि हा भेद आपण लक्षांत ठेवावयास हवा. त्यामुळें कोणत्या स्वरू-पाची समाजसेवेची पद्धति आपणास उत्क्रांत करावयाची आहे आणि समाज-सेवकांना कोणता भाग घ्यावा लागेल हें आपण स्पष्टपणें जाणूं शकूं.

आपले प्रश्न विविध स्वरूपाचे आहेत आणि समाजसेवक हे प्रश्न सोडविण्या-साठीं आपली शक्ति वेचूं शकतील. या प्रश्नाचे स्थूलमानानें दोन गट पडतात. पहिल्या प्रकारचे जे प्रश्न आहेत ते ज्या कांहीं व्यक्तींना वा गटांना सामाजिक विषमतेमुळें, अन्यायामुळें दु:ख सहन करावें लागतें त्यांच्यापुरते मर्यादित असतात, तर दुसऱ्या प्रकारच्या प्रश्नांचे संबंध विकासकार्याशीं निगडित असतात. पहिल्या वर्गात मुख्यत: शारीरिक दृष्ट्या अपंग झालेले, भिकारी, वाट चुकलेलीं गुन्हेगार मुलें, वेश्या, अंमली पदार्थांचें सेवन करणारे व्यसनी यांचे प्रश्न; तसेंच हरिजन, गिरीजन आणि माजी गुन्हेगार हे जे समाजांतील दलित त्यांचा उद्धार याचा अंतर्भाव करावा लागेल. दुसऱ्या प्रकारांत मुलें व तरुण यांचें कल्याण, ग्रामीण पुनर्घटना, सामूहिक विकास, कुटुंबनियोजन या प्रश्नांचा समावेश होतो.

समाज-कल्याणाचें ध्येय स्वीकारल्यामुळें समाजसेवेच्या अनेक क्षेत्रांत शासन महत्त्वाचा भाग घेतें. यापूर्वीं शिक्षण व सार्वजनिक आरोग्य एवढ्या-पुरतेंच सरकारचें समाजकल्याण कार्य मर्यादित होतें. पण आतां विविध क्षेत्रांत सरकार हें कार्य करतें. १९५३ मध्यें मध्यवर्ति समाजकल्याण मंडळाची स्थापना झाली व नंतर राज्यनिहाय त्याच्या शाखा अस्तित्वांत आल्या. समाज-

कल्याणाचें ध्येय गांठण्यासाठीं चाललेल्या आपल्या मोहिमेंतील हें महत्त्वाचें पाऊल होतें. समाजसेवेचें कार्य करणाऱ्या खाजगी, स्वयंसेवक संस्थांना आर्थिक मदत देऊन व इतर अनेक प्रकारें मदत करून तसेंच, समाजसेवेंत गुंतलेल्या संस्थांच्या कार्यांत एकसूत्रता आणून समाजकल्याण मंडळानें शिस्त निर्माण केली आहे. याखेरीज सरकारचीं अनेक खातीं कांहीं प्रमाणांत समाजसेवेचें कार्य करीत असतातच.

अनेक खाजगी संस्था समाजसेवेचें अमोलिक कार्य करीत आहेत. आणि कांहीं संस्था जें कार्य करीत आहेत त्याबद्दल आपल्या या राज्याला अभिमान वाटावा अशीच परिस्थिति आहे. हिंगण्याची स्त्रीशिक्षण संस्था स्त्रीशिक्षणाचें, विशेषत: विधवा आणि त्यांतहि विशेषत: मागासलेल्या वर्गाच्या स्त्रिया यांच्या शिक्षणाचें कार्य करते, तर रयत शिक्षण संस्था ग्रामीण भागांत शिक्षण-प्रसार करते. सामाजिक प्रश्नांचा शास्त्रीय अभ्यास व संशोधन करण्याचें कार्य टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेसमध्यें चालतें. या संस्था आपल्या क्षेत्रांत नांवाजलेल्या आहेत. शिवाय लोककल्याणाचें बहुमोल कार्य करणाऱ्या इतरहि अनेक संस्था आहेत.

अशा प्रकारें समाजकल्याणाचें कार्य सरकारी व बिनसरकारी रीत्या या प्रमाणांत चाललें असलें तरीहि कल्याणकारी राज्याचें ध्येय गांठण्यास आपणांस अजून अवकाश आहे. प्रथमत: सरकारी व बिनसरकारी संस्थांत सहकार्य व सुसूत्रता निर्माण व्हावयास तर हवीच; पण या दोन्ही प्रकारच्या संस्थांतहि प्रत्येकीं असेंच सहकार्य व सुसूत्रता निर्माण होण्याची आवश्यकता आहे. कांहीं खास कारणासाठीं समाजकार्याचीं वेगवेगळीं क्षेत्रें पाडतां येतील, पण प्रत्यक्षांत या प्रश्नांना अलग, स्वतंत्र अस्तित्व नाहीं. एक प्रश्न दुसऱ्यावर अवलंबून असतो, कारण अखेरीस ते सर्वत्र एकाच वास्तवतेची परिणति असतात. तेव्हां हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतांना आपल्या कार्यांत सुसूत्रता हवी. आणि सुसूत्रता म्हणजे केवळ माहितीची देवाणघेवाण नव्हे तर त्याहि-पलीकडे तिची व्याप्ति जावयास हवी. दुसरें असें कीं, आपल्या सामाजिक प्रश्नाची व्यापकता व त्यांचें वरील स्वरूप लक्षांत घेतां सामाजिक कार्य करण्यासाठीं अधिकाधिक संस्था पुढें येतील अशी अपेक्षा आहे. सामाजिक कार्य परिणामकारक होण्यासाठीं तें शास्त्रशुद्ध झालें पाहिजे. त्याकरितां आवश्यक

ती सर्व आंकडेवारी व माहिती उपलब्ध होणें जरूर आहे. आंकडेवारी गोळा करणें हेंच एक मोठें काम आहे व तें फार काळजीपूर्वक झालें पाहिजे. विद्यापीठें, महाविद्यालयें व इतर शिक्षणसंस्था हें कार्य करण्यास लायक आहेत. छोटी बचत मोहिम वगैरेसारख्या कार्यांत क्रीडामंडळें, म्युझिक सर्कल्स वगैरेंना भाग घेतां येईल, तर कुटुंबनियोजनाचें काम महिला मंडळें करूं शकतील. सध्यांच बऱ्याचशा संस्था या क्षेत्रांत चांगलें काम करीत आहेत. यापेक्षां बऱ्याच अधिक संस्थांनीं पुढें येऊन राष्ट्रीय कार्यांतील आपला वांटा उचलावा हा माझा मुख्य मुद्दा आहे.

कांहीं लोकांचा असा गैरसमज झालेला आहे कीं देशांतील विकासकार्याची जबाबदारी फक्त सरकारची आहे. पण आपल्या नियोजनाच्या उद्दिष्टाशीं हा समज विसंगत आहे. व्यापक दृष्टीनें पाहिल्यास सरकार हें हंगामी आहे तर योजनाबद्ध विकासाचा कार्यक्रम ही सातत्यानें चालणारी, कायम स्वरूपाची प्रक्रिया आहे. नवी समाजरचना निर्माण करण्याचा लोकांचा प्रयत्न म्हणजे योजनाबद्ध विकास होय आणि हें कार्य पक्ष वा गट यांच्या अतीत आहे. लोकशाही राजवटींतील नियोजन हा एक प्रचंड व एका अर्थी अपूर्व असा प्रयोग असून सरकारी प्रयत्नापेक्षांहि सामाजिक कार्याला त्यांत महत्त्वाचा भाग आहे. जर आपण यांत पराभूत झालों तर लोकशाही नियोजन करीत असल्याचा आपला दावा व्यर्थ ठरेल. लोकशाहींतील नियोजनांत कार्याबाबत अडचणी येत असतील; पण मानवी मूल्यांची जपणूक होत असल्यानें याची भरपाई त्याहून अधिक होत असते. आपल्या नियोजनाचें हें मानवी वा नैतिक अंग आहे असें आपण म्हणू शकाल. योजनांचें तंत्र आणि कारभारयंत्रणा यांच्यांत गुरफटून जर या अंगाकडे आपण दुर्लक्ष केलें तर आपल्या नियोजनाचा मूळ उद्देशच बरबाद होईल. हा धोका टाळण्यासाठीं आपण नियोजनांत सामाजिक कार्यावर भर द्यावयास हवा व समाजकल्याणाच्या कार्यास भरपूर वावहि द्यावयास हवा. जर आपण हें करूं शकलों तर ज्या प्रकारची नवी समाजरचना उभारण्याचें आपण स्वप्न पाहात आहोंत तिचा पाया आपण रचूं शकूं.
( ११ ऑगस्ट १९६०. मुंबई: प्रोग्रेसिव्ह ग्रूप )

* * *



हीं जळित कर्जें माफ करण्यांत शासनाची उपकाराची भावना नाहीं. यांत देणारा कोणी तरी राजा आहे व घेणारी कोणीतरी प्रजा आहे अशी भावना नाहीं. हें एक आवश्यक नसर्गिक पाऊल म्हणून टाकलें आहे. कांहींजण मला

# मराठा कीं मराठी ?

पत्र लिहितात कीं, 'तुम्ही छत्रपतींप्रमाणें गोब्राह्मणप्रतिपालक होऊं इच्छितां. ब्राह्मणांचें प्रतिपालन केलें असतां गायीला विसरूं नका.' पण नवें राज्य गोब्राह्मणप्रतिपालक नाहीं, तें सर्वप्रतिपालक आहे. लोकांच्या अपेक्षा मोठ्या आहेत. त्या कशा पूर्ण करणार या कल्पनेनें आम्ही गोंधळून जातों. परंतु एक गोष्ट निश्चित कीं आमचा विचार अपुरा असेल पण तो खोटा नाहीं. महाराष्ट्रांतील खेड्यापाड्यांतून आलेल्या नव्या पिढीजवळ ध्येयवाद आहे. तिचे शब्द रांगडे असतील. ब्राह्मण समाजानें तिला सुधारून घेतलें पाहिजे. लोक या कर्जमाफीचा हेतु मला विचारतात. तो सांगण्याचें मी यापूर्वी टाळलें. जळितपीडितांचें कर्ज माफ केल्यापासून अनेक कर्जमाफीच्या मागण्या येत

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. दि:

आहेत. पण हें कांहीं कर्जमाफीचें धोरण नव्हे. तसेंच निव्वळ आर्थिक मदत करण्याचा यामागें हेतु नाहीं. १९४८ सालीं घडलेल्या प्रकारांनीं महाराष्ट्राच्या सामाजिक मनावर खोल जखम झालेली आहे. ती दूर करण्याचा हा प्रयत्न आहे. यानें ती संपूर्ण नाहींशी होईल असें नाहीं. ४८ सालच्या त्या प्रकारामुळें महाराष्ट्रांतील प्रमुख समाजाच्या मनांत एका नको त्या ठिकाणीं आपण आहोंत, अशी भावना निर्माण झाली. पण राष्ट्रीय जीवनावर दृष्टि ठेवून महाराष्ट्राच्या दूरच्या सफरीवर आपण निघालों आहोंत त्या दृष्टीनेंच कार्यरत झालें पाहिजे. हें राज्य मराठा राज्य नाहीं तर मराठी राज्य आहे.

महाराष्ट्रांत बौद्धिक विकासाचें कार्य व कर्तृत्व ब्राह्मणांनीं केलें हें विसरतां कामा नये. पण संख्या आहे म्हणून वेगळी भावना येतां कामा नये. संख्या हीच सारसर्वस्व नव्हे. ज्या ब्राह्मण समाजानें बौद्धिक कर्तृत्व गाजविलें तो समाज आज काहीं एका भावनेनें कर्तृत्वाला पारखा होऊन, सचिंत होऊन बाजूस राहात आहे हें मला बरें वाटत नाहीं. बुद्धीचें कर्तृत्व जगन्मान्य झालें आहे.

इतिहासांत जेव्हां जेव्हां सर्व थर एकत्र झाले तेव्हां तेव्हां ते अटकेपर्यंत पोहोंचल्याचें आपणांस माहीत आहे. नव्या महाराष्ट्रांतहि हें व्हावें अशी आज काळाची मागणी आहे. सामाजिक भेद गेल्यावर मतभेद राहिले तर हरकत नाहीं. कारण ते बुद्धिप्रामाण्यावर आधारलेले असतील.

( ता. १६ मे १९६० ; सांगली : जळितकर्जमाफीबद्दल सत्कार )

* * *

"जातीय भावना समूळ नष्ट करावयाची असेल तर समाज एकसारखा विधायक कार्यांत गुंतला जाईल या दिशेनें प्रयत्न केले गेले पाहिजेत."

"समाजांतील विविध गटांतील लोकांचे प्रश्न वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतून समजावून घेऊन सोडविण्याचें व्रत राज्यानें घ्यावें. सामाजिक उदारता अंगीं बाणल्याखेरीज हें व्रत पार पडणार नाहीं. पूजा गुणांची, जातीची नव्हे असें मी म्हणतों तें याचकरितां. बहुजनसमाज म्हणजे सर्व कष्टकरी समाज."



अल्प मतांत असतील त्यांना विश्वासांत घेऊन बहुमतानें जें राज्य चालतें तेंच बहुमताचें राज्य अशी माझी व्याख्या असून तीच खरी लोकशाही आहे. ज्याला त्याला त्याच्या त्याच्या गुणाप्रमाणें वाव मिळेल अशी मी ग्वाही दिलीच

# मतभेद वाढवूं नका

आहे. महाराष्ट्राचें आर्थिक, राजकीय व सामाजिक जीवन एकजिनसी करण्याचें आश्वासनहि दिलें आहे. असें घडलें नाहीं तर मीं तो महाराष्ट्र राज्याच्या धोरणाचाच नव्हे, तर माझा वैयक्तिक पराभव मानीन.

व्यापार-उद्योगाबद्दल हा समाज प्रसिद्ध असून नवीन महाराष्ट्र राज्याला या प्रवृत्तीची फार जरूर आहे. आपण आपल्या परिषदेंत सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांची खुशाल चर्चा करा, पण कृपा करून अल्पसंख्य समजून राजकीय मतभेद वाढवूं नका ; राजकीय मतभेद मारून टाका.


जीव।शिवाच्या ऐक्याची भावना आपल्या अद्वैत तत्त्वांत आहे. आपलें राज्य एका विशिष्ट धर्माचें अगर पंथाचें नाहीं याचा अर्थ आपलें राज्य निधर्मी आहे असा आपण करतों. पण 'निधर्मी' हा शब्द मला मंजूर नाहीं. कारण त्याचा अर्थ धर्म-शून्य, श्रद्धा नसलेला असा होतो. राज्यांतील प्रत्येक नागरिकाचें धार्मिक जीवन स्वतंत्र असलें पाहिजे. पण त्याचबरोबर राज्याला एक विशिष्ट धर्म असतो. महाराष्ट्र राज्याची स्थापना आपण परमेश्वरावर श्रद्धा ठेवून केली आहे, व माणुसकी हा आपल्या राज्याचा धर्म आहे. राज्याला मूलभूत अशा कांहीं श्रद्धा बाळगाव्या लागतात. मराठी बोलणारा तोच महाराष्ट्रीय असें आम्ही मानीत नसून महाराष्ट्राच्या जीवनाशीं समरस झालेला तो महाराष्ट्रीय असें मानतों.

( १७ मे १९६०. सांगली: वीरशैव लिंगायत परिषद् )

* * *

'महाराष्ट्र राज्याचा पहिल्या नंबरचा चाकर' या दृष्टीनें यशवंतराव आपल्या मुख्य मंत्रीपदाचा विचार करतात. आणि जरी काँग्रेस पक्षाचें नेतृत्व त्यांच्याकडे असलें तरी राजकीय कार्यकर्त्यांनीं समाजाची पक्षीय दृष्टीनें विभागणी करूं नये, कार्याला भरपूर वाव आहे. प्रत्येक माणूस, प्रत्येक मूल हें सावली देणारें झाड आहे असें लक्षांत घेऊन त्याच्या मशागतीचें काम कार्यकर्त्यांनीं केलें पाहिजे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीचें कार्य करावयाचें तर कार्यकर्त्यांचा जनतेशीं निकटचा संबंध असावा लागेल. म्हणूनच वादंगापेक्षा ऐक्यावर ते भर देत असले तरी पक्ष असूं नयेत, मतभेदांना थारा मिळूं नये असें त्यांचें मत नाहीं. मतभेद हें जिवंतपणाचें लक्षण असल्याचें ते मानतात. पण त्यांना तात्त्विक बैठक असावी आणि कल्याण ही अंतिम कसोटी मानण्यांत यावी. ही कसोटी मानल्यानंतर व आपला निश्चय पक्का झाला कीं तो निर्भयपणें लोकांपुढें मांडावा. जनतेशीं फक्त गोडच बोलावें असें नाहीं तर सत्य बोलावें; मग तें सत्य कठोर वाटलें तरी हरकत नाहीं. जनतेला माणूस पटला, त्याचा विचार पटला, कर्तृत्व उमगलें कीं ती आपला राग विसरून जाते हे स्वानुभवाचे बोल यशवंतरावांनीं आपल्या कार्यकर्त्यांना ऐकविले आहेत, आणि समाजाचें भंगलेलें मन सांधण्याचें, त्रिमूर्तिप्रमाणें विविधतेंत एकता साधण्याचें कार्य करण्याचें आवाहन त्यांनीं केलें आहे. एक फार मोठी सफर सुरू झाली आहे. या सफरीच्या मार्गावर हे विचार दीपस्तंभाप्रमाणें वाटतील.

* * *



महाराष्ट्र राज्याचा पहिल्या नंबरचा चाकर म्हणून मी बोलत आहें. माझ्याविषयीं अलीकडे जें बोललें व लिहिलें जातें त्याविषयीं मी फार सावध आहे. माझा अपुरेपणा आणि दोष इतरांना माहीत नसले तरी मला माहीत

# जनकर्तृत्वाचा साक्षात्कार

आहेत. माझा विचार लोकप्रिय होवो वा न होवो, तो सांगावयास मी कचरणार नाहीं. मी व्यवहारानें, मार्ग तपासून चालणारा माणूस आहे. पण त्यामागें कांहीं तात्त्विक बैठकहि आहे. मतभेदावर आज मला भर द्यावयाचा नाहीं. मतभेद असू नयेत असें माझें मत नाहीं. मतभेद नसतील तर आपलें महाराष्ट्रपण राहणार नाहीं. आणि जेव्हां मतभेद झाले तेव्हां मी तें स्पष्टपणें सांगितलेंहि आहे. पण आज महाराष्ट्र राज्यस्थापनेच्या सोहळ्यांत भरलेली ही सर्वपक्षीय सभा वेगळ्या प्रकारची आहे.

महाराष्ट्र राज्यस्थापनेच्या सोहळ्याचे वेळीं महाराष्ट्रासाठीं ज्यांनीं

आपले प्राण दिले त्यांच्या त्यागाविषयीं मलाहि आदर आहे, आणि त्यांना मुजरा करावयास मीहि तयार आहे. कारण महाराष्ट्राची निर्मिति ही महाराष्ट्राच्या जनतेचें कर्तृत्व आहे. शिवाजीमहाराजांच्या काळांत मराठी जनतेनें जें कर्तृत्व दाखविलें तें या काळांत पुन्हां दिसलें. त्यावेळीं छत्रपतींचें राज्य आलें आणि आज जनतेचें राज्य झालें, हाच सतराव्या व विसाव्या शतकांतील फरक आहे. पण ज्यांनीं संयुक्त महाराष्ट्रासाठीं आपले प्राण दिले त्यांच्या त्यागाचा वापर राजकारणासाठीं कोणींही करतां कामा नये.

महाराष्ट्र राज्याचा प्रमुख या नात्यानें माझ्या शिरावर अनंत बोजे येऊन पडले आहेत. त्यागांतून निर्माण झालेल्या या राज्यांतील तीन कोटि लोकांच्या आणि माझ्या भावना व विचार यांत अंतर पडलें तर माझ्या चाकरीची मी कोणावर सक्ति करणार नाहीं, पण कोणत्याहि परिस्थितींत महाराष्ट्राच्या हिताचा विचार निर्भीडपणें सांगण्याची परवानगी माझी मलाच मी देऊन टाकली आहे. आतां महाराष्ट्र राज्य स्थापन होत आहे. दहा वर्षांनंतर गुजराथ व महाराष्ट्र यांत महाराष्ट्र मागे पडतो कीं काय अशी मलाहि एस्. एम्. जोशीं-प्रमाणें भीति वाटते. तेव्हां 'डोकीं तापवा' असा सल्ला सेनापति बापट यांनी दिला असला तरी त्यावर थंड पाणी ओतण्याचें काम मी करणार आहे. शेतीच्या पाणीपुरवठ्यासाठीं ज्याप्रमाणें पाण्याचा साठा करतात तसा सांठा याहि बाबतींत करण्याची गरज आहे. दिल्लीपति आणि आपण कोणी वेगळे आहोंत ही भावना आपण ठेवतां कामा नये, हें निक्षून सांगावेसें वाटतें. ज्या ज्या वेळीं महाराष्ट्राचें कर्तृत्व हें भारतीय कर्तृत्वाशीं समरस झालें त्या त्या वेळीं भारत मोठा झाला आणि महाराष्ट्रहि मोठा झाला अशी इतिहासाची साक्ष आहे.

महाराष्ट्राची औद्योगिक प्रगति वेगानें होण्यासाठीं औद्योगिक शांततेची आवश्यकता आहे आणि माझ्याकडून हा प्रयोग मी करून पाहणार आहे. निव्वळ कामगार-वर्गाचें हित, निव्वळ उद्योगपतींचें हित किंवा निव्वळ उद्योगाचें हित यापेक्षांहि महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें यापुढें विचार व्हावयास हवा. हा प्रयोग फसेल असें मला अनेकजण सांगतात, पण याहि चक्रव्यूहांत मी माझ्या स्वभावानुसार शिरणार आहे. गेल्या पांच दहा वर्षांतील घडामोडींनीं औद्योगिक शांततेला वेगळा अर्थ निर्माण झाला आहे. आपण त्यांतून सावरलें पाहिजे आपल्या विचारवंतांनीं आतां सामाजिक संशय टाकून दिले पाहिजेत. सामान्य

माणूस यापैकीं कशालाहि बळी पडत नसल्यानें विचारवंतांनींच अंतर्मुख होऊन नम्र भावनेनें नवविचार केला पाहिजे. तसेच परंपरेचें जतन करतांना परंपरेंतील वैगुण्यें टाळलीं पाहिजेत.

संयुक्त महाराष्ट्रनिर्मितीचा आनंद निर्भेळ नाहीं हें मला मंजूर आहे. दक्षिण सीमेचा प्रश्न सुटलेला नाहीं. पण तो सोडविण्यासाठीं आपण एक-मेकांच्या सल्ल्यानें पावलें टाकूं तरच यशस्वी होऊं. दक्षिण सीमेचा प्रश्न सुटणार आहे असा माझा विश्वास आहे. पण मी वेळापत्रक देऊं शकत नाहीं. पण असें वेळापत्रक कोणाजवळच नाहीं. लढ्याचा मार्ग मला पसंत नाहीं व हें मी पक्षीय दृष्टीनें बोलत नाहीं.

( २८ एप्रिल १९६०. पुणें : सर्वपक्षीय सभा )

* * *

"जनतेला सांगितलें पाहिजे कीं 'तूं राजा आहेस. अविकसित, दुष्काळी अशा कडेकपारीच्या बनलेल्या सह्याद्रीचा राजा आहेस." दुःखांत असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करणें हें राजाचें कार्य प्रत्येक मराठी माणसानें केलें पाहिजे. एकेक माणूस, लहान मूल, हें सावली देणारें झाड आहे असें मानून त्यास खतपाणी घातलें पाहिजे. किमान ३० वर्षांची ही योजना आहे."



राजकीय वादंग हें दुय्यम दर्जाचें किंवा गौण आहे म्हणून तें दूर ठेवून महाराष्ट्रांतील सर्व पक्षांनीं व विचारवंतांनीं महाराष्ट्राचे मूलभूत सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठीं एकविचारानें एकत्र यावें. सर्व प्रकारचे भेद,

# भावनात्मक ऐक्य

राजकीय डावपेंच व वाद दूर ठेवून आपण सारी शक्ति योजनेच्या अंमलबजावणीवर केंद्रित केली पाहिजे.

नवभारताच्या उभारणीत महाराष्ट्राला आपला हिस्सा उचलायचा आहे. म्हणून महाराष्ट्राच्या प्रकृतींतील गुणदोषांची चर्चा करणें अप्रस्तुत ठरणार नाहीं. महाराष्ट्राची स्थापना झाल्यापासून आबालवृद्धांत अननुभूत भावना निर्माण झाली आहे. सर्वांच्या सद्भावना आपल्या पाठीशीं आहेत. पण केवळ

सद्भावनेनें राज्य करतां येत नाहीं.

आपण १ मे रोजीं महाराष्ट्रनिर्मितीच्या आनंदांत वेहोष होतों. पण त्याच वेळीं महाराष्ट्राच्या एका भागांत नागपुरांत वेगळेंच कांहीं घडत होतें. महाराष्ट्रांतून फुटून वेगळें होण्याची भावना व्यक्त केली जात होती. विदर्भाची ही एक समस्या आहे. विदर्भीयांची कथा, त्यांचे विचार आपण समजून घेतले पाहिजेत. त्यांच्यावर रागावतां येणार नाहीं. पूज्य अणे यांच्यावर कोण रागावणार ? आम्ही कांहीं त्यांच्यावर रागावूं शकत नाहीं. ज्या छत्रपतींच्या व लोकमान्य टिळकांच्या पुण्याईच्या जोरावर महाराष्ट्र निर्माण झाला तीच पुण्याई विदर्भाचे गैरसमज दूर करील. नागपूरचें महत्त्व कमी झालें अशी भावना त्यांच्यांत पसरली आहे ती दूर झाली पाहिजे. विदर्भीयांचीं मनें जिंकलीं पाहिजेत. त्यांच्यांत जागृति केली पाहिजे. महाराष्ट्राला ही कामगिरी करावी लागणार आहे. हा प्रश्न सर्वांचा आहे. त्याची काळजी केवळ मुख्य मंत्र्यांनीं करावयाची असें नाहीं. सीमाप्रश्नाइतकेंच विदर्भाच्या प्रश्नाला महत्त्व आहे. विदर्भीयांचा स्वभाव मोकळा आहे. ते व्यासपीठावर हुज्जत घालतील, पण प्रेमानें घरीं चहाला बोलावतील; खेळीमेळीनें गप्पागोष्टी करतील.

नवबौद्धांची समस्या ही अशीच महत्त्वाची आहे. महाराष्ट्रांतील आम जनतेशीं तिचें भवितव्य निगडित आहे. समानता व स्थैर्य या पायावर नवबौद्धांना समाजांत स्थान मिळावयास हवें. भूमिहीनांना जमिनीचें वांटप करण्यांत येत आहे आणि यांत नवबौद्धांचा क्रम पहिला आहे.

हे जे प्रश्न आहेत त्यांवर राजकीय दृष्टिकोणांतून विचार करून तोडगा काढणें चुकीचें आहे. हे प्रश्न महाराष्ट्राच्या दृष्टीनें अगदीं मूलभूत स्वरूपाचे आहेत. राजकीय पक्षांनीं त्यांचें भांडवल करून ते सुटण्यास मदत होणार नाहीं. राजकीय पक्षांनीं हे प्रश्न घेऊन जनतेंत जाऊं नये असा माझा उद्देश नाहीं. परंतु भावनात्मक ऐक्य कसें साधतां येईल, याकडे लक्ष दिलें पाहिजे. हें भावनात्मक ऐक्य विदर्भापुरतें लागू नाहीं. बहुरंगी मुंबई शहरानेंसुद्धां महाराष्ट्राशीं समरस झालें पाहिजे. जातीयवादाचा प्रश्न असाच महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रांत जातीय वादाचें मूळ शिल्लक असलें तरी त्याचें प्रस्थ निश्चितपणें कमी झालें आहे. माझ्यांत एक टक्कादेखील जातीयवाद नाहीं असा माझा दावा

नाहीं. तथापि हा एक टक्का जातीयवाद दुसऱ्याचें नुकसान करणार नाहीं अशी खबरदारी आपण घ्यावयास हवी.

सीमाप्रश्न सोडविण्यासाठीं स्वतंत्र कार्यक्रम आखतां येईल. पण तो सर्वांना परवडेल असा हवा. हा भांडणाचा विषय नव्हे. मी कांहीं संत नाहीं. राजकारणांतला माणूस आहें. मी भांडणें करणार नाहीं पण कोणी उकरून काढलें तर पाठ फिरवून पळून जाणार नाहीं.

महाराष्ट्रांत औद्योगीकरणाचा पुरस्कार मी करतों, त्याचप्रमाणें देशाच्या रक्षणार्थ लष्करीकरणाचा आग्रह मी धरतों. मला अयुबखान निर्माण करावयाचा आहे, मला अयुबखान व्हावयाचें आहे अशी यावर टीका होते. पण भारतांत अयुबखान निर्माण होऊं नयेत म्हणून तर मी लष्करीकरणाचा पुरस्कार करीत असतों. बहुजनसमाजांतून सैनिक व लष्करी अधिकारी येऊं लागले कीं त्यांचा सामान्यांच्या जीवनाशीं संबंध राहील व त्यामुळें लष्करांत कधींच अयुबखान निर्माण होऊं शकणार नाहीं. सर्वांना लष्करी शिक्षण द्यावें असें माझें मत आहे.

( ३१ मे १९६०. पुणें : वसंत व्याख्यानमाला )

* * *

## आपलें घर वाटावें

पराक्रम गाजवून प्रभु रामचंद्र अयोध्येला परत आले, तेव्हां जसा आनंद झाला तसा आनंद आज येथें महाराष्ट्र काँग्रेस आल्यानें जनतेला आणि मला होत आहे.

काँग्रेस हाऊस ही काँग्रेस पक्षाची कचेरी होऊन राहतां कामा नये. ही कचेरी केवळ कार्यक्रम आणि क्रियाशील कचेरी नसावी तर जनतेचे अश्रु व दुःख पुसण्याचें कार्य येथून पार पडावें. हें आपलें घर आहे ही भावना जनतेंत पसरली पाहिजे. काँग्रेस हा नांवाचा समाजवादी पक्ष म्हणून राहूं नये, तर सर्व गरीब जनतेच्या समानतेसाठीं लढणारा पक्ष असावा. खऱ्या समानतेची अनुभूति क्षणाक्षणाला यावयास हवी. प्रत्येक पावलों पावलीं कृतींत आणि विचारांत समाजवाद आहे कीं नाहीं, आपल्या कार्यांतून जनतेचें हित साधतें

कीं नाहीं हें आपण पाहिलें पाहिजे. जिवंत मासा ज्याप्रमाणें पाण्यांत सांपडतो त्याप्रमाणें जिवंत कार्यकर्ता समाजांत सांपडला पाहिजे.

महाराष्ट्राच्या विकासाचा प्रश्न आपल्यापुढें आहे. हा विकास करण्याची जबाबदारी महाराष्ट्रांतल्या जनतेची आहे. ती केवळ मुख्य मंत्र्याची जबाबदारी नाहीं. महाराष्ट्राच्या सर्व विभागांत जिव्हाळा व आपलेपणा निर्माण झाला पाहिजे व हें कार्य महाराष्ट्राच्या विधानसभेंत मुख्य मंत्र्यांनीं घोषणा करून होणार नाहीं; तर प्रत्येकाच्या मनांतच ही भावना निर्माण व्हावयास हवी. वैभवशाली महाराष्ट्राचें स्वप्न साकार होण्यासाठीं लक्षावधि लोकांनीं घाम गाळून कार्य केलें तरच येत्या दहा वर्षांत हें चित्र पुरें करतां येईल. नाहींतर आपण कायमचे मागें पडूं.

महाराष्ट्रांत भारत निर्माण व्हावयाचा आहे. मुंबईतील गुजराथी, पारशी, सिंधी इत्यादि सर्वांनींच पराक्रम करून महाराष्ट्राला संपन्न करावें. मुंबई सर्वांची आहे व ती सर्वांची राहील. मायेच्या व प्रेमाच्या जाळ्यांत आपणांस ती पकडावयाची आहे.

( १ ऑगस्ट १९६०. मुंबई : महाराष्ट्र कांग्रेस कचेरी )

* * *

"गुजराथ व महाराष्ट्र राज्यें एकाच दिवशीं जन्माला आलीं. गुजराथ एकदिलानें आपल्या विकासाच्या कामाला लागला आहे. पण महाराष्ट्रांत घरगड्यांच्यापासून अनेक मोर्चांना सुरुवात झाली आहे, हें बरें नव्हे."

## भावनेचा प्रश्न

एकतेच्या व बंधुत्वाच्या भावनेनें आपण लवकरच नागपूरला जात आहोंत. तेथें गेल्यावर तुम्ही व आम्ही ही भावना आपण विसरली पाहिजे. खरा प्रश्न भावनेचा आहे आणि तो समजावून घेऊनच पुढचीं पावलें टाकलीं पाहिजेत. राज्यकारभाराच्या कसोटया वेगवेगळ्या असूं शकतात. लोकांच्या भावना

समजावून घेऊन राज्यकारभार करणें ही माझी कसोटी आहे.

पूर्वीच्या मराठी कवींच्या कल्पनेची भरारी सह्याद्रीभोंवतीच घोटाळत होती. आतां तिची झेप अजंठा-वेरुळ, रामटेकपर्यंत पोहोंचली आहे. याचा अर्थ पूर्वी या स्थळांसंबंधीं आमच्या कांहीं भावना नव्हत्या असा नाहीं. रामटेक, शिंदखेडा व वेरूळ यांसंबंधीं आमच्या विशिष्ट भावना होत्या. पण आतां जाण्यायेण्यानें त्या अधिक वाढतील, दृढ होतील. आतां जुन्या भाऊबंदांशीं नव्यानें संबंध आला आहे. त्यामुळें अनेक गोष्टी समजूं लागलेल्या आहेत. आज मांडलेल्या ठरावांत आम्ही काय करणार हें स्पष्ट केलें आहे. हा ठराव म्हणजे काव्य नाहीं तर तो एक लेख आहे. लोकशाहींत संकेताला महत्त्व असतें. म्हणून योग्य त्या परंपरा आम्ही निर्माण करूं. माणसें करारानें एकत्र बांधलीं जात नाहींत तर भावनेनें बांधलीं जातात. २८ मार्च १९५३ रोजीं झालेल्या नागपूर-करारांत विधानसभेचें एक अधिवेशन नागपूरला भरविण्याची तरतूद होती. कुणाची मनधरणी करण्यासाठीं हा ठराव मीं आणला नसून विदर्भांतील जनतेची आकांक्षा त्यामुळें पूर्ण होणार आहे. मराठी भाषिक लोकांनीं एकत्र राहण्याच्या दुर्दम्य भावनेवर हा ठराव अधिष्ठित आहे. ही इच्छा अधिक बलवत्तर करण्यासाठीं जी गोष्ट करणें आवश्यक असेल ती करण्यास आम्ही एक तसूभर मागें राहणार नाहीं.

मराठी प्रदेशाचे वेगवेगळे भाग एकत्र आल्यानंतर त्यांच्या एकात्मतेसाठीं ज्या गोष्टी आवश्यक होत्या त्या मीं केल्या कीं नाहीं हें पंचवीस वर्षांनंतर इतिहासकार ठरवितील. कोणत्या भागाच्या विकासासाठीं किती कोटि रुपये खर्च झाले ही कांहीं यशस्वी कारभाराची कसोटी नाहीं.

'तुम्ही नागपुरांत आलांत तर तुमचें स्वागत होणार नाहीं.' असें कांहीं लोक म्हणतात. पण आम्ही कांहीं पाहुण म्हणून नागपूरला जात नाहीं. आम्ही आमच्याच घरीं जात आहोंत. आपल्या घरीं गेल्यावर आपलें स्वागत झालें पाहिजे असें म्हणणाराला वेडयांतच काढलें पाहिजे. तेव्हां आमचें नागपुरांत स्वागत व्हावें अशी आमची अपेक्षाच नाहीं. रायपूरहून किंवा बेझवाडयाहून आलेल्या पण नागपुरांत भाडयाच्या घरांत राहणारांचाहि नागपूरवर हक्क पोहोंचतो, तर मग आमचा त्या शहरावर हक्क कां पोहोंचणार नाहीं?

पूर्वीं या सभागृहांत नागपूरला कांहीं काळ राजधानी नेण्याचा ठराव

आला असल्याची आठवण करून देण्यांत आली. पण कोणी कोणाचे दोष काढण्याची ही वेळ नव्हे. त्या वेळीं द्विभाषिक होतें. तेव्हां असा ठराव संमत झाला असता तर कुणी सांगावें ? द्विभाषिक अधिक बळकट झालें असतें. आतां महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर नागपूर-कराराची अंमलबजावणी करण्यास योग्य परिस्थिति निर्माण झाली आहे. बीं पावसाळ्यांतच पेरलें तर तें उगवतें, उन्हाळ्यांत बीं पेरावयाचें नसतें.

( १७ ऑगस्ट १९६०: मुंबई विधानसभा )

* * *

" नव्या महाराष्ट्र राज्याचा कारभार प्रामाणिक आणि एकजिनसी असेल. व्यक्तिपूजा व एकाच माणसाचें नेतृत्व या गोष्टी महाराष्ट्रांत असाव्यात ही कल्पना मला मान्य नाहीं. महाराष्ट्रानें गतकाळांत या गोष्टी स्वीकारल्या नाहींत व भावी काळांतहि स्वीकारल्या जातील असें वाटत नाहीं. त्याऐवजीं निश्चित अशा कार्यक्रमावर आधारलेलें सामुदायिक नेतृत्व मला जास्त पसंत आहे. "

## कार्याला भरपूर वाव

पक्षाच्या संघटनेंतील लोकांनीं कार्यक्रमांत भागीदारी घेतली म्हणजे आपोआप सत्तेची भागीदारी चालून येते. समाजवादी समाजरचनेच्या कार्यक्रमाचें प्रमुख अंग आर्थिक आहे. समाजवाद ही जीवनदृष्टि.आहे. भारतांत वर्ग आहेत पण वर्गीय भांडणें योग्य नाहींत. शेतमजूर, कामगार आदींचे प्रश्न हे आर्थिक आहेत. राजकीय व सामाजिक प्रश्नहि आर्थिक कार्यक्रमाविना हाताळणें व्यर्थ आहे. समाजवादांत आर्थिक कार्यक्रमास प्राधान्य आहे. समाजवादी समाजरचनेंत वर्गांतील समाजरचनेची कल्पना हवी.

तुम्ही जनतेचें गाऱ्हाणें जरूर मांडावें. पण तीं गाऱ्हाणीं निकडीचीं असलीं पाहिजेत. जनतेची खरी निकड आणि शासनाची रास्त अडचण असा प्रश्न निर्माण झाल्यास शासनाची अडचण जनतेला सांगितली तर जनता ती ऐकते.

जनता व सरकार यांत एकात्मता निर्माण झाली पाहिजे. जनतेस सरकार एका पक्षाचें आहे असें न वाटतां तें आपलें आहे असें वाटलें पाहिजे. तेव्हां कार्यकर्त्यांनीं शेती, सहकारी चळवळ असें खातेवांटप करून कार्यकर्त्यांनीं कार्य करावें. त्यांत कार्यकर्त्यांना भरपूर वाव आहे. भरीव कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांकडे सरकार आपण होऊन जाईल. त्यासाठीं कार्यकर्त्यांनीं मंत्र्यांची आरती करण्याचें कारण नाहीं.

संसदीय क्षेत्रांतील साधनसामग्रीचा वापर करून पक्षाचें ध्येय गांठण्याच्या दृष्टीनें वाटचाल करावयाची असते. संघटनात्मक कार्याला मात्र अनेक मर्यादा असतात. पण असें असलें तरी संसदीय शाखेला जें कार्य पार पाडणें अशक्य आहे तें पार पाडण्यासाठीं संघटनात्मक शाखेंतील कार्यकर्त्यांनीं प्रयत्न करणें जरूरीचें आहे.

एकात्मतेचें प्रतीक असलेल्या त्रिमूर्तीप्रमाणें महाराष्ट्राचें जीवन एकजिनसी बनविणें व समाज आणि राज्याचा समन्वय साधणें हें कार्य जें नेतृत्व साधील तेंच महाराष्ट्राचें मंगल करील व स्थिर होईल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत महाराष्ट्राला पाण्याचा तुटवडा पडणार नाहीं याची व्यवस्था मी करीन. महाराष्ट्रांतील शेतीच्या समस्येंत प्रामुख्यानें तीन प्रश्न आहेत. शेतीची मालकी ही कसणारांची हवी; तसेंच सेवासंघाच्या मार्गानें सर्व शेती सहकारी क्षेत्रांखालीं आली पाहिजे. शेतीची सुधारणा हाहि एक महत्त्वाचा प्रश्न आहे. मृग, हस्त या नक्षत्रांच्या घाटावर नव्या मथुरेच्या भूगौळणींचा घट रिकामाच राहतो. महाराष्ट्रांत साडेतीन कोटि एकरांत तालीबांधांची गरज आहे.

भूहीन शेतमजुरांचा प्रश्न जमीनधारणेवर किमान मर्यादा घालून आणि सरकारी जमीन किंवा खाजगी मालकीच्या जादा जमिनीच्या वांटपानें हा प्रश्न सुटणार नाहीं. शेतीचें वांटप हा प्रश्न महत्त्वाचा असला तरी शेतीचा विकास आणि छोटे उद्योगधंदे यांची जोड घातली गेल्यावांचून ग्रामीण भागाचा विकास पूर्णांशानें साधणार नाहीं. केवळ शेतकीनें जनतेचें भाग्य उदयाला येणार नसल्यामुळें तिची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं कृषि-औद्योगिक समाजाची उभारणी करण्याशिवाय गति नाहीं. ग्रामीण जनतेच्या प्रगतीच्या दृष्टीनें शेती आणि औद्योगिक विकास या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मनुष्यबळाची महाराष्ट्रांत उणीव नाहीं, तें योग्य रीतीनें कारणीं

लावलें पाहिजे. आणि शिक्षणाच्या प्रसाराचा प्रश्न सुटल्यावर महाराष्ट्रांत क्रांतिकारक बदल होईल.

आम्ही हरिजनांच्या सवलती नवबौद्धांना कायम ठेवल्या हा निवडणुकींतील मतांसाठीं सौदा नाहीं.

निवडणुकीसाठीं 'अ' नें उभें राहावें कीं 'ब' नें, एखादा उमेदवार 'अ' गटाचा असावा कीं 'ब' गटाचा, 'अ' जातीचा कीं 'ब' जातीचा या तपशिलांत मी जाऊं इच्छित नाहीं. नशिबवान 'अ' वर जाईल आणि कमनशिबी 'ब' हा मागें राहील. हा ज्याच्या त्याच्या नशिबाचा प्रश्न आहे. कोणाहि कार्यकर्त्यानें आंधळें असू नये. आंधळा दुनियेंत हिंडू शकेल पण आंधळ्याच्या मागें दुनिया जाऊं शकणार नाहीं."

( ६ ते ८ ऑक्टोबर १९६०. महाबळेश्वर महाराष्ट्र काँग्रेस कार्यकर्त्यांचें शिबिर )

* * *

## कल्पना स्पष्ट असाव्यात

१९६१ साल हें फार महत्त्वाचें ठरणार आहे. या वर्षी अनेक प्रश्न घुसळून निघणार आहेत. या वेळीं काँग्रेस कार्यकर्त्यांनीं आपली भूमिका स्पष्ट व निश्चित स्वरूपांत मांडली पाहिजे. बाहेर एक बोलायचें आणि काँग्रेस कमिटीच्या सभेंत एक बोलावयाचें असें चालणार नाहीं. जनतेला रुचेल असें बोलण्यापेक्षां सत्य बोलणेंच श्रेयस्कर ठरणार असें मला वाटतें आणि म्हणून आपला दृष्टिकोण साफ असला पाहिजे.

बहुजनसमाजाला शिक्षणाचें क्षेत्र खुलें असलें पाहिजे ही मागणी मला मान्य आहे. पण तहसीलदार व इतर सरकारी नोकरीच्या जागा बहुजनसमाजास मिळाल्या पाहिजेत हें म्हणणें बरोबर नाहीं. नोकऱ्या मिळविण्यासाठीं शिक्षण द्यावयाचें असेल तर तें अजिबात बंद झालेलें चालेल. आपण सत्तेचें विकेंद्रीकरण मागतों तें नोकऱ्यांसाठीं नसून तें ग्रामपंचायतीपर्यंत पोचावे म्हणून मागत आहोंत. नोकरीसाठीं शिक्षण घेतलें तर आपण

महाराष्ट्राचें व पर्यायानें भारताचें नुकसान कराल.

जगाच्या इतिहासांत मध्यमवर्गानेंच क्रांति घडवून आणली आहे. क्रांति-कारक विचारांची अंमलबजावणी करतांना जीं महान् संकटें आलीं तीं धैर्यानें दूर सारून मध्यम वर्गानें क्रांति घडवून आणली आहे. इंग्रजी राजवटींत जें शिक्षण मिळालें त्यामुळें मध्यमवर्ग नोकरीकडे वळला व त्याच्या हातून क्रांति-कारक घटना घडून आल्या नाहींत.

(३० नोव्हेंबर १९६०. नागपूर : महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस. सर्वसाधारण सभा.')

* * *

"महाराष्ट्रांतील बहुसंख्य वस्ती खेडयांत आहे. आणि त्यांत 'मराठा' समाज संख्येनें जास्त असल्यानें गांवांतील महार, चांभार, सुतार, ब्राह्मण, माळी इत्यादि अल्पसंख्य लोकांचें रक्षण करण्याची जबाबदारी मराठ्यांवर आहे."

"शिक्षण संपल्यानंतर नोकरी करणार नाहीं अशी प्रतिज्ञा करा. बुद्धि व हात यांचा उपयोग करा. शौर्याला आम्ही कमी पडलों नाहीं तर शास्त्राला कमी पडलों. नव्या आकांक्षांनीं पेटलेले तरुण आतां पुढें आले पाहिजेत. कर्तृत्वाचें पीकच महाराष्ट्रांत उभें राहिलें पाहिजे. गुणी व बुद्धिवान असा महाराष्ट्र उभा राहिला पाहिजे. नवीन घडणारा महाराष्ट्र Sky is the limit (आकाश हीच वेस) असा आदर्श ठेवणारा होवो."



नागपूरच्या मुक्कामांत नागपुरांतील अनेक थोर पुरुषांच्या गोष्टी मीं ऐकल्या. माणसाचें शौर्य ही एक अद्‌भुतरम्य गोष्ट आहे. शौर्याच्या कथा ऐकून अंगावर रोमांच उभे राहतात.

# मोठी सफर

मीं माझ्या सहकाऱ्यांच्या साहाय्यानें विशिष्ट जबाबदारी अंगावर घेतली आहे. ती पार पाडण्याची शक्ति मला थोर पुरुषांच्या आशीर्वादानें येईल असा माझा विश्वास आहे. तीन महिन्यांच्या मुक्कामानें मी नागपूरकर झालों आहें. या मुक्कामांत हारतुरे मिळाले व मोर्चेहि आले. या गोष्टी लोकशाहीच्या द्योतक आहेत. विरोधानें सुरवात होते आणि मित्रत्वानें नंतर आपण जवळ येतों. मतपरिवर्तन करण्यासाठीं लोकशाहीचें 'सभागृह' आहे. लोकशाही ही विरोध वाढविण्याकरितां नसते; विरोध कमी करण्यासाठीं असते. विचारांच्या देवाणघेवाणीचे हें साधन असतें.

नागपूरचें एक कांहीं तरी व्यक्तित्व आहे व नागरपूरसंबंधींच्या कांहीं

समस्या मी समजावून घेऊं शकलों. त्यामुळें दाट जिव्हाळा निर्माण झाला. येथील सर्व समस्या अवश्य सुटतील. मानसिक एकता निर्माण करण्याचा यत्न प्रत्यक्षांत सुरूं झालेला मी पाहिला आहे. या प्रयत्नांची गतिमानता प्रारंभित झाली आहे. या राज्यांत एकात्मता निर्माण करावयाची आहे आणि हें एकात्मतेचें लोण भारतांत पोहोचावयाचें आहे. पोरंबदरपासून दिग्बोई-पर्यंत आणि हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आपल्याला एकात्मता निर्माण करावयाची आहे.

आज कधीं कधीं देशांत विपरीत वर्तन होतांना दृष्टीस पडतें. या देशांत टिळक आणि गांधी झालेच नाहींत कीं काय असें हे प्रकार पाहून वाटूं लागतें. चार चार जिल्ह्यांचे लोक अलग आहेत ही भावना वाढविणें इष्ट नाहीं. यापासून आपण अलिप्त राहिलें पाहिजे. देशासमोर आज अनेक मोठमोठे प्रश्न आहेत. आर्थिक नवरचना, शिक्षण, शेती यांसारख्या मोठ्या गोष्टींचा विचार केला कीं मन मोहरून येतें ! अशा स्थितींत आपण प्रादेशिक भावनांना बांधून राहणार काय ? आज एका नव्या अनुभूतीची प्रेरणा देणारी संधि सर्वांना प्राप्त झाली आहे. दुखणीं आणि तक्रारींची माळ आपल्याला गळ्यांत घालून मिरवावयाचें आहे काय ? कीं हींच दुखणीं नाहींशीं करून पुढें सर-सावयाचें आहे हें आपण आपल्या मनाशीं पक्कें करावयास हवें. आज खेड्यांत नवजीवन निर्माण करावयाचें आहे. तेथील काम करणाऱ्या शेतकऱ्यांना नवी शक्ति प्रदान करावयाची आहे. ही शक्ति शब्दांनीं पुरविली जाणार नाहीं. विजेसारखी शक्ति तेथें ओतली पाहिजे. पण केवळ शेतीनें हा देश समर्थ होणार नाहीं म्हणून उद्योगाची जोड द्यावयास हवी. या गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोन आज बदलला गेला पाहिजे. या देशांत संपत्तीचीं अनेक साधनें आहेत. तीं उपयोगांत आणून देशांत नवनिर्मिति करावयाची आहे.

मी बाहेर पडतों तेव्हां कधीं कधीं 'चव्हाण मुर्दाबाद' असे शब्द ऐकूं येतात. जेथें या घोषणा होतात तेथें नंतर माझा विजय होत आला असल्याचें माझ्या अनुभवास आलें आहे. आतां या घोषणा सोडून द्या. मुर्दाबाद हा वाय-फळ शब्द आहे. महाराष्ट्राची व देशाची एक फार मोठी सफर सुरू झाली आहे. सर्वांनीं एकत्र येऊन ही सफर करावयाची आहे.

महाराष्ट्र निर्माण झाला व नागपूर-करारांचें वचनहि पूर्ण झालें आहे. हें

वचन पूर्ण करून मी जात आहें. लोकशाहीच्या सर्व नव्या प्रयोगाचें लोण घेऊन मी जात आहे. नागपूरची शे-दीडशें वर्षांची राजधानी एकाएकी गेल्याचें दुःख येथील जनतेला झालें हें खरें आहे. पण त्याचें दुःख मानण्याचें कारण नाहीं. विदर्भाबद्दल व त्याच्या प्रगतीबद्दल मला आस्था आहे. येथील विकासाचे प्रश्न सोडविले गेले व सोडविले जाणार आहेत. नागपूरचें वैभव येथील माणसांच्या शौर्यांत आणि माणुसकींत आहे ! नागपुरांतील गरिबांचे प्रश्न सोडविणें हें माझें पहिलें कर्तव्य आहे. अज्ञान व दारिद्रय आम्हांला दूर करावयाचें आहे. तसें झालें नाहीं तर महाराष्ट्र राज्य अपयशी ठरलें असें मी म्हणेन ! ह्या राज्यांत भुकेला माणूस, अशिक्षित माणूस मला दिसावयाला नको. हे प्रश्न सोडविण्यासाठीं सर्वांनीं सामोरे यावें आणि साहाय्यभूत व्हावें ही माझी हांक आहे. जनतेच्या अडचणी दूर करण्यासाठींच सरकार स्थापन झालें आहे.

कोणाच्याहि रागाच्या भावना शिल्लक ठेवून मला जावयाचें नाहीं. माझ्या भावनांचा विपर्यास होऊं नये एवढीच इच्छा आहे. संकुचित भावनेनें विदर्भाकडे पाहूं नका. रायगडावर राज्य स्थापन करणाऱ्या छत्रपतीच्या मातोश्रींचें हें जन्मस्थान आहे. विदर्भांतील माणसाच्या विस्तृत विशाल मनासारखाच हा प्रदेश आहे. माझ्या नजरेनें या प्रदेशांकडे पाहण्याचा प्रयत्न करा. मी घेतलेलें विदर्भाचें दर्शन बाजूला हटण्याचें नसून स्वागताचें आहे.

नागपूरचें सर्व वैभव केवळ राजधानींतच नव्हतें. तसें जर आपण मानलें तर येथील कर्तृत्वाची हेटाळणी केल्यासारखें होईल. ह्या विदर्भांत जंगलांची प्रचंड शक्ति आहे. भूगर्भांत प्रचंड संपत्ति आहे. मोठमोठ्या नद्या धोधो वाहत आहेत. हें सारें सामर्थ्य एकत्र करा. विदर्भाला मिळालेली ही देणगी आहे. तिचा वापर करण्याची जबाबदारी पार पाडावयाची आहे व विदर्भांतील जनता ती पार पाडील असा माझा विश्वास आहे. येथून जातांना मला अयोध्येला सोडून जात असल्यासारखें वाटत आहे ! मी भावनाप्रधान माणूस आहे व म्हणून हें बोललों.

( १९ जानेवारी १९६१. नागपूर : जाहीर सभा )


* * *

"साधी भोळी मराठी जनता भारताला काय देणार ? परंतु आमचें

जें जें कांहीं चांगलें आहे, उदात्त आहे तें तें आम्ही देशसेवेला वाहूं. भारताचें वैशिष्टच पांढऱ्या बर्फाचा हिमालय आहे, तसेंच महाराष्ट्राचें वैशिष्टच म्हणजे काळ्या फत्तराचा सह्याद्रि आहे. या दगडासारख्या छातीनें महाराष्ट्रीय जनता देशरक्षणासाठीं सज्ज राहील असें मी अभिवचन दे.तों "

"निवडणुकींत विदर्भाची जनता आपल्या पाठीशीं आहे एवढें म्हणूनच भागणार नाहीं; तर आपल्याला शिव्या देण्याचें काम जे करीत असतील त्यांचीं तोंडें बंद करण्याची हिंमत आपण अंगीं बाणली पाहिजे. आज महाराष्ट्र टिकला पाहिजे, समृद्ध झाला पाहिजे अशा मताचे ८० टक्के लोक विदर्भांत आहेत. उरलेल्यांना आठ जिल्ह्यांचा विदर्भ हवा आहे. तो त्यांना कां हवा हें सांगण्याची ही वेळ नव्हे पण आमच्या विरोधकांना पाहून घेण्याची धमक आमच्यांत आहे एवढेंच तूर्त सांगावेसें वाटतें."

* * *



म्हैसूर राज्यांत समाविष्ट झालेल्या बेळगांव, निपाणी, कारवार इत्यादींचा मराठी मुलुख पुन्हां महाराष्ट्रांत सामील व्हावा अशी महाराष्ट्राच्या जनतेची तशी या भागांतील मराठी भाषिकांची तीव्र इच्छा आहे. यासाठीं सत्याग्रह, मोर्चे वगैरे चळवळी झाल्या, स्थानिक स्वराज्य संस्थांपासून लोकसभेपर्यंतच्या निवडणुकीपर्यंत लोकांनीं सनदशीर मार्गानें आपलें मत व्यक्त केलें. ना. चव्हाण यांनाहि या प्रश्नाची आंच असून तो सोडविण्यासाठीं सरकारी पातळीवरून त्यांचे प्रयत्न चालू आहेत. यासाठींच मुंबई राज्यविभाजनाचें विधेयक विधान-सभेंत येण्यापूर्वी कांहीं दिवस अगोदर त्यांनीं खेडें हा घटक मानून सीमाप्रश्न सोडवावा असा ठराव मांडला व त्यासंबंधींची आपली भूमिका स्पष्ट केली. सीमाप्रश्न हा, व्यापक राष्ट्रहित लक्षांत घेऊन सोडवावा, ही यशवंतरावांची दृष्टि आहे व त्याप्रमाणें त्यांनीं पावलें टाकलीं आहेत. सीमा-प्रश्ना-प्रमाणेंच आंध्र व महाराष्ट्र यांच्यांतील कृष्णा व गोदावरी या नद्यांतील पाणी-वांटपाचा वाद हाहि एक ज्वलंत प्रश्न आहे. त्यासंबंधींहि यशवंत-रावांनीं महाराष्ट्राला न्याय व्हावा हें ध्येय स्वीकारलें असलें तरी राष्ट्रीय दृष्टिकोनाचा त्याग केलेला नाहीं. आपली भूमिका त्यांनीं विधानसभेंत संयमी पण खंबीर शब्दांत मांडली आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



१९५९ सालीं राज्य-पुनर्रचना-मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाला आणि तेव्हांपासून आजपर्यंत सीमेचा प्रश्न महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याचा म्हणून चर्चिला जात आहे. त्यासंबंधानें लोकसभेंत, या राज्याच्या उभय सभागृहांत

# सीमा प्रश्न

आणि बाहेरहि अनेक वेळां चर्चा झाली आहे. त्याच चर्चेच्या अनुरोधानें आणि निष्कर्षित तत्त्वांच्या अनुरोधानें राज्य-पुनर्रचनेनंतर जें राज्य अस्तित्वांत आलें त्यानें या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वीकारला. या सीमाप्रश्नाबाबत मुंबई आणि म्हैसूर या राज्यांनीं या दोन राज्यांसाठीं जें विभागीय मंडळ तयार केलें होतें त्यांत चर्चा करावी, एवढेंच नव्हे तर, त्यांत चर्चा करणें आणि ती सोडविणें आपलें कर्तव्य आहे असें मानलें गेलें होतें. तेव्हांपासून हा प्रश्न मांडण्याचें निश्चित झालें होतें आणि १९५७ च्या जूनमध्यें मुंबई सरकारतर्फे एक निवेदन सादर करण्यांत आलें. या चर्चेपर्यंत हा अहवाल म्हणजे विभागीय मंडळापुढें खाजगी पत्रव्यवहार, कैफियत किंवा खलिता

म्हणा हवें तर--म्हणून मानला जात होता. आज या ठरावाच्या अनुरोधानें विभागीय मंडळापुढें या सरकारनें ज्या तत्त्वांचा आविष्कार करून आपलें म्हणणें मांडलें होतें तें तत्त्व आणि आपण सादर केलेलें निवेदन विधानसभेच्या या सभागृहासमोर ठेवलेलें आहे, सभागृहाच्या स्वाधीन केलें आहे. यावरून हें निश्चित होईल कीं, या प्रश्नाच्या संबंधानें या सरकारनें आपली भूमिका सर्वसामान्य तत्त्वावर आधारलेली आहे. अशा प्रकारें आपलें म्हणणें विभागीय मंडळापुढें मांडल्यानंतर ज्या कांहीं चर्चा झाल्या त्यांचा त्रोटक वृत्तान्त मी सांगूं इच्छितों.

हें निवेदन सादर केल्यानंतर त्यावेळचे म्हैसूर राज्याचे मुख्य मंत्री श्री. निजलिंगप्पा यांच्याशीं पत्रव्यवहार सुरू झाला आणि १९५७ सालींच हा प्रश्न हातीं घेण्यांत आला. त्या प्रश्नाला उत्तर देत असतांना श्री. निजलिंगप्पा यांनीं अशी सूचना केली कीं या सगळ्या प्रश्नांतून कारवारचा प्रश्न सोडून द्या, बेळगांवचा प्रश्न सोडून द्या, निपाणीचा प्रश्न सोडून द्या. आणि बाकीच्या प्रश्नासंबंधीं आपण ६० टक्के लोकवस्तीचें प्रमाण धरून विचार करूं.

ही गोष्ट या सरकारला स्वीकारतां येणें शक्यच नव्हतें आणि या संबंधांतली आपली भूमिका सुस्पष्ट शब्दांत या सरकारनें म्हैसूर सरकारला कळविली कीं त्यांचें म्हणणें या सरकारला मान्य नाहीं. एवढें कळविल्यानंतर स्वस्थ बसून हा प्रश्न तेथेंच सोडून देणें तर शक्य नव्हतें. आणि सोडून देण्यासारखा प्रश्न नव्हताहि. या प्रश्नाची कांहींतरी तड लावणें निकडीचें होतें आणि त्यामुळें त्याचा पाठपुरावा करण्याची या सरकारला आवश्यकता वाटली.

या संबंधांत एक गोष्ट मी प्रामुख्यानें सांगूं इच्छितों. प्रश्न सुटण्यामध्यें मूळ अडचण अशी आहे कीं म्हैसूर सरकारला या सीमाप्रश्नासंबंधानें फारसा जिव्हाळा वाटत नाहीं, औत्सुक्य वाटत नाहीं. कारण भारतांतील राज्यांची १९५६ सालीं पुनर्रचना झाल्यानंतर म्हैसूर राज्याला न्यायानें जें मिळावयास हवें होतें त्यापेक्षां १० टक्के जास्तच त्यास मिळालेलें आहे. म्हैसूर राज्याची मागणी केवळ १००च नव्हे तर ११० टक्क्यांनीं पूर्ण झालेली आहे. स्वाभाविक-पणें हा जो वादग्रस्त प्रश्न आहे तो सुटला पाहिजे हें मान्य करणें म्हैसूर सरकारला हिताचें वाटलें नाहीं आणि या प्रश्नाची सोडवणूक करण्यासंबंधानें त्या सरकारला फारसा जिव्हाळा वाटला नाहीं, वाटत नाहीं ही गोष्ट खरी

आहे. परंतु या सरकारची परिस्थिति तशी नाहीं. या सरकारचे हितसंबंध या प्रश्नांत गुंतलेले असल्यामुळें हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें सगळे प्रयत्न या सरकारला करावयाचे होते व आहेत. हा प्रश्न समझोत्याच्या वातावरणांत, विधायक प्रयत्नांच्या साहाय्यानें सुटावा अशी या सरकारची इच्छा आहे.

परंतु कोणताहि प्रश्न समझोत्याच्या वातावरणांत, कटुतेची भावना निर्माण न होतां सुटण्याकरितां प्रश्नाशीं संबंधित असणाऱ्या दोन्ही बाजूंना या प्रश्नासंबंधानें जिव्हाळा असावा लागतो. तो प्रश्न लवकर सुटला पाहिजे अशी निकड असावी लागते. पण या प्रश्नासंबंधानें दुर्दैवानें तशी परिस्थिति नाहीं. एवढेंच नव्हे तर हा प्रश्न लवकर सुटल्यास त्यामुळें एका बाजूला अडचण वाढण्याचा संभव आहे. अशा परिस्थितींत सर्व बाजूंनीं समतोलपणें विचार करून या सरकारला मार्ग काढावयाचा होता. त्यामुळें, जेव्हां म्हैसूर राज्याचे तत्कालीन मुख्य मंत्री श्री. निजलिंगप्पा यांनीं, मी आतांच सांगितल्याप्रमाणें उत्तर दिलें, त्या वेळीं स्वाभिमानाची पहिली प्रतिक्रिया अशी झाली कीं, आतां यापुढें चर्चा करण्यांत अर्थ नाहीं. परंतु असें करून भागण्यासारखें नव्हतें. प्रश्न तर सोडवावयाचाच होता. तेव्हां श्री. निजलिंगप्पा यांच्याशीं मुंबईंत झालेल्या चर्चेतून जेव्हां कांहीं निष्पन्न झालें नाहीं, तेव्हां या सरकारनें असा विचार केला कीं, दोन्ही राज्यांच्या मुख्य चिटणिसांनीं या प्रश्नासंबंधानें आपसांत चर्चा करावी. त्याप्रमाणें मुंबई राज्याचे त्यावेळचे मुख्य चिटणीस श्री. पंजाबी यांना, म्हैसूर राज्याच्या मुख्य चिटणीसांशीं चर्चा करण्याकरितां मी बंगलोरला पाठविलेंहि होतें. परंतु त्या चर्चेतूनहि कांहीं निष्पन्न झालें नाहीं.

ही चर्चा १९५८ च्या मे महिन्यांत झाली. त्यानंतर म्हैसूर सरकारच्या मंत्रिमंडळांत कांहीं फेरबदल झाला आणि श्री. निजलिंगप्पा यांच्या जागीं श्री. जत्ती हे म्हैसूर राज्याचे मुख्य मंत्री झाले. साहजिकच या प्रश्नासंबंधीं श्री. जत्ती यांच्याशीं चर्चा करणें प्राप्त होतें. मुंबई आणि म्हैसूर या दोन राज्यांच्या सीमेसंबंधाचा वाद हा एक गौण प्रश्न आहे, किरकोळ प्रश्न आहे अशी श्री. जत्ती यांची भूमिका आहे. श्री. जत्ती यांच्याशीं ८ जुलै १९५८ रोजीं सीमा-प्रश्नासंबंधानें माझी प्रथमतः चर्चा झाली. आमची चर्चा सुरू झाल्यानंतर पहिल्या पांच मिनिटांच्या आंतच श्री. जत्ती यांनीं सांगून टाकलें कीं तुम्ही निपाणी घ्या आणि हा प्रश्न सोडवून टाका. श्री. जत्ती यांच्यापूर्वी मुख्य मंत्री

असणारे श्री. निजलिंगप्पा यांची तर तेवढेंहि द्यावयास तयारी नव्हती. परंतु श्री. जत्ती यांनीं निपाणी देतों म्हणण्याचा उदारपणा तरी दाखविला; तथापि ही गोष्ट मला पटणें शक्यच नव्हतें. मी त्यांना स्पष्ट सांगितलें कीं, 'माझ्या सरकारतर्फे तुमच्याकडे कांहीं गांवांची मी भिक्षा मागत नाहीं. न्यायानें आणि सर्वमान्य अशा तत्त्वांना धरून जो कांहीं प्रदेश मुंबई राज्यांत समाविष्ट व्हाव-याचा असेल तो घेण्यास आणि त्याच न्यायानें जो प्रदेश म्हैसूर राज्यांत जावयाचा असेल तो देण्यास मी या ठिकाणीं आलों आहे. तत्त्वाला आणि न्यायाला धरून जीं गांवें अथवा जो भाग म्हैसूर राज्यांत जावयास हवा असेल तो तुम्ही घ्या' इतकें बोलणें झाल्यानंतर आमची ती चर्चा संपली.

१९५८ सालीं श्री. जत्ती व मी यांच्यांत झालेल्या चर्चेवरून एक गोष्ट स्पष्ट झाली कीं हा प्रश्न सोडविण्याच्या संबंधांत आमच्या दोघांचा दृष्टिकोन सारखा नाहीं आणि हा प्रश्न विभागीय मंडळाकडें सोपविला पाहिजे. मी सुरवातीलाच सांगितलें कीं या प्रश्नासंबंधानें म्हैसूर सरकारला फारसा जिव्हाळा नाहीं. हा प्रश्न सुटला पाहिजे अशी निकड आणि गरज नाहीं. कारण त्या सरकारचे हितसंबंध या प्रश्नांत गुंतलेले नाहींत अशी परिस्थिति आहे. प्रश्न सोडविण्याची निकड आणि गरज या सरकारला आहे आणि झालेल्या वाटाघाटींच्या फलनिष्पत्तीवरून या सरकारला हें कळून चुकलें कीं दोन राज्यांच्या मुख्य मंत्र्यांनीं चर्चा करून हा प्रश्न सुटणार नाहीं. परिस्थिति काय हें ज्यांना ज्यांना म्हणून या प्रश्नाबद्दल जिव्हाळा आहे त्यांनीं त्यांनीं नीट समजून घेतलें पाहिजे. या प्रश्नानें काय काय वळणें घेतलीं त्याचा हा आज-पर्यंतचा इतिहास आहे. जेव्हां श्री. जत्ती असें म्हणतात कीं हा प्रश्न गौण आहे असें समजून चर्चा करा, तेव्हां त्याचा अर्थ हाच कीं ही मागणी मुंबई सरकारनें सोडून द्यावी. या गोष्टीला मुबई सरकार आणि मी कधीहि मान्यता देऊं देऊं शकणार नाहीं. हा प्रश्न गौण आहे हें आम्हांला मुळींच मान्य नाहीं. हा प्रश्न आम्हांला न्यायानें आणि समजुतीच्या वातावरणांत सोडवावयाचा आहे आणि तो सुटेल अशी आम्हांला आशा आहे. अमुक इतक्या अवधीच्या आंत तो सुटेल अशी मी खात्री देऊं शकणार नाहीं. हा प्रश्न सोडविण्याची आणि न्यायानें सोडविण्याची इच्छा मात्र प्रखर आहे. परंतु तो केव्हां सुटेल हें सांगणें मी इतिहासाच्या स्वाधीन करणार आहे. अर्थात् इतिहास हा मनुष्य

आपल्या कर्तृत्वानें घडवीत असतो हें मला मान्य आहे. परंतु तें कर्तृत्व विधायक असावें लागतें एवढीच उपसूचना मी त्याला सुचवितों. दक्षिण सीमेवरील वादग्रस्त भागासंबंधींचा हा प्रश्न जर सुटला तर एका फार मोठ्या जनसमूहाला न्याय मिळाल्याचें समाधान लाभणार आहे.

माझी स्वत:ची भावना अशी आहे कीं या प्रश्नाची कोंडी ( स्टेलमेट ) होतां उपयोगाचें नाहीं. कोठें तरी हा प्रश्न मोकळा ठेवला पाहिजे, सोडवणूक करण्यास वाव ठेवला पाहिजे, त्या प्रश्नाचा सारखा पाठपुरावा केला पाहिजे अशी परिस्थिति आहे. हा प्रश्न लवादाकडे सोपवावा अशीहि एक अनौपचारिक सूचना समोर आलेली होती. आणि लवादापुढें प्रश्न नेण्यांतील धोका पत्करूनहि मी लवाद नेमण्याच्या तत्त्वाला मान्यता दिलेली होती. अर्थात्च पाटसकर निवाड्याप्रमाणेंच या प्रश्नाचा उलगडा करण्यांत यावा अशी भूमिकाच या सरकारतर्फे लवादापुढें मांडण्यांत आली असती. खुद्द पाटसकर-निवाडा हाच एक लवादानें दिलेला निकाल आहे आणि म्हणून लवादाची सूचना मी तत्त्वरूपानें स्वीकारली होती,परंतु दुसऱ्या बाजूतर्फे तिला नकार देण्यांत आला.

त्यानंतर भारत सरकारनें म्हैसूर आणि मुबई सरकारला अशी एंक सूचना केली कीं दोन्ही बाजूचे दोन सदस्य समाविष्ट असणारी एक मध्यस्थ समिति ( मीडिएशन कमिटी ) निर्माण करावी व तिच्यामार्फत हा प्रश्न सोडवावा. कोणत्याहि प्रकारें कां होईना, परंतु हा प्रश्न सुटावा अशी माझी इच्छा असल्यामुळें मी मध्यस्थांची समिति नेमण्याची सूचना स्वीकारली. या राज्यातर्फे दोन नांवें सुचवावयाचीं होतीं. मी असा विचार केला कीं, हा प्रश्न सोडविण्याकरितां ज्या पाटसकर-निवाड्याचा आधार घेतला जावा असा आमचा आग्रह आहे तो निवाडा देणाऱ्या श्री. पाटसकर यांचें नांव मी मध्यस्थ म्हणून कां सुचवूं नये ? तेव्हां श्री. पाटसकर यांचेंच नांव मी सुचविलें आणि तें एका राज्याचे गव्हर्नर असतांनाहि भारत सरकारच्या परवानगीनें त्यांनीं मध्यस्थाचें काम करण्याचें कबूल केलें. म्हैसूर सरकारतर्फेहि दोन नांवें सुचविण्यांत आलीं. आजपर्यंतची ही परिस्थिति आहे. आतां या कमिटीनें करावयाचें काय हा प्रश्न निर्माण झाला. सुरवातीला अशी कल्पना होती कीं, त्यांनीं विभागीय मंडळापुढें अहवाल सादर करावा. परंतु म्हैसूर सरकारकडून असें सुचविण्यांत आलें कीं, या दोन्ही मंडळांनीं आपापल्या सरकारच्या मुख्य मंत्र्यांकडे अहवाल

सादर करावा. माझी स्वतःची त्यालाहि तयारी होती. कारण कोणीहि या प्रश्नाचें स्वरूप आणि न्याय पाहण्याचा प्रयत्न केल्यानंतर जर चार शहाणीं माणसें त्याचा विचार करतील तर त्यांना न्याय टाळतां येणार नाहीं, अशी माझी मूळ भावना आहे. त्यानंतर या मध्यस्थ समितीपुढें विचारार्थ बाबी काय असाव्यात याबद्दल चर्चा सुरू झाली. म्हैसूर सरकारतर्फे असा आग्रह धरण्यांत आला कीं, या समितीनें जी चर्चा करावयाची ती गौण प्रश्नांवरच आपल्याला करावयाची आहे असें गृहीत धरूनच केली पाहिजे. म्हणजे गाडी पुन्हा मूळ पदावर गेली आणि त्यांना आम्हांला सांगावें लागलें कीं, ही भूमिका आम्ही स्वीकारणार नाहीं. वाटल्यास कांहीं विचारार्थ बाबी न देतां या समितीनें चर्चा करावी आणि मार्ग सुचवावा असें मी सांगितलें. कारण हा गौण प्रश्न आहे असें जोंपर्यंत म्हैसूर सरकार म्हणत नव्हतें तोंपर्यंत वाटेल त्या गोष्टीला माझी तयारी होती. म्हैसूर सरकारचीं दोन माणसे आणि मुंबई सरकारचीं दोन माणसें अशा चौघांनीं या प्रश्नाची चर्चा करून आपला अहवाल भारत सरकारला सादर केल्यानंतर भारत सरकार त्याचा विचार करणार असेल तर त्याला माझी तयारी होती.

आतां ज्या विभागीय मंडळापुढें हा प्रश्न आम्ही मांडणार होतो तें विभागीय मंडळ नवीन मुंबई राज्यविभाग विधेयकानुसार संपुष्टांत येणार आहे. त्याखेरीज मध्यंतरीं ज्या घटना घडल्या त्यामुळेंहि हा प्रश्न लोकांच्या पुढें मांडण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

लवाद विचारांत कां घेतला नाहीं, या बाबतींत मी एवढेंच सांगतों, कीं, अनौपचारिक गोष्टी मला सभागृहांत सांगावयाच्या नाहींत. कारण मला जास्त अडचणी निर्माण करावयाच्या नाहींत. या एकंदर प्रश्नाच्या बाबतींत सरकारची जी भूमिका आहे ती आणि ज्या तत्त्वांना धरून हा प्रश्न सोडविण्यांत यावा असें सरकारला वाटतें तीं तत्त्वें, हा जो खलिता केंद्र सरकारला पाठविण्यांत आला आहे त्यामध्यें स्पष्ट करण्यांत आलीं आहेत. त्यांतील नवव्या परिच्छेदांत असें म्हटलें आहे की, "मुंबई व म्हैसूर राज्यांतील सीमा मुख्यतः भाषिक तत्त्वावर ठरलेल्या आहेत. तेव्हां सीमेवरील प्रदेशांची पुनर्रचना करतांना भाषिक एकसंधपणा हें मार्गदर्शक तत्त्व धरण्यांत यावें. म्हणून ही सीमा निश्चित करण्याचा योग्य अधिकार ज्यांना दिला असेल त्यांनीं भाषिक अल्पसंख्याकांचा

प्रश्न हा अत्यंत मामुली स्वरूपाचा राहील अशा प्रकारें सोडविणें हें त्यांचें उघडच कर्तव्य राहील" सीमा निश्चित करण्यासाठीं जिल्हा, तालुका वा सर्कल हा घटक मानणें बरोबर नाहीं, कारण तो एकात्म असा घटक होत नाहीं. म्हणून लोकवस्तीचा प्राथमिक घटक म्हणजे जें खेडें, त्यावरच आपणांस अवलंबून राहणें आवश्यक आहे. संलग्न प्रदेशापुरतीच ही सीमानिश्चिती केली पाहिजे, आणि कोणतेंहि 'बेट' वा 'भूपट्टा' ठेवला जाऊं नये. याचीं कारणें अर्थातच उघड आहेत. समान भाषा बोलणारे जास्तींत जास्त लोक एका राज्यांत येतील या दृष्टीनें प्रदेशाचे फेरफार करण्यास पाहिलें गृहीत तत्त्व अनुकूल आहे. पण एखाद्या विशिष्ट बाबतींत जर याविरुद्धचे घटक बरेच महत्त्वाचे व दृढ स्वरूपाचे असतील तर या गृहीत तत्त्वाचा प्रतिवादहि केला जाईल. हे घटक म्हणजे भौगोलिक एकता, आर्थिक साहचर्य व शासनात्मक सौकर्य हे होत.

सन्माननीय सभासद श्री. देशपांडे यांनीं मागें एकदां मला 'तुम्ही असे मख्ख कां बसून राहिला आहांत' असें विचारलें होतें व त्याबद्दल त्यांना आतां पश्चात्ताप होत आहे असें तेच आतां म्हणाले. त्यांनीं हें स्पष्टपणें सांगितलें याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. केव्हां केव्हां आपल्याला मागें झालेल्या चुकीची जाणीव होते माझ्या बाबतींतहि केव्हां केव्हां असें होतें. आणि मागाहून चुकीची जाणीव होते. तेव्हां त्यांनीं हें बोलून दाखविलें हें फार चांगलें झालें.

कांहीं वेळां जोरानें बोलणें म्हणजे त्या गोष्टीचा आग्रह धरणें असें समजलें जातें. सन्माननीय सभासद श्री. देशपांडे यांनीं आतां जें सांगितलें त्या बाबतींत एका वयोवृद्ध गृहस्थांनीं तेव्हां मला असें म्हटलें होतें कीं, तुम्ही त्यांना एक गोष्ट सांगावयास हवी होती. पुन्हां केव्हांतरी त्यांना मी ती गोष्ट सांगेन असें मी ठरविलें होतें. पण ती संधि इतक्या लवकर येईल अशी मलाहि कल्पना नव्हती. ती गोष्ट अशी आहे : खूप तोंडाळ आणि भांडणारी बायको आणि शांतपणें तिचें बोलणें ऐकून घेणारा नवरा यांच्या कुटुंबांतील ही गोष्ट आहे. ती बायको आपल्या नवऱ्याला म्हणाली कीं, 'मी तुम्हांला इतकें ओरडून सांगतें आहे आणि तुम्ही असे मख्खासारखे काय बसून राहिलां आहांत ? या कानांनीं ऐकतां आणि त्या कानांनीं सोडून काय देतां ?' तेव्हां त्या नवऱ्यानें

उत्तर दिलें कीं, ' मी निदान या कानांनीं ऐकून दुसऱ्या कानानें सोडून तरी देतों. पण तूं दोन्ही कानांनीं ऐकूनहि तुझ्या तोंडांतून बाहेर येत आहे ' तेव्हां या गोष्टीवरून काय बोध घेता येईल तो घ्यावा. माझ्याकडे शिष्टमंडळ आलें होतें तेव्हां याबाबत मला नक्की तारीख सांगतां येणार नाहीं असें मी म्हटलें होतें. खऱ्या इतिहासाचा मी एक विद्यार्थी आहे. कांहीं साक्षात्कार झालेला मोठा असा कोणी मी नाहीं. इतिहासाचा नीट अभ्यास करणारा आहे. मी कांहीं भविष्यवादी नाहीं. तेव्हां अमुक एका तारखेपर्यंत अमूक एक गोष्टी होतील असें मी कसें सांगूं? हा प्रश्न मला सुटला नाहीं, भारत सरकारलाहि सुटला नाहीं इतका तो ज्वलंत आणि जिवंत आहे आणि म्हणूनच तो सुटल्या-शिवायहि राहणार नाहीं. हें सांगत असतांना मला एका गोष्टीची काळजी घेतली पाहिजे. भावना व्यक्त करीत असतां कानडी जनतेच्या विरुद्ध आमच्या मनांत कोणत्याहि प्रकारच्या विरोधाच्या भावना नाहींत. श्री. जत्तींचा उल्लेख येथें करण्यांत आला असला तरी तो मित्रत्वाच्या भावनेनेंच केला आहे. निदान माझे आणि त्यांचे मैत्रीचे संबंध अहेत. हा ठराव मांडल्यानंतरहि मी हें सांगूं इच्छितों कीं मुंबई सरकार आणि म्हैसूर सरकार या दोन सरकारांच्या इभ्रतीचा हा प्रश्न नसून या दोन राज्यांतील कांहीं विभागांतील जनतेच्या मागणीचा व न्यायाचा हा प्रश्न आहे.

(१२ मार्च १९६०, विधानसभा : महाराष्ट्र-म्हैसूर सीमाप्रश्नासंबंधीं स्पष्टीकरण )

* * *

## पाणी-वांटपाचा वाद

आंध्र आणि महाराष्ट्र या दोन राज्यांत कृष्णा आणि गोदावरी नद्यांच्या पाण्यासंबंधीं हा जो वाद निर्माण झाला आहे, किंवा मतभेद निर्माण झाला आहे, त्या मतभेदाचें लोण या राज्याच्या जनतेमध्यें पसरूं नये अशी माझी इच्छा आहे. मी ज्या वेळीं महाराष्ट्राच्या जनतेच्या हिताच्या दृष्टीनें एखादी मागणी करतों त्यावेळीं आंध्रच्या जनतेचें हित हिरावून घेतों असा प्रश्न नसतो. कारण आपण सर्व एका मोठ्या महान् राष्ट्राचे नागरिक आहोंत. ह्या प्रश्नामळें आंध्र राज्याची जनता विरुद्ध महाराष्ट्राची जनता असा समज


जर चुकीनें आंध्र राज्याच्या जनतेमध्यें पसरला असेल तर तो दूर करावा हाहि माझा हेतु आहे.

आमच्यावर असा आरोप करण्यांत आला आहे कीं, आम्ही कोयनेचें पाणी अरबी समद्रांत फुकट सोडून दिलें आणि त्यापासून शेतीला कांहीं उपयोग करून घेतला नाहीं. मला त्यांना असें सांगावयाचें आहे कीं आम्ही तें पाणी अरबी समद्रांत फुकट सोडलें नाहीं, तर त्यापासून वीज निर्माण करून आमच्या राज्यांत कामधंद्याचें प्रमाण वाढविण्याचे प्रयत्न करणार आहोंत, नव्हे वाढविणार आहोंत यांत मुळींच शंका नाहीं. आम्ही जर आमच्या डोळ्यां-समोर हिंदुस्थानचें चित्र उभें केलें तर सर्व हिंदुस्थानची शेतकी अर्थव्यवस्था दिसली पाहिजे असेंच कांहीं नाहीं. आम्हांला जर स्वस्त वीज मिळाली, इतर साधनसामग्री उपलब्ध असली, तर कृषीबरोबरच औद्योगिक भारतहि आम्हांला उभा करतां आला पाहिजे. आणि आम्ही सुद्धां तोंच प्रयत्न करीत आहोंत. आज मुंबई शहर हें हिंदुस्थानांतील सर्वांत सुंदर शहर झालें तें कशाच्या जोरावर? टाटांनीं खंडाळा घाटांतून वीज आणून स्वस्त दरानें तेथें पुरवठा केला म्हणूनच हें शक्य झालें आहे ना? तेथेंहि कांहीं पाणी समुद्रामध्यें फुकट गेलें हें विसरून चालणार नाहीं. मुंबई शहराची भव्यता कोणीहि विसरणार नाहीं अशी आहे. ज्याप्रमाणें देशानें आम्हांला भव्यता दिली आहे, त्याचप्रमाणें कांहींसा प्रतिकूल भूगोलहि दिला आहे; तोहि विसरून आम्हांला चालणार नाहीं.

जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना तांत्रिक बंधनें लावतां येत नाहींत. जनतेच्या आशाआकांक्षा तांत्रिकतेच्या बंधनामध्यें बंदिस्त राहूं शकत नाहींत. हा नुसता भावनांचा प्रश्न नाहीं, तर घटनेनें दिलेल्या अधिकारांचा प्रश्न आहे व त्याचा आम्हांला जरूर विचार केला पाहिजे. ही गोष्ट निव्वळ भावने-चीच नाहीं, तर दुष्काळी भागांतील लोकांच्या जीवनमरणाची आहे. म्हणून आम्हांला हा प्रश्न सोडविलाच पाहिजे.

( १६ डिसेंबर १९६० : मुंबई विधानसभा )

* * *



गेल्या वर्षी श्रीशिवाजीमहाराजांच्या जयंतीच्या मुहूर्तावर महाराष्ट्र-राज्यस्थापनेचा सोहळा सुरू झाला. भाषिक राज्याची मागणी मान्य झाली आणि महाराष्ट्राचें मन प्रफुल्लित झालें. मराठी माणसें नव्या जोमानें कामाला लागलीं. 'लक्ष शून्यांतून कांहीं श्रेय आकारत आहे' याची जाणीव कवींना होऊं लागली. हा आकार मिळवून देण्याची प्रेरणा व चेतना ना. यशवंतरावांनीं आपल्या वाणीनें व कृतीनें दिली. समाजाच्या मनाला आकार द्यावयाचा तर तो एकेरी स्वरूपाचा असून चालत नाहीं. परंतु याकरितां प्रेरणा देणाऱ्याचें जीवन एकारलेलें असून चालत नाहीं. यशवंतरावांना अनेकविध विषयांत रस आहे आणि म्हणूनच शिवाजीमहाराजांच्या प्रेरणावादी कर्तृत्वाचें ते काव्यमय भाषेंत पण चिकित्सक स्वरूपांत वर्णन करतात. विद्वानांच्या मेळाव्यांत त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत तें स्पष्ट करतात आणि विचारवंतांनीं निव्वळ शासनावर अवलंबून राहूं नये असेंहि बजावतात. बंगाल व बंगाली लोक यांच्याबद्दल त्यांच्या मनांत नितान्त आदर आहे. आणि राजकीय नकाशावर एकसंध झालेला हा महाराष्ट्र भावनात्मक रीत्या एक व्हावा याची त्यांना तळमळ लागलेली आहे. राष्ट्रीय ऐक्याच्या संदर्भात महाराष्ट्राचा विकास व्हावा, सर्वांगीण विकास व्हावा, या उत्कट भावनेंतून यशवंतरावांनीं ठिक-ठिकाणीं अनेक मेळाव्यांतून भाषणें केलीं आणि एकजुटीचा, प्रेमाचा, विधायक वृत्तीचा आणि कर्तृत्वाचा संदेश त्यांनीं दिला.

* * *



वादग्रस्त राजकारणांत विशेषत: सत्तारूढ असणाराची स्तुति वाटेल तशी चालू देणें योग्य नाहीं. शब्दांनीं मी फसणारा नाहीं. तथापि मी अहंकारीहि नाहीं. मी माझ्या स्वत:च्या संबंधानें घाबरत नाहीं. पण बरीचशीं माणसें

# जनता-जननी

एखाद्याबद्दल चांगलीं बोलूं लागलीं कीं, असूया निर्माण होते. मी शिव्या घेण्यांत पटाईत आहे. माझी नाव सरळ जावयाची असेल, तर माझ्या आवती-भोंवती शिव्या देणारे लोक पाहिजेत. मी स्तुतीनेंहि घाबरत नाहीं, पण मी ज्या सत्तेचें प्रतिनिधित्व करतों त्या सत्तेला दृष्ट लागू नये अशी माझी इच्छा आहे. माझ्या दोषांची मला जाणीव आहे.

आपल्यावरील छाया, सावल्या यांची दृष्ट नव्या जन्माला येणाऱ्या बाळाला लागूं नये अशी आईची इच्छा असते. ती जशी काळजी घेते तशी काळजी मला घेतली पाहिजे.

छत्रपति श्रीशिवाजीमहाराज, लोकमान्य टिळक, गोखले या उपमा मला

देऊं नका. तुम्ही उपमांनीं फसूं नका व मलाहि फसवूं नका. महाराष्ट्र घडविणारे टिळक एकच झाले आणि लोकमान्य टिळकहि पुन्हां होणार नाहींत. शिवाजी-महाराज, टिळक हीं दुरून नमस्कार करण्याचीं साधनें आहेत. मी कोणत्या मुशींत जन्माला आलों याची मला जाणीव आहे. १९२० पासून सुरू झालेल्या राजकारणांतील कार्यकर्त्यांचा मी' प्रतिनिधि आहे. द. सातारा जिल्ह्यांतील एका माळावरच्या गांवांत माझा जन्म झाला. आजहि तशीं घरें आहेत याची मला खंत आहे. असंख्य दबलेले जीव आतां प्रकाशांत आणावयाचे आहेत.

नव्या महाराष्ट्रांत मराठी भाषेचें काम करावयाचें आहे ही विनंती मी लेखकांना करीत आहे. मराठी भाषेंत जी शब्दांची वाण आहे, ती नव्या महाराष्ट्रांत भरून काढावयाची आहे. जुने शब्द तर वापराच पण नवीन अमृतासारखे शब्द आणि विचार शोधून काढा. नवीन शास्त्रीय ज्ञानाचा इमला उभारावयाचा आहे. तो तोलून धरतील असे शब्द निर्माण करा. केवळ भूतकाळाकडे पाहून चालणार नाहीं, भविष्यकाळांत पुढें जावयाचें आहे. भूतकाळांतील परंपरा, सध्यां आपण कोठें आहोंत व कोठें जावयाचें आहे हें सर्व पाहून पुढें जावयाचें आहे.

लोकांच्या अपेक्षा कोणी एक माणूस पुरा करूं शकत नाहीं. सामान्य माणसें मोठीं होतात तीं मोठे प्रश्न हाताळावयास मिळतात म्हणून. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न एकटया यशवंतरावानें सोडविला असें म्हणूं नका. हा प्रश्न आधीच सुटला असता तर मी मागच्या रांगेंत बसावयास तयार होतों. आजहि आहे. तीन कोटि मराठी जनतेच्या भावना आणि इतर पक्षांतील कार्यकर्त्यांच्या प्रतिष्ठा पणाला लागून हा प्रश्न सुटला आहे. एका माणसाला वेगळा काढून त्याला कर्तृत्व चिकटवूं नका. कोणताहि कर्तृत्ववान् मनुष्य एकटा कांहीं करूं शकत नाहीं. सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या ज्या भावना होत्या त्या सर्वांना एका माळेंत आणण्याचें कार्य मीं केलें आहे. श्रेय मागून कोणी देत नाहीं आणि असलेले कोणी हिरावून घेतों म्हटलें तरी घेऊं शकत नाहीं. कोणत्याहि समाजां-तील मनुष्य समाजाला सोडून कांहीं करूं शकत नाहीं. समाजजीवनाचें नवनीत हें समाजजीवन ढवळूनच निर्माण होतें. कोणत्याहि सामाजिक प्रश्नाचें एकेरी उत्तर देणें चुकीचें आहे. समाजांतील प्रत्येक व्यक्ति हा एक सामाजिक कॉम्प्लेक्स आहे. मी जें कांहीं शिकलों तें महात्मा गांधींपासून शिकलों. हा महात्माजींचा

गौरव आहे. पण केवळ त्यांच्यापासूनच सर्व शिकलों नाहीं. मी कितीतरी लोकांपासून कितीतरी गोष्टी शिकलों. कोणत्याहि गोष्टीचा मुद्देसूद विचार करावयास मी रॉय यांच्यापासून शिकलों. समाजांतील दुःख मी एखाद्या शेतकऱ्यापासून शिकलों असेन. मी जर मोठाच असेन तर मी ज्या कार्यकर्त्यांत वाढलों ती सर्वच पिढी मोठी आहे असें मी मानतों.

यानंतरच महाराष्ट्ररचनेचें कार्य सुरू होणार आहे. या कामांत अनेक चांगल्या माणसांचें सहकार्य हवें आहे. अनेक विचारी माणसें काँग्रेसबाहेरहि आहेत. त्यांचेंहि सहकार्य मला पाहिजे आहे. लोकशाहींत कारभार करण्याचें एक तंत्र असतें. त्यांत केवळ न्यायानें वागून भागत नाहीं तर न्यायानें चाललें आहे असें लोकांना वाटावेंहि लागतें.

राजकारणांत तुम्हांला मार्गदर्शक व्हावयाचें असेल तर तुम्हांला त्याच्या तात्त्विक मर्यादा आणि आपली शक्ति समजली पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न गोत्यांत जातो आहे असें पाहून मी त्याच्या मर्यादा सांगितल्या. हा प्रश्न भारतीय निष्ठेंतून सुटला पाहिजे ही त्या प्रश्नाची मर्यादा होती. आज संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सुटला आहे, तरी आजहि तीच मर्यादा आहे. आज मुंबई शहरांत अनेक वाद आहेत. पण मुंबईचा वाद-प्रश्न निघत नाहीं. सिंधी, पारशी इत्यादि लोक माझ्याकडे येतात आणि 'आम्ही काय करावयाला पाहिजे तें सांगा' असें म्हणतात. मी त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवतों. त्याशिवाय काय करणार? जेव्हां तुम्हांला तुमचें ईप्सित साध्य करावयाचें महत्त्वाचें काम अंगावर घ्यावयाचें असेल तेव्हां अकारण संशयानें अवतींभोंवतीं पाहूं नका. अशा वेळीं शक्ति आणि दोष यांचें मोजमाप करून आत्मविश्वासानें पावलें टाकलीं पाहिजेत.

कोणत्याहि राजकीय पक्षांत थोडेच लोक असतात. बाकीचे पक्षाबाहेर असतात. निवडणुकीच्या वेळीं जो पक्ष त्यांच्या हिताचें काम करील असें त्यांना वाटतें, त्यांना पटतें, त्या पक्षामागें हे बाहेरील बहुसंख्य लोक जातात. गेल्या तीन वर्षांतील हें माझें सूत्र ट्रेड सीक्रेट आहे. हें मी आज सांगत आहे कारण तें केवळ माझें नाहीं. समाजांत आतां तपासून पाहण्याची वृत्ति वाढत आहे ही चांगली गोष्ट आहे. वर्तमानपत्रांतील मत तें आपलें मत, याचा अर्थ तें पक्षाचें मत आहे. पण पक्षाबाहेरील जनता काय म्हणते तें पाहिलें पाहिजे.


तिला पसंत तें महाराष्ट्राला पसंत असें मी मानतों. सर्वच पक्षांना महाराष्ट्राचें हित पाहायचें आहे तर पक्षरहित समाज काय म्हणतो तें पाहिलेंच पाहिजे. हा पक्षरहित समाज दबलेला आहे पण दुबळा नाहीं.या समाजासाठीं मी कार्य करीन. त्यास चांगलें म्हणा तसेच त्यांतील दोषहि सांगा. दोष सांगतांना मागें पुढें पाहूं नका. चांगलें म्हणणाऱ्यालाच दोष सांगण्याचाहि अधिकार असतो. मुलाला मारण्याचा हक्क सख्ख्या आईला असावा, सावत्र आईला नसावा आणि कायदाच करावयाचा झाला तर बापाला मुळींच नसावा. कारण येथें मारणाऱ्या डोळ्यांतहि मार खाणाराप्रमाणेंच पाणी येतें. सख्ख्या आईशिवाय हें शक्य नाहीं. आणि जनता ही आईच आहे असें मी मानतों. गेल्या चार पांच वर्षांचा हा अनुभव आहे. लोक या काळांत रागावले पण मी त्यांच्यावर रागावलों नाहीं. पुढें लोकांना पटलें आणि रागावलेले लोकहि प्रेमानें जवळ आले.

मी नुकताच पैठण तालुक्याच्या दौऱ्यावर होतों.पांचपन्नास घरांची एक वाडी होती. गांवाबाहेर दहापांच मंडळी बसलेली दिसली. तेथें कांहीं कार्यक्रम नव्हता; कोणी हार घेऊनहि आले नव्हते. ते लोक असे बसले होते की, त्यांचें कांहीं काम असावें असें वाटलें. मी मोटर थांबविली आणि त्यांच्याजवळ गेलों. त्यांनी विचारलें, "चव्हाणांची मोटर हीच काय ?" मी म्हणालों, "होय ! मीच चव्हाण. काय काम आहे तुमचं ?" मला वाटलें त्यांना कांहीं तक्रार-अर्ज द्यावयाचा असेल. तेवढ्यांत एका वृद्ध गृहस्थानें पिशवींत हात घातला आणि एक रुपयाच्या दहापांच नोटांचा हार काढला. मला वाटलें, हैदराबादकडे नोटांच्याच हाराची पद्धति असेल. मी त्या वृद्धास विचारलें, "हें कशासाठीं ?" तर तो म्हातारा म्हणाला, "तुझ्यासारखा मुलगा व्हावा अशी इच्छा होती. तुझ्या खाऊला हे पैसे घे!" माझें हृदय भरून आलें. कारण लहानपणापासूनच मी पितृवंचित आहे. जनतेचें हृदय हें असें मातेचें आहे.

माझी इच्छा एकच आहे कीं, संयुक्त महाराष्ट्र हा भारताची शक्ति वाढविणारा व्हावा आणि त्या महाराष्ट्राला शक्ति देण्याचें कार्य राज्यशक्तीच्या बाहेरून झालें पाहिजे. मराठवाड्याच्या अनोळखी भागांत खाऊला पैसे देणारा पिता भेटला. माझें मन तृप्त झालें आहे. पण समाजांतील दुःख, दारिद्र्य आणि अज्ञान पाहून मन उफाळून येतें.

( १२ मार्च १९६० · सांगली : ४७ वा वाढदिवस )

* * *



ज्याला आपण अर्वाचीन महाराष्ट्र म्हणतों त्याची उभारणी करण्याचें श्रेय श्रीशिवाजीमहाराजांकडेच जातें. शिवाजीमहाराजांचें मोठेंपण हें त्यांचा अतुल पराक्रम, त्यांची राजकारणपटुता, त्यांचें विशुद्ध चारित्र्य या थोर

# विविधतेंतील ऐक्य

गुणांत जेवढें आहे, तेवढेंच, किंबहुना त्याहूनहि अधिकांशानें शासनकार्यातील त्यांची विधायक दृष्टि व कर्तव्यपरायणता यांत आहे, असें मला वाटतें. महाराष्ट्राच्या स्वराज्याची उभारणी ते करूं शकले, ते मुख्यतः या गुणांमुळेंच. शिवाजीमहाराजांचे अमात्य रामचंद्र नीलकंठ यांनीं 'आज्ञापत्रांत' महाराजांचें जें बहारदार वर्णन केलें आहे, तें या दृष्टीनें पाहण्यासारखें आहे. 'तस्करादि अन्यायी यांचें नांव राज्यांत नाहींसें केलें. देश, दुर्गादि, सैन्यादि बंद नवेच निर्माण करून एकरूप अव्याहत शासन चालविलें. केवळ नूतन सृष्टीच निर्माण केली.' या वर्णनावरून शिवाजीमहाराजांच्या कार्यक्षम व लोकाभिमुख राज्यकारभाराची कल्पना येईल. शौर्य व धैर्य या गुणांत चारित्र्य

व विधायक दृष्टि या गुणांची जोड मिळाल्यामुळेंच शिवाजीमहाराज हे महाराष्ट्राचे भाग्यविधाते झाले.

यंदाच्या शिवजयंतीचें महत्त्व तर अधिकच आहे. कारण आजपासून आपण महाराष्ट्र राज्यस्थापनेचा उत्सव साजरा करीत आहोंत. अशा रीतीनें पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा या भागांचें प्रथमच एक सबंध राज्य निर्माण होत आहे. हें सर्व कसें घडत गेलें याचा इतिहास अगदीं ताजा आहे, किंबहुना या घटना अद्याप इतिहासजमा झालेल्या नाहींत असें म्हणणें अधिक रास्त ठरेल. तेव्हां त्यांचा मी येथें पुनरुच्चार करीत नाहीं. भारतांतील इतर राज्यांप्रमाणें आपलें पण भाषिक राज्य असावें अशी मराठी लोकांची इच्छा होती व लोकशाहीच्या तत्त्वानुसार भारतीय संसदेनें मराठी जनतेच्या या इच्छेस मान देऊन महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेस अनुमति दिली आहे.

आणखी तीन दिवसांनीं अस्तित्वांत येणारें आपलें हें महाराष्ट्र राज्य विविधतेनें नटलेलें आहे. ही विविधता निसर्गाच्या रचनेंत जशी आहे तशी माणसांत सुद्धां आहे. उत्तरेस सातपुडा आणि पश्चिमेस सह्याद्रि यांचीं उत्तुंग शिखरें व त्यांच्या उतरणीवरील घनदाट जंगलें यांनीं या भागांस भव्योदात्त सौंदर्य प्राप्त झालें आहे, तर वर्धा-वैनगंगेच्या खोऱ्यांत जागोजाग असलेलीं जलाशयें व पळसाच्या लाल फुलांनीं डवरलेलीं रानें मनाला प्रसन्नता आणतात. कोंकणचा किनारा अथांग पश्चिम सागराचें दर्शन घडवितो, तर गोदेच्या पाण्यानें पुनीत व समृद्ध झालेली मराठवाड्याची भूमि महाराष्ट्राच्या तेजस्वी भूतकाळाची व संस्कृतीची आठवण करून देते. नागपूरच्या परिसरांत भारतांतच नव्हे तर सर्व आशियांत उत्तम म्हणून नांवाजलेलीं संत्रीं पिकतात, तर रत्नागिरीकडे भारतांत ज्याच्या तोडीचा दुसरा आंबा नाहीं तो हापूस आंबा अमाप पिकतो. विदर्भ-मराठवाड्याच्या काळ्याभोर जमिनींत कापूस भरघोस फुलतो. आणि नगर-सोलापूर-कोल्हापूर भागांत पिकणारा रसदार ऊंस सर्वांचें तोंड गोड करतो. निरनिराळ्या भागांतील लोकांच्या बाबतींतहि ही विविधता आहे. कोंकणपट्टींतील माणसाचे अनुनासिक उच्चार ऐकून देशावरच्या माणसाला मौज वाटते तर खानदेश-वऱ्हाडचा माणूस एक विशिष्ट हेल काढून बोलूं लागला कीं सांगली-कोल्हापूरकडील माणसाच्या चेहऱ्यावर

स्मिताची रेषा न झळकली तरच आश्चर्य; पण या विविधतेंतच महाराष्ट्रांतील जीवनाचें सौंदर्य सांठलेलें आहे. अशी विविधता नसेल तर जीवन नीरस व रंगहीन होईल.

पण या विविधतेंतहि एकता आहे व असली पाहिजे. विविधतेनें जीवनाला जसें सौंदर्य येतें तसें एकतेंत जीवनाचें सामर्थ्य प्रतीत होतें. विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र यांची भाषिक एकता तर आहेच, पण शिवाय लोकांच्या चालीरीती व परंपरा आणि सामाजिक संघटनेचें एकूण स्वरूप हेंहि कसें सारखें आहे याचीं वाटेल तेवढीं उदाहरणें देता येतील. महाराष्ट्राचा सांस्कृतिक व राजकीय इतिहासहि त्याची साक्ष देतो. प्राचीन काळीं विदर्भ व मराठवाडा हे महाराष्ट्राच्या केंद्रस्थानीं होते. शालिवाहन व चालुक्यांची राजधानी मराठवाड्यांतील पैठण येथें होती, तर वाकाटक या राजघराण्यानें महाराष्ट्राचा सर्व प्रदेश आपल्या छत्राखालीं आणला होता. वाकाटक हे विदर्भाचे राजे होते व त्यांची राजधानी चांद्याजवळ भांदक येथें होती. देवगिरीच्या यादवांच्या काळांत महाराष्ट्राची व मराठी भाषेची विशेष भरभराट झाली. मराठीचे आद्य व श्रेष्ठ कवि मकुंदराज, ज्ञानेश्वर व नामदेव याच काळांत झाले. चक्रधर या महानुभाव पंथाच्या संस्थापकाचा एक शिष्य महींद्रव्यास, यानें सुमारें सातशें वर्षांपूर्वीं लिहिलेल्या 'लीलाचरित्रां'त महाराष्ट्राचें जें वर्णन केलें आहे त्याचा येथें उल्लेख करण्याचा मोह मला आवरत नाहीं.

> सालीं लक्ष देश महाराष्ट्र ।
> तेथिचे शिहाणे सुभटू ।
> वेदशास्त्र चातुर्याची पेठू ।
> भरैली तिथें देशी ।।
> ऐसें ते महाराष्ट्राचे सुंदरु ।
> वरी महाराष्ट्र भाषा चतरु ।
> तेहीं वसविले गंगातीरु ।
> क्षेत्र व्यंकबे-ही पश्चिमे ।
> व्यंकूपूर्वे सागर वेन्ही ।
> द्वादश योजने उभय गंगातीरीं ।
> ऐसें तें गंगातट महाराष्ट्रीं ।

देश म्हणजे खंडमंडळ ।
जैसे फलठाणापासोनि दक्षिणेसी ।
मऱ्हाठी भापा जेतुलां ठाई वर्ते ।
तें एक मंडळ ।
तयाची उत्तरें वालेघाटाचा असे
ऐसे एक खंडमंडळ ।
मग उभय गंगातीर तेंहि एक खंडमंडळ ।
आन तयापासौनी मेघंकर घाट तें एक मंडळ ।
तयापासौनी अवघे वराड तेंहि एक मंडळ ।
पर आघवीचि मिळौनि महाराष्ट्रचि बोलिये ।

या पुढच्या काळांत राजकीय दृष्टचा महाराष्ट्र जरी भंगला तरी संतकवींनीं महाराष्ट्राची सांस्कृतिक एकता टिकवून ठेविली. संतकवींच्या कार्याचें हें मर्म आपण ध्यानांत घेतलें पाहिजे. ज्ञानेश्वरांपासून तों तुकारामापर्यंत सुमारे चारशें वर्षे संतांनीं वारकरी संप्रदायाच्या द्वारें सामाजिक समतेच्या तत्त्वांचा प्रसार करून सर्व मराठी जनतेचें ऐक्य साधलें. संतांची ही शिकवण महाराष्ट्र कधीहि विसरणार नाहीं.

नव्या महाराष्ट्र राज्यांत ही एकता आपण अधिक दृढ केली पाहिजे. आज आपण देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाचीं मोठमोठीं कामें हातीं घेतलीं आहेत. महाराष्ट्रांत गेलीं चारपांच वर्षे राज्यपुनर्रचनेचा प्रश्न सतत तेवता राहिल्यानें जनतेचें मत विचलित राहिलें व त्यामुळें विकासकार्याकडे द्यावें तेवढें लक्ष तिनें दिलें नाहीं ही वस्तुस्थिति आहे. परंतु या कार्याची आतां हेळसांड न होऊं देतां लोकांनीं त्यावर आपलें जास्तींत जास्त लक्ष केंद्रित केलें पाहिजे. भापिक राज्याची स्थापना हें साधन असून जनतेचा सर्वांगीण विकास हें साध्य आहे. याबाबत दुमत होण्याचें कारण नाहीं. एकाद्या प्रश्नासंबंधीं मत-भेद असले म्हणजे चर्चा, वाद गोष्टीहि आल्या. लोकांच्या जागरूकतेचें व कोण-तीहि गोष्ट पारखून घेण्याच्या चोखंदळ वृत्तीचेंच तें द्योतक आहे असें मी समजतों. परंतु वादामधून तत्त्वबोध झाला पाहिजे, नाहींतर त्या वादाला कांहीं अर्थ उरणार नाहीं. मतभेद केवळ मतभेदांसाठींच असू नयेत. तसे ते असले तर त्यांना वैयक्तिक वा पक्षीय हेव्यादाव्याचें स्वरूप येतें आणि त्यानें कार्यहानि होते.

विकासकार्याच्या द्वारें लोककल्याण साधावयाचें या ध्येयासंबंधीं अर्थातच मतभेद असण्याचें कारण नाहीं. मार्गासंबंधीं मतभेद असू शकतील हें मी मान्य करतों. पण असे मतभेद लोकशाहीच्या मार्गानेंच सोडविले पाहिजेत. या दृष्टीनें विभाग, जिल्हा, तालका व गांव या पातळीवर निरनिराळ्या संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. विकासाला प्राधान्य द्यावयाचें ही भूमिका एकदां मान्य झाल्यानंतर या मतभेदांतूनहि सहकार्याचें क्षेत्र वाढवितां येईल असा माझा दृढ विश्वास आहे.

ज्या नव्या महाराष्ट्र राज्याच्या स्वागताचा सोहळा आपण करीत आहोंत त्यासंबंधीं महाराष्ट्रांतील जनतेंत जास्तींत जास्त मतैक्य आहे याबद्दल मला तिळमात्र शंका नाहीं. कांहीं जण मात्र थोडासा विरोधी सूर काढीत आहेत. हा विरोधी सूर काढणाऱ्या माझ्या मित्रांना माझी प्रेमाची विनंती आहे कीं, लोकशाहीचा कौल मान्य करून महाराष्ट्रांतील आम जनतेच्या हिताच्या दृष्टीनें त्यांनीं आपला विरोध सोडून द्यावा व महाराष्ट्राच्या उभारणीच्या कार्यांत सहभागी व्हावें. तीन वर्षांपूर्वी सर्व मराठी प्रदेश एकत्र आल्यानंतर आपण परस्परांच्या किती तरी जवळ आलों आहोंत. मुंबईचा माणूस आतां नागपूर-नांदेडचा विचार करूं लागला आहे तर अमरावती-अकोल्याच्या माणसाला सांगली-कोल्हापूर हे आपल्यापैकींच आहेत असें वाटूं लागलें आहे. वाहतुकीचीं साधनें वेगाचीं झालीं कीं, अंतर कमी होतें हें जसें सत्य आहे, त्याप्रमाणेंच ममत्वाच्या भावनेनेंहि अंतर कमी होतें. हा अनुभव गेल्या तीन वर्षांपासून आपल्याला अधिकाधिक येत आहे. बराच काळ दूर राहिल्यामुळें सुरवातीला थोडेसें संशयाचें वातावरण, थोडीशी दूरपणाची भावना पाहिजे हें मानवी स्वभावाला धरूनच आहे. पण समजूतदारपणानें वा जाणीवपूर्वक हा संशयाचा पडदा दूर सारला पाहिजे. महाराष्ट्र आज एकसंध होत आहे त्याचें फार मोठें श्रेय विदर्भ व मराठवाड्यां-तील नेते व विचारवंतांनीं या दिशेनें केलेल्या प्रयत्नांस आहे., यांत मुळींच शंका नाहीं. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्याबर हें एकीकरणाचें कार्य संपलें असें मानण्याची चूक कोणी करूं नये.

एक महत्त्वाचा टप्पा आपण गांठला, पण आपल्याला अजूनहि पुढें वाटचाल करावयाची आहे. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा यांना एकरूप

करण्याची जबाबदारी केवळ शासनानेंच पार पाडावयाची आहे अशी अपेक्षा सर्वस्वी चुकीची ठरेल. साहित्यसंस्था, सांस्कृतिक व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था, यांना शासनापेक्षांहि हें कार्य अधिक भरीवपणें करतां येईल असें माझें मत आहे. त्या दिशेनें होत असलेल्या प्रयत्नांची मला अर्थातच जाणीव आहे. एकसंध महाराष्ट्र निर्माण करण्याचे प्रयत्न शासनाच्या द्वारें होत आहेत व त्यांत संपूर्ण यश येईपर्यंत ते चालू राहतील असें मी आश्वासन देतों.

संसदेच्या विधेयकांत नागपूर कराराचा अंतर्भाव केला नाहीं म्हणून ज्यांचा रोष झाला असेल त्या सर्वांना माझी कळकळीची विनंती आहे कीं, त्यांनीं या निवेदनामागील प्रामाणिक भावना लक्षांत घेऊन आपला रोष दूर करावा व आपण ज्या नव्या महाराष्ट्र राज्याचा आनंदोत्सव आज साजरा करीत आहोंत त्याच्या उभारणीच्या कार्यास त्यांनीं हातभार लावावा.

अनेक अडचणींतून मार्ग काढीत असतां महाराष्ट्र राज्याची स्थापना होत आहे. बंधुभावानें आपण आज एकत्र आलों आहोंत व हा बंधुभाव आपल्याला वाढीला लावावयाचा आहे. 'पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाळ' या कवि विनायकांच्या वचनाप्रमाणें महाराष्ट्राचें भवितव्य उज्ज्वल आहे अशी आपणा सर्वांची श्रद्धा आहे. नव्या भारतांत आपल्याला नव्या महाराष्ट्राची उभारणी करावयाची आहे. बुद्धिमान, प्रामाणिक व कष्टाळू महाराष्ट्र या कामांत मागें पडणार नाहीं याबद्दल माझ्या मनांत शंका नाहीं.

( २७ एप्रिल १९६०: नागपूर आकाशवाणी )

* * *



समाजाच्या कल्याणासाठीं ज्ञानाची उपासना असते असें ज्यांना वाटत असेल अशा ज्ञानी, विद्वान बुद्धिवन्तांनीं कोणाच्याहि आमंत्रणाची वाट न पाहतां स्वयंस्फूर्तीनें पुढें येऊन आपली ज्ञानगंगा साऱ्या समाजापुढें खुली

# विचारवंत व शासन

केली पाहिजे. समाजसेवेसाठीं ज्ञानी माणसांची सेवा शासन मागून राहिलें आहे. अशा ज्ञानी लोकांची शासन जरूर कदर करील. ज्ञानी विद्वानांचीं समाजानेंच नव्हे, तर शासनानेंहि कदर केली पाहिजे. जर शासन अशी कदर करीत नसेल तर तें शासन पुरोगामी नाहीं. शासनाकडून जितकी संधि मिळेल तितकें कार्य करूं, सहकार्य करूं असें डॉ. धनंजयराव गाडगीळ म्हणाले. पण त्यांच्यासारख्या विद्वानांनीं जितकी संधि मिळेल तेवढेंच कार्य करूं अशी अट घालूं नये. आणि मुख्य म्हणजे ज्ञानाच्या उपासकानें कोणत्याहि शासनाच्या मेहेरबानीवर जगतां कामा नये असें मी मानतों. शिवाय विद्वानांची जिथें कदर होणार नसेल तें शासन बदलण्याचे प्रयत्न करावेत. कदर होत नाहीं म्हणून बाजूला न राहतां

आग्रहानें पुढें आलें तरच ते खरे ज्ञानवंत असें मानलें जाईल. माझ्यापुरतें बोलावयाचें तर अशा विद्वानांचें सहकार्य मला हवें आहे. दुर्वास मुनींचेंहि मी स्वागत करीन पण तापटपणाबरोबरच ते खरोखर ज्ञानवंतहि असले पाहिजेत.

विचारमंथन चालू घडीला आवश्यक आहे. विचारमंथन कधीं वाया जात नाहीं; विचारमंथनांतच महाराष्ट्रजीवनाच्या समृद्धीच्या साधनांचीं बीजें आहेत. या ग्रंथांत एकसंधपणाबरोबरच मतांची विविधता आहे. आम्ही काय आहोंत हें समजण्याची जिज्ञासा आहे. आमच्या इतिहासामागें निश्चित कोणतें सूत्र आहे, आमचें तत्त्वज्ञान काय आहे, आमच्या समाजाचें व्यक्तिमत्त्व, त्याचें रंगरूप काय हें समजण्याची दृष्टि यामागें आहे. हें जर समजलें नाहीं तर आम्ही कर्तृत्व करण्यास समर्थ होऊं शकणार नाहीं. काळाच्या प्रेरणा, वैशिष्टयें न समजतांच आम्ही पराक्रमाला बाहेर पडलों तर उणेपणा येईल. त्याचबरोबर परिवर्तनशील काळाची अपरिहार्यता लक्षांत घेणें जरूर आहे. सामाजिक परिवर्तन ज्ञानी विद्वानांच्या विचारमंथनांतून होत असतें. ज्ञानाच्या सर्व शाखांत सर्वोत्कृष्ट प्रगति करण्याची, ज्ञानासाठीं ज्ञानाची उपासना करणारांची एक प्रचंड आघाडी निर्माण झाली पाहिजे.

* * *

( २२ मे १९६०. पुणें . महाराष्ट्रदर्शन ग्रंथप्रकाशन )



राजकीय नकाशावर निर्माण झालेल्या एकसंध महाराष्ट्रामागें महाराष्ट्राचें एकजिनसी मत उभें करणें ही नव्यानें जन्माला आलेल्या महाराष्ट्र राज्या-पुढील मूलभूत समस्या आहे. महाराष्ट्राच्या भावनात्मक ऐक्याचा नाजुक

# महिलांचें कार्य

प्रश्न स्त्रियांच्या नाजुक हातांनीं कदाचित् लौकर सुटूं शकेल. हा प्रश्न सोड-विण्याचे प्रयत्न आम्ही आमच्या परीनें करीत आहोंतच. पण आमच्या मार्गांत कांहीं चुकाहि असतील. तेव्हां स्त्रियांनीं पुढें यावें.

नवमहाराष्ट्र निर्माण झाल्यापासून माझ्या मनाला दोन चिंता लागून राहिल्या आहेत. दक्षिण सीमेवरील मराठी भाषिक जनतेला महाराष्ट्रांत सामील होतां आलें नाहीं म्हणून एका बाजूनें खेद होतो तर पूर्व सीमाप्रदेशांतील मराठी जनतेचें सामिलीकरणांत मन नाहीं म्हणून दुसऱ्या बाजूनें चिंता वाटते. अशा परिस्थितींत सर्व मराठी भाषिक जनतेमध्यें भावनात्मक ऐक्य घडवून आणण्यासाठीं प्रयत्न करणें हें सर्वांचें कर्तव्य आहे.

या दृष्टीनें महिलांना फार मोठें काम करतां येण्यासारखें आहे. राजकारणाच्या मैदानावर निर्माण झालेले मतभेद कोर्टाच्या आवारापेक्षां घरांतल्या दिवाणखान्यांत अधिक सुकरतेनें सुटूं शकतील. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ या सर्व ठिकाणच्या महिला कार्यकर्त्यांनीं अनौपचारिकरीत्या एकत्र येऊन हें कार्य केलें पाहिजे. अशा उपक्रमांतून त्यांना परस्परांच्या अपेक्षा, राग, कमतरता इत्यादि सर्व गोष्टीचें चांगलें आकलन होईल आणि त्यांतून भावनात्मक ऐक्य साधण्याचा मार्गहि सांपडूं शकेल. सामाजिक मत एकत्र करण्याच्या पुरुष मंडळींच्या प्रयत्नांस स्त्रियांचा हातभार लागला नाहीं तर ते प्रयत्न यशस्वी होणार नाहींत.

पुनर्रचनेच्या कार्याचीं क्षेत्रें अनेकविध असलीं तरी पुनर्रचनेचा प्रश्न एकसंध आहे. कोठल्याहि देशांत घडणारी क्रांति ही तेथील वैचारिक परिवर्तनाची परिणति असते. म्हणून महाराष्ट्राच्या व देशाच्या पुनर्रचनेचें जें कार्य आपणांस करावयाचें आहे तें विविध स्वरूपाचें असलें तरी त्यामागें असलेली वैचारिक बैठक ही मूलभूत आहे. हा दृष्टिकोन असलेलीं माणसें सर्व क्षेत्रांत निर्माण झालीं कीं पुनर्रचनेच्या कार्याचा वेग इष्ट दिशेनें वाढल्यावांचून राहणार नाहीं.

आज आपण निवडणूक वा इतर कांहीं कार्यें सुलभ होतात म्हणून जातीयवादाचा आश्रय घेत असतों. परंतु 'मी जातीयवादी नाहीं' असें सांगण्यांत आपण हल्लीं मोठेपणा मानतों हेंहि खरें. याचा अर्थ असा कीं, जातीयवाद अनिष्ट आहे हें आपण विचारानें स्वीकारलें आहे ही प्रगति कांही कमी महत्त्वाची नाहीं. परंतु आपण आतां यापुढें गेलें पाहिजे. याबाबतहि स्त्रियांवर विशेष जबाबदारी आहे. कारण स्त्रियांनीं जर हा विचार स्वीकारला नाहीं तर जातीयवाद नष्ट करण्याकरितां प्रयत्न करणाऱ्यांना फारसें यश लाभेल असें दिसत नाहीं. या कार्याची सुरुवात जर आपण कौटुंबिक जीवनापासूनच केली, तर पुढील दहा पंधरा वर्षांत जातीयवाद नष्ट करण्याच्या दृष्टीनें आपण खूपच प्रगति करूं शकूं.


जागृत स्त्रीवर्ग महाराष्ट्रांतील शहरांत मोठ्या प्रमाणावर असला तरी ग्रामीण भागांत त्याची उणीव विशेषत्वानें जाणवते. शहरांतील स्त्रियांनीं आपल्या कौटुंबिक व इतर जबाबदाऱ्या सोडून खेड्यांत जावें असा व्यासपीठावरचा फुकाचा उपदेश मी कधींहि करणार नाहीं. नव्या विचारांचा

स्वीकार केलेल्या आणि ग्रामीण भागांतच वास्तव्य असलेल्या स्त्रियाच त्या भागांतील स्त्रियांच्या जागृतीचें कार्य करण्यास आतां पुढें आल्या पाहिजेत.

( २२ मे १९६०. पुणें : महाराष्ट्र प्रांतिक महिला सभा. )

* * *

ग्रंथ संग्रहालय ठाणे
११४९६



बंगाल, बंगालचे लोक आणि बंगालशी संबंधित असा सर्व गोष्टींसंबंधीं मला नेहमींच अतिशय आदर वाटत आला आहे. कदाचित् तारुण्यांत भारताच्या स्वातंत्र्याचा जो इतिहास मी वाचला त्याचा हा परिणाम असावा.

# बंगाल व महाराष्ट्र

या शतकाच्या पहिल्या दशकांत या देशावर तेव्हां राज्य करणाऱ्या परकी राज्यकर्त्यांनीं बंगालची फाळणी केली. त्यावेळीं या वंगभंगाविरुद्ध झालेल्या देशव्यापी चळवळींत महाराष्ट्रानें आपल्या या बांधवांसाठीं भाग घेतला व तेव्हांच लाल-बाल-पाल ही त्रिमूर्ति आपल्या इतिहासांत अजरामर झाली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या साहसाला आपल्या इतिहासांत तोड नाहीं. यामुळेंहि बंगाल व बंगाली लोक यांच्यासंबंधीं सर्वसाधारणपणें महाराष्ट्रीयांना व विशेषत: मला एवढा आदर वाटतो. आणि ज्या अर्थी आपल्या सांस्कृतिक प्रदर्शनासाठीं तुम्ही महाराष्ट्राची प्रथम निवड केली आहेत व बंगालच्या बाहेर प्रथमच हें प्रदर्शन भरवीत आहांत त्या अर्थी आमच्या या भावनेला

बंगालकडूनहि तसाच प्रतिसाद मिळत आहे असें जर मी म्हटलें तरी त्याबद्दल कोणी आक्षेप घेणार नाहीं अशी माझी अपेक्षा आहे.

महाराष्ट्र व बंगालच्या राजकीय व सामाजिक इतिहासांतून एकमेकांबद्दलच्या सौहार्दाचे दर्शक असे अनेक प्रसंग सांगतां येण्यासारखे आहेत. दोन्ही राज्यांनीं ब्रिटिशांविरुद्ध देशांतील चळवळीचें नेतृत्व केलें आणि विख्यात शिक्षणतज्ज्ञ व उत्साही समाजसुधारक यांना जन्महि दिला. साहित्याच्या क्षेत्रांत बंगालनें व महाराष्ट्रानें फार मोठी कामगिरी बजावली असल्यानें आपल्या देशांत बंगाली व मराठी या भाषांना महत्त्वाचें स्थान मिळालें आहे. सांस्कृतिक परंपरा, कलाविकास आणि बौद्धिक जीवन याबाबतहि बंगाली आणि महाराष्ट्रीय एकमेकांच्या निकट आहेत. एवढेंच नव्हे तर भावना, प्रवृत्ति याबाबतहि बंगाली व महाराष्ट्रीय जितके एकमेकांच्या जवळ आहेत तितके दुसरे कोणतेहि दोन भाषिक गट नाहीत.

आज आपल्या देशांतील घडामोडीत जे वृत्तान्त वृत्तपत्रांतून रोजच्या रोज प्रसिद्ध होत आहेत ते पाहिल्यानंतर भावनात्मक एकीकरणाच्या प्रश्नाला विशेषच महत्त्व प्राप्त होतें. या दृष्टीनें विचार केला तर मुंबई शहर हें देशांतील विविध घटकांचें भावनात्मक ऐक्याचें प्रतीक आहे आणि येथें निरनिराळ्या जमातींत ऐक्य आहे, एकमेकांबद्दल औदार्याची भावना आहे.

( २८ जून १९६०. मुंबई वंग संस्कृतिसंमेलनाचें चित्रप्रदर्शन )

* * *

"प्राचीन भारतीय शास्त्रें मनुष्याचें पशुत्व नष्ट करून त्यांच्यांत देवजीवन निर्माण करण्यासाठीं प्रवृत्त झालीं आहेत. त्यांची आजच्या संघर्ष युगावरील तोडगा म्हणून जशी आवश्यकता आहे तशीच भारतीय राष्ट्राला सामर्थ्यसंपन्न होण्यासाठीं पाश्चात्यांच्या भौतिक शास्त्रांच्या उपासनेचीहि नितान्त आवश्यकता आहे. राष्ट्राच्या जीवनांत या उभयविध शास्त्रोपासनेचा समन्वय होणें जरुर आहे."



आजचा हा औपचारिक समारंभ ही महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर घडणारी अत्यंत महत्त्वाची घटना आहे असें मी मानतों. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळीं शासनाच्या धोरणासंबंधींचें मी जें वक्तव्य केलें होतें त्यावेळीं

# साहित्य व संस्कृति

पहिल्या प्रथम मी महाराष्ट्राशीं वचनबद्ध झालों होतों कीं, साहित्य आणि संस्कृति यांच्या वृद्धीसाठीं व संवर्धनासाठीं काम करणारी एक विद्वज्जनांची यंत्रणा निर्माण करण्याचा सहकारचा हेतु आहे. त्याच धोरणाचा पुनरुच्चार महाराष्ट्र विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनांत झाला. त्यामध्यें महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाशजी यांनीं तेथें ज्या शब्दांत या धोरणाचा उल्लेख केला होता त्यांचा पुनरुच्चार करण्याचा मोह मला आवरला नाहीं. त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, "सरकारनें मराठी भाषेच्या विकासासाठीं आणि समृद्धीसाठीं महाराष्ट्राची भाषा, संस्कृति आणि इतिहास यांसंबंधीं तांतडीनें लक्ष देण्याचें ठरविलें आहे. अशा तऱ्हेच्या संशोधनास

उपयुक्त होईल अशा भारतांतील निरनिराळ्या भाषा आणि संस्कृति व पाश्चात्य भाषांत उपलब्ध असलेल्या भाषा, इतिहास आणि संस्कृति यांचें संशोधन करण्यासाठीं व त्यासाठीं देखरेख करण्याकरितां या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व विद्वानांची एक यंत्रणा लवकर निर्मिण्याचा महाराष्ट्र सरकारचा विचार आहे." वेगवेगळ्या वेळीं शासनामार्फत ज्या घोषणा, जे उच्चार, पुनरुच्चार होत गेले त्यांचें फलित स्वरूप म्हणजे आज या मंडळाची स्थापना होत आहे; आणि माझ्या दृष्टीनें मी मराठी जनतेला दिलेल्या वचनाची आज परिपूर्ति केल्याचें समाधान माझ्या मनांत आहे.

साहित्याच्या प्रश्नाबाबत बोलत असतांना माझ्यासारख्या माणसानें थोडेसें जपून बोलावें याची जाणीव मला असतांनासुद्धां कांहीं थोड्या गोष्टींचा उच्चार करण्याचा जर मी प्रयत्न केला तर आपण मला क्षमा कराल. कारण मी असें मानतों कीं स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आणि भाषिक राज्यांच्या जन्मानंतरहि वैचारिक, सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची नवी शक्ति, नवा प्रवाह भारतीय जीवनांत निर्माण झाला असून तो एका विशिष्ट अशा समृद्ध कालखंडांत प्रवेश करीत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जनजीवन समृद्ध करण्याची प्रतिज्ञा देशानें केली. भाषिक राज्याच्या जन्मानंतर याचें आणखी एक समृद्ध साधन आम्हांला प्राप्त झालें आहे. यापुढें आतां असा निश्चित् कालखंड सुरू होतो कीं, ज्यावेळीं आपण या क्षेत्रांत घेतलेल्या जबाबदाऱ्या पुऱ्या केल्या पाहिजेत. म्हणून अशा तऱ्हेच्या कल्पना स्पष्ट करण्यासाठीं आणि त्या कामाची पूर्तता करण्यासाठीं त्यासंबंधीं आमच्यापुढें निश्चित् अशी यंत्रणा योजिली पाहिजे, कुठली तरी संस्था योजिली पाहिजे असें वाटू लागलें. अशा तऱ्हेची संस्था म्हणून १९५४ सालीं साहित्य अकादमीचा जन्म झाला. वेगवेगळ्या भाषेंतील दुर्मिळ ग्रंथांची प्रसिद्धि, निरनिराळ्या संस्कृतींचें, इतिहासाचें, वाङ्मयाचें संशोधन करणें वगैरे विविध स्वरूपाचीं कामें ही संस्था करते. अशा स्वरूपाचें व शक्य झाल्यास त्यापेक्षां व्यापक स्वरूपाचें कार्य करण्याचें उद्दिष्ट आजच्या या मंडळापुढें आहे. आपल्या महाराष्ट्र साहित्य संशोधन मंडळाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे आहेत. त्यांच्या एका थोर ग्रंथाला मोठें अनुदान नुकतेंच ह्या केंद्रीय साहित्य अकादमीनें दिलें आहे. अशाच स्वरूपाचें किंवा याहिपेक्षां व्यापक स्वरूपाचें काम करण्यासाठीं या

संस्थेचा जन्म झाला आहे.

या मंडळाला जन्म देणारा जो सरकारी आदेश प्रसिद्ध झाला आहे त्यांत कांहीं धोरणांचा उल्लेख केला आहे. पण मी येथें स्पष्ट सांगूं इच्छितों कीं त्यामध्यें उल्लेखिलेलीं धोरणें (डायरेक्टिव्हज्) नमुन्यादाखल आहेत. कुठल्या तऱ्हेचें काम केलें पाहिजे, कसें केलें पाहिजे यासंबंधीं कुठलेंहि बंधन घालणें आवश्यक होतें म्हणून तें घातलें इतकेंच. त्याचा उद्देश इतकाच कीं या मंडळावर जी तज्ज्ञ आणि विद्वान मंडळी आहेत त्यांनी या कार्याची लांबी, उंची, खोली, रुंदी वाढवावी म्हणून योग्य ते प्रयत्न करून अधिक व्यापक, अधिक सर्वकष कार्य जर केलें तर त्याचें शासन स्वागत करील हें मी सुरवातीलाच स्पष्ट करूं इच्छितों. त्यांच्यावर व त्यांच्या विचारावर सरकार कुठलेंहि बंधन घालूं इच्छित नाहीं. मी आणि महाराष्ट्रशासन असें मानणाऱ्यांपैकीं आहोंत कीं देशांतील लेखक, देशांतील विचारवंत, देशांतील कलावंत, शास्त्रज्ञ आणि संशोधक यांच्या प्रयत्नानें निर्माण होणारें जें विचारधन आहे तें खरें म्हणजे समाजाचें फार मोठें धन आहे असें मी मानतों. तें असलें म्हणजे देश ओळखला जातो, समाज ओळखला जातो, समाजाचें जीवन प्रवाही राहतें, चिरंतन राहतें. समाज जिवंत राहतो तो त्याच्याजवळ असणाऱ्या भौतिक सामर्थ्यानें नाहीं, तर त्याच्याजवळ असणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांवर व विचारधनावर. समाज आणि देश जिवंत राहिलेले आहेत, वाढलेले आहेत असा इतिहासाचा दाखला आहे. आमच्या देशांतील परंपरा अशाच तऱ्हेची आहे आणि ती सांगावयाची झाल्यास व्यास-वाल्मिकीपासून ते आजपर्यंतच्या अनेक पंडितांची, विद्वानांची व विचारवंतांची आहे. मी जर ही यादी सांगूं लागलों तर ती मोठी आकर्षक यादी आहे. ती इतकी लांबलचक आहे कीं, तिचा पुनरुच्चार करण्याची आवश्यकता नाही. कांहीं दिवसांनीं देशांत रवीन्द्रनाथ टागोर यांच्या जन्मशताब्दीचा समारोह साजरा केला जाणार आहे. रवीन्द्रनाथ टागोरांसारख्या ऋषितुल्यापासून ते व्यास-वाल्मिकीपर्यंत आमची मोठी परंपरा आहे, आणि महाराष्ट्रापुरतेंच बोलावयाचें झाल्यास ज्ञानेश्वरापासून सुरूं झालेली ही परंपरा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्यापर्यंत त्या परंपरेचा उल्लेख करतां येईल. तेव्हां अशा थोर विद्वानांची, पंडितांची, त्यागी संतांची आणि पराक्रमी पुरुषांची अशा तऱ्हेची लांबलचक परंपरा

आहे. ती आमची खरी प्रेरणा आहे. त्याचें काम आम्हीं पुढें चालविलें पाहिजे आणि तें काम चालू करीत असतांना त्यांना त्याकरितां लागणारें साहित्य पुरविणें, साधनसामग्री पुरविणें, हें शासनाचें काम आहे; आणि म्हणून आपण या साहित्यिक आणि सांस्कृतिक मंडळाला जन्म देत आहोंत.

आजच्या एका विशिष्ट परिस्थितींत या मंडळाची स्थापना आपण करीत आहोंत, त्याला कांहीं विशिष्ट अर्थ आहे असेंच मी मानतों. मराठी भाषा राज्यभाषा करण्याचें तत्त्व आम्हीं स्वीकारलें आहे. त्यामुळें आम्हीं कांहीं जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत. मराठी भाषेवर आतां अशी जबाबदारी आली आहे कीं तिनें लोकशाहीचा कारभार केला पाहिजे कीं ज्यामुळें ती लोकांचें जीवन संपन्न करील, लोकांचें जीवन समृद्ध करील. सगळ्या अर्थानें संपन्न करील असा याचा अर्थ नव्हे, तर भौतिक अर्थानें जगांतलें जें जें शास्त्र उंचावलें आहे त्या त्या शास्त्रांतील ज्ञान आपल्या भाषेंत पकडून आणण्याचे सामर्थ्य आपल्या भाषेंत उपलब्ध केलें पाहिजे. खरें म्हणजे साहित्यिकांचा आणि संस्कृतीचा, विचारवंतांचा, लेखकांचा जन्म कशासाठीं होतो? मी तर असें मानतों कीं कुठें तरी असलेली भूक अशी आकांक्षा शब्दासाठीं, एक्सप्रेशनसाठीं, व्यक्तिमत्त्वासाठीं एकप्रकारें हांक मारीत असते. ती आशा, ती आकांक्षा, ती कल्पना शब्दांसाठीं भुकेलेली असते, तहानलेली असते. तेव्हां लेखक, विचारवंत, संशोधक, शास्त्रज्ञ ह्यांना आलेल्या या हांकेला होकार भरून, साथ भरून ते शब्द लेखनरूपानें मांडणें आवश्यक आहे.

मराठी भाषिक जनतेच्या ज्या आशा, ज्या आकांक्षा, ज्या हांका आहेत, त्या विविध प्रवाही आहेत. ज्ञानाला सरोवराची जर उपमा दिली तर त्या सरोवराचे पाट लोकांच्या जीवनापर्यंत पोहोंचले पाहिजेत. याबाबतींत हें मंडळ आमचें मदतगार राहील. म्हणून या मंडळाचें हें काम आहे. मराठी भाषा राजभाषा म्हणून स्वीकारण्याची तयारी करण्यासाठीं आजचा हा प्रसंग आला आहे. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल बोलावयाचें झाल्यास इंग्रज लोकांनीं बखरींतून त्यांना आवश्यक स्वरूपाचे ठोकळ उतारे घेऊन हा इतिहास निर्माण केला आहे. त्याचा आजहि १९६० सालीं विचार करण्याची आवश्यकता आहे. ह्या इतिहासाचें पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. संशोधनाचें काम लक्षांत घेऊन हा मराठ्यांचा इतिहास पुन्हां लिहिला

गेला पाहिजे आणि प्राचीन इतिहासाचें लेखन करणें हें या साहित्य मंडळाचें काम आहे. भारताच्या प्राचीन इतिहासांतील मराठ्यांच्या इतिहासाचें पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता आहे.

याबाबत विचार करीत असतांना आपापल्या पद्धतीनें प्रयत्न केला पाहिजे. इतिहासाच्या पुनरुज्जीवनासाठीं अनेक साधनें ठिकठिकाणीं पडलेलीं आहेत. कुणीतरी या प्रश्नाला हात घातल्याशिवाय हें काम पुरें होण्याची शक्यता नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाबाबत, महाराष्ट्राच्या इतिहासाच्या तयारीसाठीं लागणारीं अशीं अनेक साधनें ठिकठिकाणीं विखुरलेलीं आहेत, पडलेलीं आहेत. परवांच कांहीं विद्वान मित्रांशीं चर्चा करीत असतांना त्या चर्चेमध्यें आपल्या विदर्भाचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. माडखोलकर म्हणाले कीं, विदर्भ आर्ष भूमि मानावयाची झाली तर, आणि त्याचा तुटलेला दुवा जोडावयाचा असेल तर, मराठवाड्याच्या आणि विदर्भाच्या अनेक खेड्याखेड्यांतून अनेक साधनें पडलीं आहेत. यासंबंधीं कांहीं कल्पना, विचार आमच्या मनांत येऊन जातात, पण हें काम स्थिरपणें कुठल्यातरी संघटनेनें केलें पाहिजे. या यंत्रणेनेंच तें काम करावें असा याचा अर्थ नाहीं. आम्हीं ही एक यंत्रणा उभी केली आहे तिनें महाराष्ट्रांत ज्या निरनिराळ्या संस्था आहेत त्यांच्याकडून हें काम करवून घेतलें पाहिजे. त्यांच्या विचारांचा, त्यांच्या शक्तीचा, साधनांचा उपयोग करून घेतला पाहिजे. त्यांना कार्यक्षम केलें पाहिजे, क्रियाशील केलें पाहिजे. या संस्थेच्या कामाचें स्वरूप लक्षांत घेऊन एक योजना तयार केली पाहिजे आणि ही जी विद्वान मंडळी ठिकठिकाणीं आहेत, त्यांच्या शक्तीचा आणि त्यांच्या ज्ञानाचा व साहित्याचा, विचारांचा उपयोग करून काम करण्याची प्रवाही योजना करावी अशी या मंडळाकडून माझी अपेक्षा आहे.

या मंडळाचा जन्म निव्वळ इतिहासाचें संशोधन करण्यासाठीं झाला असा याचा अर्थ नव्हे. परवांच कांहीं मित्रांशीं, विचारवंतांशीं चर्चा झाली. महाराष्ट्रांतील विद्वानांची आणि वृत्तपत्रांतून झालेली चर्चा मी काळजी-पूर्वक वाचली, अभ्यासली. मी जेव्हां इतिहासाचें संशोधन केलें पाहिजे असें म्हणतों तेव्हां भूतकालाचें उत्खनन करून जेवढी माहिती मिळेल तेवढी जमा करावी असें नव्हे, तर वर्तमानकाळाकडे लक्ष दिलें पाहिजे व वर्तमानकाळ बघतांना भविष्यकाळाकडे नजर ठेवून त्यांनीं आम्हांला मदत केली पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दि:


मी जेव्हां साहित्य म्हणतों तेव्हां ललितसाहित्य म्हणतों असें नव्हे आणि तेवढेंच साहित्य असा याचा अर्थ नव्हे. ललितशब्द म्हणजे साहित्य अशी माझी कल्पना नाहीं. ललितसाहित्य म्हणजे सामान्य जनतेचें हित करण्याचें साहित्य अशी साधीसुधी व्याख्या मी करतों. हें करण्यामध्यें शास्त्राचा अभ्यास गृहीत धरावा लागतो. आज मी पाहिलें आणि ती गोष्ट कोणीहि नाकारूं शकणार नाहीं कीं, आम्ही किती जरी म्हटलें कीं मराठी भाषेमध्यें अमृ-ताशीं समान अक्षर देणाऱ्या या महान् पंडितांना आम्ही शिरोधार्य मानतों तरी संशोधनासाठीं इंग्रजी भाषेचा पाठपुरावा करणें आम्हांला आवश्यक असतें. तेव्हां इतर भाषांमध्यें जी ज्ञानसंपत्ति, ज्ञानभांडार असेल, जे विचार असतील ते मराठी भाषेंत खेंचून आणण्याचा प्रयत्न आम्हांला करावा लागणार आहे. परवांच माझ्या एका संपादक मित्रानें ह्या मंडळाला उद्देशून एक सूचना केली कीं, कृपा करा आणि विद्वान् मंडळीकडून तयार केले गेलेले ज्ञानकोश, शब्दकोश हे निव्वळ त्यांच्या ग्रंथालयांच्या शोभेसाठीं ग्रंथालयांत ठेवण्याचें त्यांनीं विसरून जावें. ते जनतेला उपलब्ध होतील अशा स्वरूपाचे करावे. इतकेंच नव्हे तर त्यांनीं यासाठीं वेगवेगळ्या संस्कृतीचें, शास्त्रांचें संशोधन करून, अभ्यास करून लोकांना उपयुक्त होईल असें मार्गदर्शन केलें पाहिजे. हें मंडळ म्हणजे वेगवेगळ्या भाषेंतील ग्रंथाचें प्रकाशन करणारें प्रकाशनखातें आहे असा याचा अर्थ नव्हे, तर सर्जनशील, विचार करणारें हें मंडळ म्हणजे एक प्रकारचें पॉवर हाऊस बनावें, विद्युत्गृह बनावें अशी माझी या मंडळा-कडून अपेक्षा आहे. कुठें तरी क्षितिजापलीकडे राहणारी दुनिया बनतां कामा नये. वाढतीं क्षितिजें निर्माण केलीं पाहिजेत. हें मंडळ महाराष्ट्राचें जीवन व्यापक व विस्तृत करणारें माध्यम बनावें अशी माझी कल्पना आहे. आणि म्हणूनच या मंडळाचा जन्म झाला आहे. अशा प्रकारच्या साधनाची, माध्यमाची आवश्यकता होती. महाराष्ट्राचें जीवन व्यापक, क्रियाशील बनावें आणि त्याचें माध्यम म्हणून या मंडळानें कार्य करावें. महाराष्ट्र राज्याच्या स्थापने-पूर्वी अनेक दिवस अशा तऱ्हेचा विचार मनांत घोळत होता. आतां माझी ती कल्पना साकार होत आहे.

ही काम कारणारी संस्था वाढती राहो आणि मी जर पुन्हां या शब्दाचा पुनरुच्चार करावयाचा म्हटलें तर साहित्यिकांच्या या महान् यात्रेंत संस्कृतीचा

आणि स्वतंत्र साहित्याचा जरीपटका खांद्यावर वाळगून ती यश:श्री आघाडीवर राहील अशी आशा बाळगतों.

( २२ डिसेंबर १९६० : नागपूर )

* * *



विनोदबुद्धि आणि विचारप्रवर्तक प्रश्न करणारे म्हणून पत्रकार जगभर ओळखले जातात आणि त्यांच्या सहवासांत मला नेहमींच आनंद आणि उत्साह वाटतो.

# पत्रकारांची जबाबदारी

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यांत पत्रकारांनीं घेतलेला भाग विख्यातच आहे. त्या काळांत वृत्तपत्रव्यवसाय हा व्यवसाय म्हणून चालविला जात नव्हता तर धर्म म्हणून, जीवनध्येय म्हणून हा उद्योग केला जात असे. आतां काळाच्या ओघाबरोबर पत्रव्यवसायाचें स्वरूप जीवनांतील इतर क्षेत्राप्रमाणेंच बदललें आहे किंवा जलद गतीनें बदलत आहे. हें अर्थात योग्य आहे. प्रामाणिकपणा, निष्ठा व सत्य हीं मूलभूत तत्त्वें सर्वच व्यवसायाच्या आणि मानवी प्रयत्नाच्या मागें हवीं आणि तीं जोंपर्यंत सोडलीं गेलीं नाहींत तोंपर्यंत काळाच्या ओघा-बरोबर जर कोणत्या क्षेत्रांत बदल झाले, दृष्टिकोण बदलला तर त्याबद्दल

खंत करण्याचें कारण नाहीं, नव्हे अशा बदलाचें स्वागतच करावयास हवें.

पत्रव्यवसाय भरभक्कम पायावर उभारण्याचे प्रयत्न सध्या चालू आहेत. आपल्या देशाच्या दृष्टीनें सध्यांचा काळ फार महत्त्वाचा आहे. अशा वेळेला पत्रव्यवसायाची भक्कम पायावर पुनर्घटना झाली तर ती किती महत्त्वाची आहे हें सांगावयास नकोच. पण अशा व्यवसायासाठीं योग्य प्रकारची संघटना व नेतृत्व लागत असतें. ही सांगड घालण्याचें कार्य यशस्वितेच्या मार्गावर आहे याबद्दल मला आनंद होतो.

या राज्यांत सरकार व वृत्तपत्रें यांचे संबंध सलोख्याचे आहेत हें सुदैव आहे. लोककल्याणासाठीं चाललेल्या चळवळीचीं हीं दोन्हीं शस्त्रें आहेत; साधनें आहेत. आणि लोकांच्या दृष्टीनें महत्त्वाच्या अशा कांहीं विशिष्ट गोष्टींबाबत कांहीं मतभेद मधूनमधून झाले, तरी मुख्य उद्दिष्टासंबंधीं कोणताहि मूलभूत स्वरूपाचा विरोध असण्याचें कारण नाहीं. स्वतंत्र भारतानें समाजवादी धर्तीवरील कल्याणकारी राज्यांचा आदर्श आपल्यापुढें ठेविला आहे. कल्याण-कारी राज्यांत कोणतीहि व्यक्ति दडपली जात नाहीं, तिची पिळवणूक होत नाहीं किंवा तिची वासलात लावली जात नाहीं. या समाजरचनेचे सर्वजण समान घटक असतात, श्रमाच्या फळांत सर्वांचा वांटा असतो आणि प्रबल दुर्बलांचें रक्षण करतात, त्यांचे विश्वस्त म्हणून वागतात आणि अशा रीतीनें सर्वजण सर्वांच्या कल्याणाला चालना देतात.

आपल्या देशांतील ८० टक्के लोक निरक्षर आहेत आणि हें लक्षांत घेतां कल्याणकारी राज्याचें हें कार्य कांहीं सोपें नाहीं. तेव्हां लोकांना माहिती देणें, शिक्षण देणें आणि राष्ट्रीय पुनर्रचनेच्या प्रचंड कार्यांतील त्यांची जबाबदारी व त्यांचे हक्क यांची जाणीव करून देणें ही या क्षणाची निकड आहे. हें फक्त वृत्तपत्रांच्या द्वारेंच करतां येईल. जनतेला योग्य ती माहिती पुरवून व त्यांना सुशिक्षण देऊन, मार्गदर्शन करून तिच्यांत जाणीव व उत्साह निर्माण करतां येईल. आणि आपल्या देशापुढें जे अनेक आर्थिक व सामाजिक प्रश्न आहेत त्यावर तोडगा काढण्यासाठीं या जाणीवेचा व उत्साहाचा उपयोग करतां येईल. आपल्या समाजांत होत असलेल्या मूलभूत स्वरूपांच्या बदलांसंबंधीं लोकांना माहिती देणें, त्याबद्दल त्यांना मार्गदर्शन करणें, हें मला वाटतें, वृत्त-पत्रांचें खरें कार्य आहे आणि ती त्यांची सामाजिक जबाबदारीहि आहे.

विश्लेषणात्मक वृत्तान्त देऊन ही सामाजिक जबाबदारी वृत्तपत्रें पार पाडूं शकतील. वृत्तपत्रांनीं दुभाष्यासारखे, मध्यस्थाचें काम करावें. आणि पंचवार्षिक योजनेसाठीं भांडवलपुरवठा, राष्ट्रीय पुनर्रचना, ग्रामीण विकास, जलद गतीनें औद्योगीकरण हे जे विविध कार्यक्रम आहेत त्यांचा उद्देश आपल्या लोकांच्या राहणीचा दर्जा वाढविण्याचा आहे. यासंबंधींचे जे विविध गुंतागुंतीचे प्रश्न आहेत ते समजावून घेण्यासाठीं वृत्तपत्रांनीं लोकांना साहाय्य करावें. पंचवार्षिक योजना, सामूहिक व ग्रामीण विकास इत्यादि कार्यक्रमाचा अर्थ व महत्त्व बहुसंख्य लोकांना, विशेषतः ग्रामीण भागांतील लोकांना उमजलेलें नाहीं असें मला वाटतें. परंतु त्यांना आपल्या या राष्ट्रउभारणीच्या कार्यांतील आपला वांटा उचलण्यासाठीं त्यांच्यांत उत्साह निर्माण करणें व त्यांना कार्यप्रवृत्त करणें पूर्णतः शक्य आहे. जनमत बनविण्याचें वृत्तपत्रें हें एक प्रभावी साधन आहे व म्हणून हें राष्ट्रीय कार्य तीं उत्साहानें करूं शकतील.

याचा अर्थ असा नव्हे कीं, वृत्तपत्रांनीं सर्वकाळ सरकारची स्तुति करावी. संसदीय लोकशाहींत वृत्तपत्रीय स्वातंत्र्य हें पवित्र मानलें जातें आणि डोळ्यांत तेल घालून त्याचें रक्षण करण्यांत येतें. यामुळें सार्वजनिक महत्त्वाच्या व हिताच्या सर्व प्रश्नांवर स्पष्ट व मुक्तपणें चर्चा होऊं शकते. समाजवादी धर्तीवरील कल्याणकारी समाजाची उभारणी करावी व त्यायोगें समाजाचे सर्व घटक सुखी, समाधानी व समृद्ध व्हावे हें आपलें ध्येय आहे आणि तें गांठण्यासाठीं सर्व प्रश्नांविषयीं विधायक व निकोप दृष्टिकोण स्वीकारण्याची गरज आहे. दारिद्र्य, गलिच्छता व अज्ञान हीं दूर करावयाचीं आहेत, आणि सर्वांना आपला आर्थिक व सामाजिक विकास करून घेण्यासाठीं समान संधि मिळेल अशी आशा व आत्मविश्वास यांनीं युक्त असा समाज आपणांस निर्माण करावयाचा आहे.

जनतेंत जागृति निर्माण करण्याचें कार्य प्रादेशिक भाषेंतील वृत्तपत्रांत मुख्यतः करावें लागेल. ग्रामीण भागांतील लोकांना त्यांच्याच भाषेंत त्यांचे प्रश्न समजावून सांगितले कीं ते लगेच समजू शकतील. हे प्रश्न समजावून सांगतांना लोकांची संस्कृति, विशिष्ट प्रादेशिक गरजा लक्षांत ठेवाव्या लागतील आणि शिवाय राष्ट्रीय दृष्टिकोणाचा विसर पडू देतां कामा नये.

आपल्यासारख्या संसदीय लोकशाहींत लोकशाही व सामाजिक संस्था


याना आपापलें भवितव्य ठरविण्यास अधिकाधिक संधि दिली जाते. आतांच लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. ग्रामपंचायती, जिल्हा लोकल बोर्ड व जानपद सभा यांना अधिक अधिकार मिळतील आणि आर्थिक साधनसामुग्री उपलब्ध होईल यांत कांहीं शंका नाहीं. यामुळें सार्वजनिक महत्त्वाच्या प्रत्येक क्षेत्रांत अधिक कार्य होऊं लागेल आणि मग साहजिकच या संस्थांच्या चांगल्या कार्याची योग्य ती माहिती देणें आवश्यक होईल.

म्हणून इंग्लंड व अमेरिकेच्या धर्तीवर तालुक्याचीं गांवें आणि इतर छोट्या शहरांत जिल्हा वा छोटीं पत्रांची उभारणी करण्याची जरुरी आहे असें मला वाटतें. हीं पत्रें लहान असलीं तरी त्यांचा वाचकवर्ग ग्रामीण भागांत मोठ्या प्रमाणांत असल्यानें व प्रत्येक प्रश्नाकडे व्यक्तिगत दृष्टिकोणांतून विचार करणें त्यांना शक्य असल्यानें, व्यक्तिगत शेतकऱ्यांचें यश सहकारी शेती, ग्रामीण आरोग्य, शेती व धान्योत्पादनाची सुधारलेली पद्धति इत्यादीबाबत भरपूर माहिती देणें त्यांना शक्य होईल. असें झालें कीं राष्ट्राच्या पुनर्घटनेच्या कार्यांत आपणहि आपला वांटा उचलीत आहोंत याची जाणीव त्यांना होईल व समाधान वाटेल. अर्थात् यामुळें ग्रामीण जनतेच्या जीवनविषयक दृष्टिकोणांत क्रांतिकारक बदल होईल आणि याचा उपयोग व्यक्तिशः त्यांना तर होईलच पण साऱ्या देशाच्या दृष्टीनेंहि याचा चांगला परिणाम होईल. ग्रामीण विभागांचा आर्थिक विकास झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत होईल व त्यामुळें साहजिकच आपल्या देशाचा विकास साधेल व तो समृद्ध होईल. म्हणूनच लहान शहरांतील वृत्तपत्रें कितपत विधायक व निकोप दृष्टिकोण स्वीकारतात यावर आपल्या ग्रामीण भागांतील प्रगति विशेषतः अवलंबून आहे असें मला वाटतें.

आपल्या या महान् राज्याची व राष्ट्राची प्रगति करून समृद्धता आणण्याच्या आपल्या या समान कार्यांत वृत्तपत्रांचें सहकार्य मिळावें, – चिकित्सक सहकार्य मिळावें अशी मी अपेक्षा करतों.

( २३ डिसेंबर १९६० नागपूर : कॉलेज ऑफ जर्नॅलिझम् )

* * *



श्रीशिवाजीमहाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर साऱ्या भारताचे नेते होतें. मानवतेचा उत्कृष्ट नमुना म्हणून त्यांचा उल्लेख केला पाहिजे. जर शिवाजीमहाराज झाले नसते तर काय झालें असतें हें जगाला माहित आहे.

# शिव छत्रपतींचा आदर्श

पाकिस्तानची सरहद्द तुमच्याआमच्या घरापर्यंत येऊन भिडली असती व ती शोधण्यासाठीं फार दूर जावें लागलें नसतें.

यशस्वी राज्यरचना हेंहि त्यांचें वैशिष्टय होय. मोगली सत्तेविरुद्ध लढतांना त्यांनीं मुसलमानांशीं वैर केलें नाहीं. कोणत्याहि धर्माविरुद्ध किंवा भाषेविरुद्ध त्यांचें वैर नव्हतें. सामान्य माणसांना बरोबर घेऊन नीतिमत्तेवर आधारलेलें एक नवें राज्य त्यांनीं उभारलें. त्यावेळीं लोकांचा स्वाभिमान दुखावला होता व मनें दबलीं गेलीं होतीं. स्वाभिमान व मनें उंचावण्याचें कार्य त्यावेळीं कोणीतरी करावयास हवें होतें व तें सह्याद्रीच्या या थोर सुपुत्रानें केलें.

नव्या महाराष्ट्राची निर्मिति ही छत्रपतींचीच पुण्याई आहे. हें मी केवळ प्रांतिक भावनेची वाढ करण्यासाठीं बोलत नाहीं. आमच्या मनांत तशी भावनाहि नाहीं. कारण छत्रपतींची ही प्रतिमा म्हणजे भारताची तेजस्विता, अस्मिता व स्वाभिमान याचेंच प्रतीक आहे, असें आम्ही मानतों. म्हणूनच प्रारंभीं बोलतांना मी आजचा ।दवस हा महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासांतीलहि सोन्याचा दिवस आहे.

हिंदवी स्वराज्याची उभारणी करतांना श्रीशिवाजीमहाराजांनीं केलेल्या राज्यरचनेचा आदर्श आजहि स्वीकारण्यासारखा आहे. गरीब जनतेला सामर्थ्यशाली बनवून त्यांनीं मराठ्यांचें आरमार उभारलें. आज पश्चिम सागराकडे तोंड करून बोलतांना त्यांची आठवण येते. विजयदुर्ग व सिंधुदुर्ग आजहि त्या सामर्थ्यशाली आरमाराची साक्ष देत आहेत. हिंदुस्थानच्या इतिहासांत नवीन असे राज्यरचनेचे प्रकार त्यांनीं अस्तित्वांत आणले. त्यांनीं सरंजामदारांचें राज्य स्थापन केलें नाहीं तर लंगोटीवाल्या मावळ्यांच्या हातीं मोडक्या तोडक्या तरवारी दिल्या व त्यांचें राज्य स्थापन केलें. सामान्यांचा राजा, नीतीचा पुतळा व चारित्र्याचें प्रतीक असें त्यांचें वर्णन करतां येईल. महाराष्ट्राचें नवें राज्य स्थापन झाल्यानंतर पहिल्या प्रजासत्ताकदिनीं होत असलेल्या या समारंभप्रसंगीं आपण जुन्या स्मृति लक्षांत घेऊन नव्या शपथा घेतल्या पाहिजेत. छत्रपतींच्या या प्रतिमेसमोर महाराष्ट्र राज्यस्थापनेच्या वेळीं केलेल्या जुन्या प्रतिज्ञेचा मी पुनरुच्चार करतों. मराठी राज्य हें समानतेचें राज्य राहील ही ती प्रतिज्ञा. आणखी एक प्रतिज्ञा आपण केली पाहिजे. दारिद्र्य व अज्ञान याविरुद्ध आपण लढा देऊन जनतेची साधुता वाढविण्यासाठीं झटलें पाहिजे. स्वाभिमानी साधुत्वावर अधिष्ठित व नीतिमान असा समाज महाराष्ट्रभर चालता बोलता राहील असे प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा आपण केली पाहिजे. या आनंदाच्या क्षणीं जशीं सारीं मराठी माणसें एकत्र आलीं तशीं यापुढें येणाऱ्या कठीण प्रसंगीं एकत्र येतील व त्यांचें सहकार्य लाभेल अशी मी शिवाजीमहाराजांच्या चरणीं प्रार्थना करतों.

शिक्षणमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांनीं या पुतळा उभारण्यासाठीं केलेल्या कामगिरीबद्दल मी त्यांना धन्यवाद देतों. आतांच बाबूराव अत्रे

म्हणाले, 'बाळासाहेबांनीं आज मोठी कुस्ती मारली.' अशा अनेक कुस्त्या आम्हीं मारल्या पण त्या त्यांना दिसल्या नाहींत.

मुंबईंत श्रीशिवाजीमहाराजांचा पुतळा नव्हता, पण ती उणीव आज भरून निघाली. इतिहास त्यासाठीं योग्य क्षणाची वाट पाहात असला पाहिजे. नव्या महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची वाट इतिहासानें पाहिली असावी. शिवाय भारतीय संदर्भ विसरूं नये म्हणून महाराष्ट्राच्या पहिल्या प्रजासत्ताक दिनाचे दिवशीं ही कामगिरी पार पडत आहे. आणि पुतळ्यासाठीं जें ठिकाण निवडलें आहे त्याचा खुद्द परमेश्वराला हेवा वाटावा.

आजच्याप्रमाणें पुढें कोणत्याहि कठीण प्रसंगांत तोंड देण्यासाठीं सारीं मराठी माणसें एकत्र येतील तर दुनियेंत न केलेला पराक्रम मराठी जनता करून दाखवील.

( २६ जानेवारी १९६१ : मुंबई )

* * *



लोकरंजन आणि लोकाराधन या नात्यानें नाटकाचें स्थान फार महत्त्वाचें आहे 'नाट्यम् भिन्नरुचे: जनस्य बहुधा अपि एकं समाराधनम्' ही कालिदासाची उक्ति त्रिकालाबाधित आहे. भारताच्या राजधानींतील भिन्नरुचि

# मराठी रंगभूमि

समाजाचें यथाशक्ति रंजन करणाऱ्या मराठी रंगभूमीची परंपरा फार जुनी आहे. ललितांची परंपरा उत्तर भारतांतील रामलीलेइतकीच जुनी आहे. संस्कृत नाटकांतील कला व पौराणिक नाटकांतील संगीत यांचा अपूर्व संगम अण्णासाहेब किर्लोस्करांनीं "सौभद्रांत" साधला. हें नाटक रंगभूमीवर येऊन पाऊणशें वर्षांच्यावर काल उलटून गेला आहे, पण आजहि तें पहिल्या दिवसाइतकेंच लोकप्रिय आहे. किर्लोस्करांची 'सौभद्र व शाकुंतल' हीं संगीत नाटकें रंगभूमीवर गाजत होतीं तर दुसरीकडे आगरकरांसारखे समाजसुधारक 'हॅम्लेट' या जगप्रसिद्ध नाटकाचें रूपांतर करीत होते. गोविंद बल्लाळ देवल यांच्या सात नाटकांपैकी झुंझारराव, मृच्छकटिक, शारदा व संशयकल्लोळ हीं चार नाटकें


म्हणजे मराठी रंगभूमीवरील देदीप्यमान रत्नेंच. ‘शारदा’ हेंच पहिलें वहिलें सामर्थ्यशाली सामाजिक नाटक म्हणून मान्यता पावलें. या नाटकाचा महाराष्ट्रावर इतका परिणाम झाला कीं, पुढें कित्येक वर्षे आपल्या मुलीचें नांव शारदा ठेवायला एकहि माता धजली नाहीं. ज्यांना वाचा नाहीं, अशा समाजांतील अबलेची कहाणी ‘शारदा’ रसाळ मुकेपणानें समाजाला, मराठी मनाला चिरंतन सांगत राहील. देवलांच्या मागोमाग श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ह्या प्रतिभाशाली नाटककारांनीं मराठी रंगभूमि गाजविली. गडकरी हे खाडिलकरांनंतरचे लोकप्रिय नाटककार. गडकरी म्हणजे मराठी रंगभूमीवरील सर्वांत तेजस्वी तारा. मराठी रंगभूमीला अवकळा आली तेव्हां तिला हातभार लावून जगवणाऱ्या साहित्यिकांत श्री. अत्रे यांचा उल्लेख प्रामुख्यानें करावा लागेल. १९४० ते ५० या दशकांत मराठीची एकनिष्ठेनें सेवा करणारे श्री. मो. ग. रांगणेकर यांचा निर्देश करावा लागेल. मामासाहेब वरेरकर हे आणखी एक थोर सामाजिक नाटककार.

स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, इत्यादि सामाजिक चळवळी, वेळोवेळीं झालेलीं राजकीय आंदोलनें, श्रमजीवि वर्गाची संघटना, यापासून मराठी रंगभूमि अलिप्त राहूं शकली नाहीं. मराठी नाटककारांच्या समाजाभिमुखतेबरोबरच त्यांच्या प्रयोगशीलतेचाहि निर्देश करणें अगत्याचें आहे. आजहि मराठी रंगभूमीवर नव्या नव्या तांत्रिक साधनांच्या साहाय्यानें अभिनव प्रयोग करण्याची स्वागतार्ह प्रवृत्ति स्पष्ट दिसत आहे. यांत अनुकरणाचा थोडासा भाग असल्यानें त्यांतील परकेपणा जरी कांहींसा जाणवत असला तरी तो हळूहळू कमी होत जाऊन मराठी रंगभूमि अद्ययावत्, कलासंपन्न, अभिरुचि-संपन्न बनेल अशीं सुचिन्हें दिसत आहेत.

(२५ मार्च १९६१ नवी दिल्ली . मराठी नाट्यसंमेलन)

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...



महाराष्ट्र राज्याचा पहिला वाढदिवस आपण कोणत्याहि प्रकारच्या वेगळेपणाच्या किंवा अलिप्ततेच्या भावनेंतून साजरा करीत नाहीं. उलट ज्यामुळें महाराष्ट्र राज्य भारतीय संघराज्याची अधिक चांगल्या प्रकारें सेवा

# नव्या जीवनाचा नाद

करील व त्याचा एक सामर्थ्यशाली भाग बनेल अशा भावनेनें आपण हा मंगल दिवस साजरा करीत आहोंत. महाराष्ट्र राज्यस्थापनेच्या वेळीं विख्यात कवि कुसुमाग्रज यांनीं एका कवितेंत,

'नव्या जीवनाचा नाद मला ऐकूं येत आहे !
लक्ष शून्यांतून कांहीं श्रेय आकारत आहे ।।

असा आशावाद व्यक्त केला होता व महाराष्ट्र राज्यस्थापनेच्या आनंदाचा प्रत्यय दऱ्याखोऱ्यांतून, शेतांतून, झोपडीझोपडींतून कविमनाला कसा झाला होता ती भावना त्यांनीं आपल्या या कवितेंत व्यक्त केली होती. या आनंदाच्या लाटेंतून बाहेर पडून आपण मग कामाला लागलों व अनेक निर्णय घेतले.

लोककल्याणाच्या पुष्कळशा योजना महाराष्ट्रांत आपण गेल्या वर्षीं हातीं घेतल्या. तथापि रोम ज्याप्रमाणें एक दिवसांत बांधलें गेलें नाहीं तीच गोष्ट महाराष्ट्राची वा भारताची आहे. ग्रामीण भागांतील असंख्य जनतेचें जीवन सुधारणें हें महाराष्ट्र सरकारचें उद्दिष्ट आहे. कारण तिकडे खेडेगांवें दुर्लक्षित राहिलीं व इकडे शहराचा डामडौल वाढला तर ती खरी समृद्धि नव्हे. हें समृद्धीचें मृगजळ होय व मृगजळाला जर आपण सत्यसृष्टि मानूं लागलों तर आपला तो विनाश ठरेल. म्हणून ग्रामीण जीवनांत परिवर्तन घडवून आणण्यासाठीं आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे, ग्रामीण भागांत उद्योगधंदे स्थापन झाले व त्या दिशेनें निश्चित् व विचारपूर्वक कार्यक्रम आंखला तरच ग्रामीण भागांत परिवर्तन यशस्वी होईल.

आर्थिक आणि सामाजिक न्यायाच्या पुरस्कारार्थ महाराष्ट्र सरकारनें गेल्या वर्षीं अनेक महत्त्वाचीं पावलें उचललीं आहेत. महाराष्ट्र सरकार आपल्या सामर्थ्यानिशीं जनतेच्या कल्याणाचा मार्ग चोखाळत चाललें आहे. जनताहि जोमानें, उत्साहानें, कष्टाच्या व कर्तृत्वाच्या भावनेनें या प्रयत्नांत सहभागी होत आहे. महाराष्ट्र राज्याच्या व भारताच्या दृष्टीनें हें सुचिन्ह आहे.

(३० एप्रिल १९६१ : मुंबई—आकाशवाणी)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ११७५६
REFBK-0011496
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ......... दि: .........
क्रमांक ......... नों दि .........

# आमचीं कांहीं प्रकाशनें

| | |
|---|---|
| बँका व त्यांचे कारभार<br>चिं. वि. जोग | १२–५० |
| माझे समकालीन<br>न. वि. गाडगीळ | ४–०० |
| मराठी नाट्यपरिषद् : इतिहास व कार्य<br>बर्वे व कानडे | ८–०० |
| मराठी रंगभूमि<br>आ. वि. कुलकर्णी | ४–०० |
| श्रोते हो ( २ री आवृत्ति )<br>म. म. द. वा. पोतदार | ४–०० |
| सप्रेम नमस्कार<br>अ. ह. लिमये | ३–०० |
| रागरंग<br>वसन्त शान्ताराम देसाई | ३–५० |
| निबंधशास्त्र व कला<br>डॉ. प्र. न. जोशी | ३–०० |

व्हीनस बुकस्टॉल : पुणें २




नव्या महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, औद्योगिक व सामाजिक प्रगतीची अहर्निश चिंता करणारे आणि जनतेच्याच सहकार्यानें महाराष्ट्राचें भविष्य उज्ज्वल करणारे ध्येयनिष्ठ शिल्पकार

# व्हीनस बुक स्टॉल : पुणें २